**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

**मुंबईतील वांद्रे येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समिती वैधता प्रमाणपत्र देताना करीत असलेला भ्रष्टाचार**

**(१) * ३७७८ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समिती वैधता प्रमाणपत्र देताना भ्रष्टाचार करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देण्यात येणाऱ्या जात पडताळणी प्रमाणपत्राची तपासणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर वांद्रे समितीची एसीबीकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर प्रकरणात भ्रष्टाचार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिलीप कांबळे, श्री. राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही. अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, वांद्रे येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने बोगस प्रमाणपत्र दिल्याचे न्यायालयातून निदर्शनास आले आहे. सदर बाबतीत पडताळणी सुरू आहे. सभापती महोदय, असे असतानाही उत्तरात म्हटले आहे की, हे खरे नाही. तेथे सरसकट भ्रष्टाचार केला जात आहे. बोगस प्रमाणपत्र देणे सुरू आहे. युतीचे शासन होते त्यावेळी बोगस प्रमाणपत्र घेतले किंवा दिले तर कारवाई होत होती. सदर बाबतीत आंध्रप्रदेश राज्यात कायदा आहे, तसा कायदा आपल्या राज्यात अंमलात यावा म्हणेजे बोगस प्रमाणपत्र देणे आणि घेणे कमी होईल, भ्रष्टाचार थांबेल. शासन आपल्या राज्यात असा कायदा आणणार का ? जात प्रमाणपत्र पडताळीच्या वेळी सन 1950 पूर्वीचे दाखले मागितले जातात. सन 1950 पासून आता 65 वर्षे झाली आहेत. त्यामुळे पूर्वीची कागदपत्रे देणे त्यांना दुरापास्त आहे. राज्यात राहणारे इतर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अनुसूचित जातीचे लोकही आहेत, जसे, वाल्मिकी समाज, हरयाणा आहे, रूखी समाज, मेघवाल

..2



ता.प्र.क्र.3778....

श्री. भाई गिरकर ....

समाज, गुजरात आहे, रेगर समाज, राजस्थान आहे, आदी द्रविड समाज, तामिळनाडू आहे, पासी समाज, उत्तर प्रदेश आहे, या समाजाचे लोक राज्यात 100 वर्षांपासून राहत आहेत, त्यांना जात वैधता प्रमाणपत्र पाहिजे असेल तर सन 1950 पूर्वीचा दाखला आणावा असे सांगितले जाते. सदर बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा कायदा आहे असे सांगितले जाते. माझा प्रश्न असा आहे की, डोमिसाईल सर्टिफिकेट घेण्यासाठी रहिवासाचा 15 वर्षांचा पुरावा मागतात, तसा जात प्रमाणपत्र पडताळणीच्या संदर्भात करणार का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 2-3 प्रश्न उपस्थित केले आहेत. बोगस जात प्रमाणपत्रांच्या च्या संदर्भात आंध्रप्रदेशमध्ये जसा कायदा आहे त्याच धर्तीवर राज्यात कायदा करणार का असे त्यांनी विचारले आहे. मी सांगू इच्छितो की, याचा नक्की विचार करण्यात येईल. न्यायालयीन निवाडे, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय असे अनेक गुंतागुंतीचे विषय आहेत. त्यामुळे त्या संदर्भात सुसूत्रता आणण्यासाठी लवकरच माननीय केंद्रीय कायदा मंत्री, आपल्या सदनातील व विधानसभेतील राखीव मतदारसंघातून निवडून आलेले सर्व सन्माननीय सदस्य यांची बैठक घेऊ लवकरच कायदा करण्याचा शासनाचा विचार आहे. हे खरे आहे की, जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी सन 1950 पूर्वीचा पुरावा मागितला जातो. सनल 1950 ला आता 65 वर्षे झाली आहेत. त्यामुळे पुरावे देण्यात खूप अडचणी येतात. हा गोरगरीब, मागासवर्गीय, दलित समाजाच्या संबंधीचा विषय आहे. त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण फार कमी आहे. घरेच नाहीत तर कागदपत्रे सांभळणे कठीण आहे. ते लोक खेडेगावातून जगण्यासाठी शहरात येतात, झोपडपट्टीत राहतात. त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. सन 1950 पूर्वीचे पुरावे देण्याची अट आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, शासन या संदर्भात सकारात्मक विचार करून तातडीने निर्णय घेईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सदर प्रश्नाची व्याप्ती फार मोठी आहे. आपल्या सर्वांचा हा कन्सर्न आहे, चिंता आहे. प्रश्नाचा आशय भ्रष्टाचाराच्या संबंधी आहे. जात पडताळणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रमाणपत्रांचा हा विषय आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी करताना भ्रष्टाचार होतो असा सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी उल्लेख केला, तो जास्त महत्तवाचा आहे. माननीय मंत्र्यांनी या

..3



ता.प्र.क्र.3778....

श्री. भाई जगताप ....

संदर्भात सुसूत्रता आणण्याच्या संदर्भात खुलासा केला आहे. अनेक वेळा असे खुलासे केले जातात. प्रयत्न करण्यात येतील असे सांगितले जाते. दुसऱ्या राज्यात अशा पध्दतीचा कायदा आहे आणि तो आपल्यासाठी दिशादर्शक आहे. महाराष्ट्रातील अनेक कायदे असे आहेत की ते दुसऱ्या राज्यांनी स्वीकारून त्याप्रमाणे स्वत:चे कायदे बनविले आहेत. आपल्या राज्याची या संदर्भात काय अडचण आहे ? आंध्रप्रदेशमध्ये असा कायदा आहे आणि इतर राज्यात सुध्दा आहे, त्यातून भ्रष्टाचार रोखला गेला आहे. जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी सन 1950 पूर्वीचा दाखला देणे आवश्यक आहे. मुंबईचा प्रश्न वेगळा आहे. मुंबई राज्य होते, त्या काळात असलेला समाज अपोलो बंदरच्या बाजूला रहायचा. 60 बेटांचे असलेले मुंबई. त्या काळात असलेला समाज हे पुरावे कोठून आणणार ? इतर राज्यांत जात पडताळणीच्या संदर्भात सुटसुटीत कायदा आहे. आपण तसा कायदा करण्याच्या दृष्टीने काही पावले उचलणार का ? आमच्या अंदाजाप्रमाणे 10 एप्रिलपर्यंत अधिवेशन आहे. आपल्याला या अधिवेशनात हे विधेयक आणता येणार नाही. पुढील अधिवेशनात तरी अशा पध्दतीचे विधेयक आणून असा कायदा करण्याचा प्रयत्न करणार का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, मी सुरूवातीलच सांगितले की, या प्रश्नाची व्याप्ती मोठी आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे सरकार नक्कीच विचार करेल. समितीवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न सुरूआहे. विभागीय समित्यांऐवजी जिल्हास्तरिय समित्या स्थापन केल्या आहेत. सदर समित्यांचे कामकाज येत्या 10-15 दिवसांत सुरू होईल. जोपर्यंत जिल्हा समित्यांचे कामकाज सुरूहोत नाही तोपर्यंत या समित्यांना काम करण्याचे निर्देश दिले आहेत.

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, जात पडताळणी समितीच्या संदर्भात माहिती दिली जात आहे. जात पडताळणी समितीपुढे 1 लाख 20 हजार प्रकरणे प्रलंबित होती असे सांगितले होते. सदर प्रकरणे लवकर निकाली काढण्यात येतील असे सांगण्यात आले होते. परंतु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रत्यक्षात असे झालेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, विभागीय पातळीवर व जिल्हा पातळीवर किती जात पडताळणी समित्या कार्यरत आहेत आणि त्यांच्याकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत ?

..4



ता.प्र.क्र.3778....

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, राज्यात येत्या 15 दिवसांत 36 समित्या सुरू होत आहेत. प्रत्येक जिल्ह्यात ही समिती सुरूकरण्यात आली आहे. साधारणपणे 43 हजार ....

श्री. अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात जात पडताळणीच्या समित्या 36 करण्यात येणार आहेत. परंतु अजून त्या कार्यरत झालेल्या नाहीत. आजची परिस्थिती अशी आहे की, कोणी समितीकडे गेले की वेगवेगळी उत्तरे दिली जातात. उदाहरणार्थ नांदेडचा माणूस समितीकडे गेली तर तुमची समिती वेगळी झाली आहे, आम्हाला वरून निर्देश देण्यात आलेले नाहीत असे सांगण्यात येते. आपण या समित्या किती दिवसांत कार्यरत करणार आहात ? निवडणुका सुरूझाल्यामुळे आता अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी विचारलेला प्रश्न वांद्रे येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समिती व तेथील भ्रष्टाचार या मर्यादित विषयापुरता होता. निवडणुका लागलेल्या आहेत. त्यावेळी जात वैधता प्रमाणपत्राचा प्रश्न येणार आहे. माझे माननीय मंत्र्यांना निर्देश राहतील की, सदर बाबतीत प्रश्नोत्तराच्या तासात जास्त प्रश्न विचारण्यापेक्षा आपल्या किंवा माझ्या दालनात सर्व सन्माननीय सदस्यांना बोलावून त्यांचे विचार ऐकण्याच्या संदर्भात बैठक घ्यावी.

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, होय.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, आम्हाला उत्तरातून जे अपेक्षित होते ते मिळालेले नाही. आम्ही काल टीव्हीवरील बातम्यांमध्ये पाहिले की, माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी घोषणा केली आहे. निवडणूक लढल्यानंतर 6 महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र द्यायचे आहे. विधेयक येणार आहे हे बरोबर आहे. काल टीव्हीवर सांगितले. मी त्या संदर्भात आपले अभिनंदन करतो. परंतु विद्यार्थ्यांची परिस्थिती काय आहे ? आपण त्यांच्या संदर्भात काय करणार आहात ? विद्यार्थ्यांना प्रवेशाकरिता जात वैधता प्रमाणपत्र लागते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3778....

**सभापती** : सदर प्रश्नावरील चर्चेस 10 मिनिटे झाली आहेत. सदर विषयाच्या संदर्भात बैठक घेणे हेच योग्य होईल. पुढील आठवड्यात या विषयाच्या संदर्भातील बैठक माझ्या दालनात घेण्यात येईल.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**धनगर समाजाच्या आरक्षणासंदर्भात घ्यावयाच्या निर्णयाबाबत**

**(२) * २६६७ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामराव वडकुते, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजास आदिवासींच्या सवलती देण्याबाबत ॲडव्हॉकेट जनरल यांचे मार्गदर्शन घेवून १५ दिवसात आदिवासींच्या सवलती लागू करण्यात येतील अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात धनगरांना आदिवासींच्या सवलती देण्यासाठी ॲडव्होकेट जनरलचे मार्गदर्शन घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी समाजाच्या विहित आरक्षणाला बाधा न पोहचता सदर आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) नागपूर येथे दिनांक ४.१.२०१५ रोजी झालेल्या एका कार्यक्रमात uधनगर आरक्षणाबाबत सर्वकष विचार करुन कायदा करण्याबाबत महाअधिवक्ता यांच्या समवेत लवकरच बैठकीचे आयोगजन करण्यात येईलल अशी मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली आहे.
(२) राज्याचे ॲडव्होकेट जनल यांचे समवेत चर्चा झाली असून त्यांचे अभिप्राय व विधी व न्याय विभागाचे अभिप्राय आदिवासी विकास विभागास प्राप्त झाले आहेत.
(३) व (४) सद्य:स्थितीत धनगर समाजाचा समावेश भटक्या जमाती-क या प्रवर्गामध्ये असून त्यांना ३.५ टक्के आरक्षण अनुज्ञेय आहे.

धनगर समाज आणि अनुसूचित जमाती यांना मिळणाऱ्या सवलती खालील प्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | सवलती | धनगर समाज | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|
| १ | शासकीय नोकरीमध्ये आरक्षण | ३.५% | ७% |
| २ | शैक्षणिक संस्थेमध्ये आरक्षण | ३.५% | ७% |
| ३ | विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | मिळते | मिळते |
| ४ | आश्रमशाळा सुविधा | उपलब्ध आहे | उपलब्ध आहे |
| ५ | वसतीगृहाच्या सुविधा | उपलब्ध आहे | उपलब्ध आहे |

वरील विवरणावरुन असे दिसून येते की, अनुसूचित जमातीला मिळणाऱ्या सवलंतीसारख्या बहुतांश सवलती धनगर समाजाला मिळत आहेत.

तथापि, वरील चर्चेच्या अनुषंगाने ॲडव्होकेट जनरल यांचे प्राप्त झालेले अभिप्राय व मा.मुख्यमंत्री

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667......

श्री.विष्णू सवरा........

महोदयांच्या निर्देशानुसार, आदिवासींच्या आरक्षणाला बाधा न पोहोचता धनगर समाजाला आरक्षण कसे देता येईल, ही बाब तसेच या विभागाचा शासन निर्णय क्र.सीबीसी-१०८६/(२०३)/का.१०, दिनांक ५.२.१९८८ अनुसार तपासून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या प्रश्न भाग 3 व 4 ला दिलेल्या उत्तरात धनगर समाजाला मिळणाऱ्या सवलती आणि आदिवासी समाजाला मिळणाऱ्या सवलती यांचा तुलनात्मक तक्ता देण्यात आला आहे. आदिवासी समाजाला ज्या सवलती मिळत आहेत, त्याच धनगर समाजालाही मिळत आहेत, असे दाखविण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. अशा प्रकारे धनगर समाजाला आदिवासींचा सवलती मिळत असल्यामुळे त्यांना आदिवासींचे आरक्षण देण्याची आवश्यकता नाही, अशी शासनाची भूमिका आहे का ?

सभापती महोदय, डिसेंबर, 2014 च्या अधिवेशनात आदिवासी विकास मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, "धनगर समाजाला आदिवासींचे आरक्षण देणे अशक्य आहे." या दरम्यानच्या काळात राज्याच्या 24 आमदार व खासदारांनी धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याला व त्यांना त्या समाजाचे आरक्षण देण्याला स्पष्टपणे विरोध केलेला आहे व त्याबाबतचे स्पष्ट निवेदन विविध वर्तमानपत्रातही आले आहे. या निवेदनाबाबत आदिवासी विकास मंत्री महोदयांनी आपली भूमिका स्पष्ट करावी.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी या सदनामध्ये आणि सदनाच्या बाहेरही धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतची भूमिका स्पष्ट केली आहे. ही भूमिका स्पष्ट करीत असताना त्यांनी असेही सांगितले आहे की, "अनुसूचित जमातीच्या 7 टक्के आरक्षणाला बाधा न आणता आम्ही धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत विचार करु." त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आमची भूमिका नाही. फक्त आमचे म्हणणे एकच आहे की, आदिवासींच्या आरक्षणाला धक्का न लावता इतर बाबींचा विचार करावा. तशा प्रकारची प्रोसेस सुरु झाली आहे. राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांचे अभिप्राय आमच्याकडे आताच आलेले आहेत व ते गोपनीय स्वरुपाचे आहेत. त्याची छाननी शासन पातळीवर आम्ही करीत आहोत. ही छाननी पूर्ण

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667......

श्री.विष्णू सवरा........

झाल्यानंतर त्याबाबतची माहिती आपल्याला देता येईल. ही छाननी पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आपल्या मागील उत्तरापेक्षा वेगळे उत्तर आता सभागृहात दिले आहे. या तारांकित प्रश्नाला दिलेल्या उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदात असे नमूद केले आहे की, "ही बाब तसेच या विभागाचा शासन निर्णय क्रमांक सीबीसी-1086/(203)/का.10, दिनांक 5.2.1988 अनुसार तपासून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल." शासनाचा हा निर्णय नेमका काय आहे ?

सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल यांचे प्राप्त झालेले अभिप्राय गोपनीय स्वरूपाचे आहेत, असे उत्तर मंत्री महोदयांनी दिले आहे. असे असले तरी धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत शासन कटीबध्द आहे, वचनबध्द आहे, असे ज्यावेळी मंत्री महोदय सांगत आहेत, त्यावेळी ॲडव्होकेट जनरल यांचे नेमके अभिप्राय काय आहेत ?

सभापती महोदय, अनुसूचित जमातीच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला आरक्षण देण्यात येईल, याचा नेमका अर्थ काय आहे आणि वेगळे आरक्षण देण्याबाबतचा अधिकार राज्य शासनाला आहे का ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, अनेक वेळा अशी मागणी होत असते की, आदिवासी समाजाचे आरक्षण मिळावे. तत्कालीन उप मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झालेली आहे.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारले आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे, असे अपेक्षित आहे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन 1998 च्या शासन निर्णयाची प्रत आता माझ्याकडे नाही, ती मी पटलावर ठेवतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, शासन निर्णयाची प्रत माझ्याकडे नसली तरी त्या शासन निर्णयाचा गोषवारा माझ्याकडे आहे. तो मी वाचून दाखवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667......

श्री.विष्णू सवरा........

सभापती महोदय, "अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या यादीत एखादी जात किंवा जमात अंतर्भूत करण्याबाबत शिफारस करण्याची कार्यपध्दती दिनांक 11 जानेवारी, 1982 च्या शासन निर्णयान्वये निर्धारित करण्यात आली होती. सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद 2 मध्ये नमूद केल्याप्रमाणे माननीय मंत्री, समाजकल्याण व आदिवासी कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली एक शासकीय समिती नियुक्त करण्यात आली होती. तथापि, आदिवासी विकास विभाग दिनांक 1 मे, 1983 रोजी स्वतंत्रपणे निर्माण करण्यात आल्यामुळे अनुसूचित जमातीचे वर्गीकरण हा विषय आदिवासी विकास विभागाच्या कक्षेत कामकाज नियमावलीनुसार येतो. या फेरबदलामुळे वरील समितीची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरुन एखाद्या जमातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याबाबत राष्ट्रपतींना भारतीय घटनेच्या अनुछेद 342 (अ) अन्वये शिफारस करण्यापूर्वी त्या मागणीचा विचार करण्यासाठी खालील प्रमाणे समितीची पुनर्रचना करण्यात येत आहे :-

**समिती**

माननीय मंत्री, आदिवासी विकास - अध्यक्ष

माननीय राज्यमंत्री, आदिवासी विकास - उपाध्यक्ष

माननीय सचिव, आदिवासी विकास - सदस्य सचिव

माननीय सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग - सदस्य

माननीय सचिव, सामान्य प्रशासन विभाग - सदस्य

एखाद्या समाजाने त्यांची जमात अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्याबाबत मागणी केल्यानंतर ती मागणी केंद्र शासनाने कोणत्या समाज घटकांना अनुसूचित जमात समजावे, या संदर्भात घालून दिलेल्या निकषांच्या आधारे ती मागणी योग्य आहे किंवा नाही, या बाबीचा अभिप्राय संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून मागविण्यात यावा. त्यांचे सविस्तर अभिप्राय आल्यानंतर ते अभिप्राय परिच्छेद 2 नुसार केलेल्या समितीपुढे निर्णयासाठी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ठेवावेत. अनुसूचित जमातीच्या संदर्भात उपरोक्त समितीने मंजुरी दिल्यास ही मागणी प्रथमतः

...5....



ता.प्र.क्र.2667......

श्री.विष्णू सवरा........

मुख्य सचिवांच्या निदर्शनास आणावी आणि त्यानंतर ती मागणी ठराव रुपाने प्रि ॲडव्हायझरी कमिटी समोर मान्यतेसाठी ठेवावी. ठरावाला प्रि ॲडव्हायझरी कमिटीने मंजुरी दिल्यास ती मागणी शिफारशीच्या रुपाने केंद्र शासनाला कळवावी."

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्याकडून यापूर्वीच राज्य सरकारकडे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. तत्कालीन आदिवासी विकास मंत्र्यांनी या संदर्भात मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव आणत असताना या बाबतीतील भूमिका त्यावेळी स्पष्ट केली होती. तशाच प्रकारे आताच्या सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी त्यांची भूमिका नागपूरच्या अधिवेशनात सभागृहामध्ये स्पष्ट केली आहे. संचालकांचा अभिप्राय नकारार्थी आहे. असे असताना आता शासनाकडून नेमकी कोणती बाब तपासली जाणार आहे ? विद्यमान आदिवासी विकास मंत्री महोदयांची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या ठिकाणी आदिवासी विकास मंत्री महोदयांनी सन 1988 चा शासन निर्णय वाचून दाखविला आहे व त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल, असेही सांगितले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री.वि.खर्चे.....

ता.प्र.क्र.2667..

श्री.एकनाथराव खडसे....

राज्य सरकारने या सभागृहात वारंवार ही भूमिका स्पष्ट आहे की, आदिवासींच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला आदिवासींच्या सवलती देण्याबाबत नियमातील तरतुदीनुसार केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात येणार आहे. आदिवासी आरक्षणाच्या संदर्भातील बाब राज्य सरकारच्या अधिकारात नाही. कोणती कार्यप्रणाली अवलंबवी, यासंदर्भात काय करावे, केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवित असताना कोणत्या कार्यपध्दतीनुसार ठराव करावा, केंद्र सरकारकडे तिसऱ्या सूचित समाविष्ट करुन आरक्षण मिळावे. यासंदर्भात 1988 मध्ये तत्कालीन सरकारने जो निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयानुसार पध्दती अवलंबिली जाईल. धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत काही बाबी तपासून माहिती जमा करण्याचे काम सुरु आहे. मागील कालखंडात मराठा व मुस्लिम आरक्षणाबाबत न्यायालयात याचिका दाखल झाल्यावर सदर आरक्षण न्यायालयात टीकू शकले नाही. त्यामुळे न्यायालयात आव्हान दिले तरी प्रस्ताव टीकला पाहिजे अशा पध्दतीने कॉन्क्रीट प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. नाही तर धनगर समाजाला आरक्षण देत आहोत असे दाखवून न्यायालय ते फेटाळते असे होऊ नये. आम्ही काय करणार न्यायालयाने फेटाळले असे अंग काढण्याची भूमिका राज्य सरकारची नाही. कोणत्याही परिस्थितीत धनगर समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे अशी राज्य सरकारची भूमिका आहे. त्या दृष्टीकोनातून राज्य शासनाची कार्यवाही सुरु आहे. 1988 मध्ये हा निर्णय झाला असेल तर आघाडी शासनाच्या कालखंडात जी कागदपत्रे जमा करण्यात आली, काही निर्णय झाले आहेत, काही प्रस्ताव आले आहेत, माननीय श्री.अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीने केलेल्या शिफारशी आमच्याकडे आहेत. त्या शिफारसी सभागृहात वाचून दाखविता येतील. जबाबदार व्यक्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. त्यामुळे त्या समितीने केलेल्या शिफारशींची नोंद सरकारने घेतली आहे. त्यांचा सन्मान ठेवला पाहिजे. त्या समितीने जे मत सूचविले ते डावलता कामा नये. त्या समितीचे मत सकारात्मक नाही. परंतु त्यांचे मत डावलता येणार नाही. यासंदर्भात शासन नक्की विचार करणार आहे. सर्व बाबींचा विचार करुन यात येणाऱ्या त्रुटी दूर करुन धनगर समाजाला कोणत्याही परिस्थितीत आरक्षण मिळेल या दृष्टीने शासन कार्यवाही करीत आहे.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667..

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराला माझी हरकत आहे. माझी हरकत आपण ऐकून घ्यावी व त्यानंतर रुलिंग द्यावे. सदनाच्या सन्माननीय नेत्यांनी सरकारची भूमिका सांगितली पाहिजे. मंत्री महोदय प्रत्येक वेळी बोलत असताना तुमच्या सरकारने काय केले, अशा प्रकारे तुम्हाला सांगता येणार नाही. त्याचे कारण असे आहे की, समितीच्या पार्श्वभूमीवर या सरकारने जी घोषणा केली, त्याबाबत आम्ही विचारणा करीत आहोत. सरकार म्हणून आपण घोषणा केलेली आहे. वैयक्तिक घोषणा करण्यात आलेली नाही. सरकारमध्ये समन्वय दिसून येत नाही. आदिवासी विभागाचे मत वेगळे आहे, सरकारचे मत वेगळेचे आहे. मुख्यमंत्री महोदय तिसरेच काही तरी सांगत असतात. घटनेच्या आर्टीकल 342-अ प्रमाणे यापूर्वी तत्कालीन सरकारने असा ठराव केला आहे. आपल्या सरकारने घोषणा केली होती की, आम्ही धनगर समाजाला 15 दिवसात आरक्षण देतो. घटना बाजूला ठेऊन कोणत्या आधारावर आपण आरक्षण देणार आहात. माझी हरकत यासाठी आहे. सरकारने आपली भूमिका धनगर आरक्षणाबाबत स्पष्टपणे सभागृहात सांगितली पाहिजे. सरकारने असे सांगू नये की, त्यावेळी काय झाले, त्यापेक्षा आरक्षणाबाबत सरकारने भूमिका स्पष्ट करावी अशी माझी हरकत आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, तत्कालीन उप मुख्यमंत्री माननीय श्री.अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने समिती नियुक्त केली होती. त्या समितीने दिलेला अभिप्राय हा सरकारी दस्तावेज आहे. ही बाब कोणालाही नाकारता येणार नाही. त्या कालखंडात समितीचा अहवाल आलेला आहे त्या अहवालाचा आम्ही सन्मान ठेऊ. या समितीच्या अहवालात असे स्पष्ट नमूद केले आहे की, " नामसदृश्याशिवाय यामध्ये दुसरे साम्यता नसल्या कारणाने धनगर या जातीस अनुसूचित जमातीचे फायदे देणे असंविधानिक असून ते प्रदान करणे योग्य नाही." असे या समितीचे मत आहे. यामध्ये आणखी काही मत असू शकेल. माननीय श्री.अजित पवार यांचे असे मत आहे असे मी म्हणणार नाही. त्या समितीचे हे मत आहे. याबाबत निर्णय घेताना सरकारला या सर्व बाबी तपासाव्या लागणार आहेत. मी वारंवार सभागृहात सांगितले आहे की, सर्व निर्णय तपासून कोणत्याही परिस्थितीत काही त्रुटी आल्या तरी, कोणी काही टीका टिपण्णी केली तरी धनगर समाजाला आरक्षण देण्याची भूमिका शासनाची कायम आहे.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667..

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी समितीची शिफारस सांगितली आहे. त्यानंतर मंत्रिमंडळात विचार होऊन याबाबत केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे याची माहिती मंत्री महोदयांना आहे काय ? 1988 मध्ये माननीय श्री.शरद पवार मुख्यमंत्री असताना ज्या सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत त्या सर्व सवलती धनगर समाजाला मिळत आहेत हे सरकारने कबूल केले आहे. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे आपण सभागृहाचे नेते आहात. मी आपला आदर ठेऊन सांगतो की, आपणाला असलेले अधिकार व आदिवासी मंत्री महोदय श्री.विष्णू सवरा यांना असलेल्या अधिकारात काही फरक नाही. मुख्यमंत्री यावर भाष्य करु शकतात. आपण याबाबत भाष्य करु शकत नाही. रूल्स ऑफ बिझनेस प्रमाणे उप मुख्यमंत्री महोदयांना देखील मंत्री महोदयांपेक्षा जास्त अधिकार नव्हते. ही बाब अत्यंत सत्य आहे. मी कोणावर हेत्वारोप करीत नाही.

**सभापती** : कृपया मूळ विषय धनगर आरक्षणाचा आहे त्यावर आपण भाष्य करावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, महसूल खात्याचा यामध्ये संबंध आहे, यामध्ये महसूल खात्याचे अधिकारी आहेत, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमाणपत्र देतात. प्रांत अधिकारी हे महसूल खात्याचे आहेत, त्यामुळे या विषयाचा महसूल खात्याची संबंध आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी तीन बाबी सांगितल्या आहेत. या समितीच्या शिफारशीबाबत राज्य सरकारने निर्णय घेऊन केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे याची माहिती मंत्री महोदयांना आहे काय ? मी मंत्री महोदयांना विचारले की, आदिवासी विकास मंत्री महोदयांची याबाबत नेमकी काय भूमिका आहे. रूल्स ऑफ बिझनेस प्रमाणे हा प्रस्ताव त्यांच्या विभागामार्फत केंद्र शासनाकडे पाठविला जाणार आहे की, महसूल विभागामार्फत जाणार आहे, याबाबत सरकारने भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात)

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667..

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आघाडी सरकारने हा प्रस्ताव नाकारला आहे. धनगर समाजाला आरक्षण देऊ नका असे समितीने स्पष्ट सांगितले आहे. त्यावेळी आपण काय करीत होता. समितीचा अहवाल सांगतो की, धनगर समाजाला आरक्षणाची सवलत आघाडी सरकारने नाकारली आहे. या सरकारने मागील 15 वर्षात काय केले आहे. आता या प्रश्नांवर राजकारण करण्यात येत आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देतात)

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667........

**सभापती** : माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब, मूळ विषय बाजूला राहतो. मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मागील सरकारने काय केले आणि काय नाही, हा विषय वेगळा आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला आपण उत्तर द्यावे किंवा माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.विष्णू सवरा साहेब उत्तर देतील. प्रश्नाला उत्तर कोणी द्यावे हा विषय तितका महत्वाचा नाही. परंतु, आपल्याला निश्चित कालावधीत कोणता निर्णय घ्यावयाचा आहे, याबाबत आपण सदनाला माहिती अवगत करुन द्यावी. म्हणजे हा विषय संपेल.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी सभागृहात वारंवार सांगितले की, आम्ही या संदर्भात महाअधिवक्ता यांच्याकडून मत मागवित आहोत. या संदर्भात ॲडव्होकेट जनरल यांच्याकडून आमच्याकडे जे मत प्राप्त झालेले आहे त्याचीही आम्ही छाननी करीत आहोत. या संदर्भात केंद्र सरकारकडे पाठविण्याच्या नमुन्याची जी विहित पद्धती आहे त्यामध्ये 88 चा जीआर सांगितलेला आहे. आम्ही 88 च्या जीआर नुसार हे केंद्र शासनाकडे पाठविण्याची प्रक्रिया करणार आहोत. या अगोदर राज्य शासनाने ज्या समित्या नेमलेल्या आहेत त्या समित्यांमध्ये माननीय श्री.अजित पवार साहेबांच्या समितीचाही उल्लेख आहे. त्याचाही शासन निश्चितपणे विचार करेल. कोणत्याही स्थितीत केंद्र शासनाकडे अनुसूची क्रमांक 3 मध्ये या संदर्भातील समावेश व्हावा आणि यासाठी राज्य सरकार या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केंद्र शासनाकडे आग्रह धरेल. मागील कालखंडात यांनी केले, प्रामाणिक इच्छा आहे. त्याबद्दल माझे म्हणणे नाही. परंतु, सन 1988 मध्ये माननीय श्री.शरद पवार साहेबांनी केले त्याच काळात आदिवासींमध्ये समाविष्ट केले असते तर आज आम्हाला चर्चेला वावच मिळाला नसता. मागील इतक्या वर्षात हे केले असते तर आता चर्चा करण्याची आवश्यकताच भासली नसती. निव्वळ राजकीय दृष्टीकोनातून तुम्ही म्हणत असाल तर (...अडथळा...) आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. आम्ही कोणत्याही स्थितीत हे काम लवकरात लवकरात पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहोत. ते कायद्यात, नियमात बसले पाहिजे आणि ते

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667........

श्री.एकनाथराव खडसे.......
कोणत्याही स्थितीत कोणत्याही न्यायालयात नाकारले जाऊ नये, या दृष्टीकोनातून राज्य सरकार तपासणी करुनच या संदर्भातील कार्यवारी करेल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरातून काहीही निष्पन्न झालेले नाही. हे काम कोणत्या विशिष्ट तारखेपर्यंत होणार आहे, या संदर्भात आपण मंत्री महोदयांना निर्देश दिले. परंतु, मंत्री महोदयांनी हे स्पष्ट केलेले नाही. हा आदिवासी विकास विभागाचा विषय आहे. आदिवासी विकास विभागाचे मंत्री उत्तर देण्यासाठी उभे राहिले होते. परंतु, आदिवासींचा आवाज दाबण्याचे काम माननीय मंत्री महोदयांनी केले. हा आदिवासी विकास विभागाचा विषय आहे. म्हणून माननीय आदिवासी विकास मंत्री महोदयांना उत्तर देऊ दिले पाहिजे. माननीय आदिवासी विकास मंत्री उत्तर देण्यासाठी उभे राहिले होते. परंतु, माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी त्यांना खाली बसविले, उत्तर देऊ दिले नाही. त्यांनी आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांना उत्तर देऊ दिले पाहिजे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे. आपण मला निर्णय घेऊ द्यावा. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब, मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण विषय डायव्हर्ट करीत आहोत. माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.विष्णू सवरा साहेब, आपण प्रश्नाचे उत्तर द्यावे आणि काही पूरक माहिती द्यावयाची असेल तर माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब माहिती देतील.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, आमचे नेते माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी बरोबर उत्तर दिलेले आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667........

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी मघाशी जे सविस्तर उत्तर दिले त्यामध्ये विसंगती आहे. त्यांनी असे सांगितले की, आम्ही केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविणार आहोत. सभागृहाला सुसंगत उत्तर मिळाले पाहिजे. (...अडथळा...) आपण माझे बोलणे पूर्ण होऊ द्यावे. त्यानंतर आपण सुसंगत उत्तर द्यावे. तो आपला अधिकार आहे. मी आपल्या अधिकाराला आव्हान देत नाही. परंतु, सभागृहाला सुसंगत उत्तर मिळाले पाहिजे, हा प्रश्न आहे. त्यांनी सांगितले की, न्यायालयात टिकणार नाही, म्हणून आम्ही न्यायालयात टिकेल असा प्रस्ताव देणार आहोत. ही दोन्ही उत्तरे वेगळी आहेत. धनगर समाजाला आरक्षण देण्याचा मूळ मुद्दा असा आहे की, त्यांना एसटीचे आरक्षण देणार काय ? आपण केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत जे उत्तर दिले ते तिसऱ्या सूचीच्या संदर्भात दिलेले आहे आणि पुन्हा एसटी बद्दलचा प्रस्ताव, अशी तिन परस्पर वेगळी उत्तरे दिलेली आहेत. माझा प्रश्न असा आहे की, तुम्ही केंद्र शासनाकडे जो प्रस्ताव पाठविणार आहात तो अनुसूचित जमातीच्या संदर्भात पाठविणार आहात की तिसऱ्या सूचीच्या संदर्भात पाठविणार आहात ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, तुम्ही जे ॲडव्होकेट जनरलचे मत मागविले आहे ते कोणत्या संदर्भात मागविले आहे, ते एसटीच्या संदर्भात मागविलेले आहे का तिसऱ्या सूचीच्या संदर्भात मागविलेले आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय,....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे. मी या संदर्भात मघाशीच निर्णय दिलेला आहे की, मूळ खात्याच्या मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. पूरक उत्तर द्यावयाचे असेल तर माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी उत्तर द्यावे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.विष्णू सवरा साहेब, आपण उत्तर द्यावे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी जे उत्तर दिलेले आहे ते बरोबर आहे.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667........

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, संदर्भ द्यावयास नको काय ? महसूल मंत्री महोदयांनी बरोबर उत्तर दिलेले आहे. सन 1979 साली अशाच प्रकारचा नवीन इन्क्ल्युजनचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यामध्ये आदिवासींच्या संदर्भात ओतारी, गोवारी, धनगर आणि माना या 4 जमातींचा आदिवासींमध्ये समावेश करावा, अशा प्रकारचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता. हा प्रस्ताव आपल्या सरकारने पाठविला होता. तो प्रस्ताव केंद्र शासनाने राज्य शासनाकडे परत पाठविला. कशाकरिता परत पाठविला ? तर राज्य सरकारने खालील गोष्टींची चौकशी करावी. त्यामध्ये पाच निकष दिले होते. 1) ज्यांचा आदिवासींमध्ये समावेश करावयाचा आहे त्यांचे प्राचिन जीवनमान 2) भौगोलिक अलिप्तता 3) भिन्न संस्कृती 4) स्वभावातील बुजरेपणा 5) मागासलेपणा, या 5 गोष्टींची तपासणी करुन आमच्याकडे प्रस्ताव पाठवावा, असे केंद्र शासनाने राज्य शासनाला कळविले होते.

यानंतर श्री.भोगले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2667......

श्री.विष्णू सवरा.....

त्याप्रमाणे दिनांक 6.11.1981 रोजी राज्य शासनाने त्याचे उत्तर पाठविले आहे. या सर्व निकषामध्ये वरील जमाती बसत नाहीत असे राज्य शासनाने केंद्र सरकारला कळविले आहे. त्यामुळे धनगर जातीचा आदिवासींमध्ये समावेश करण्याचा प्रश्न आलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याचा संबंध येत नाही. राज्य शासनाने धनगर जातीचा आदिवासीमध्ये समावेश करण्याबाबत ॲडव्होकेट जनरल यांचे मत मागविले आहे.

**सभापती** : मंत्री महोदय, मी मघाशी आपल्याला स्पष्ट निर्देश दिले, माननीय सभागृह नेत्यांना सुध्दा मी निर्देश दिले होते. मागील काळात काय झाले याला आता फारसे महत्व नाही. एका बाजूला आपण म्हणता की, आम्हाला धनगर समाजाला आरक्षण द्यायचे आहे. आपल्याला हे करायचे असेल तर मागील सरकारच्या काळात ज्या काही समित्या गठीत झाल्या, तुमच्या काळात जे काही झाले असेल आणि ॲडव्होकेट जनरल यांचे जे मत असेल याचा एकत्रित विचार करुन आपण निश्चित कालावधीत कायद्यानुसार जी शिफारस केंद्र सरकारला करावयाची असेल त्याचा कालावधी नमूद करावा. म्हणजे माननीय सदस्यांचे समाधान होईल.

श्री.एकनाथराव खडसे : लवकरात लवकर करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, दोन बाबी उपस्थित होतात. 1971 साली जो प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठविला होता त्यावेळी श्री.शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री होते......

**सभापती** : आता मी पुढील प्रश्न पुकारीत आहे.

(गोंधळ)

(विरोधी पक्षाच्या अनेक माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

--------

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अकोला एमआयडीसी मध्ये सोयीसुविधा पुरविण्याबाबत**

**(३) * २९३० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहराच्या एमआयडीसीमधील ७०० पैकी ३०० उद्योग बंद पडलेले असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला शहरातील एमआयडीसीमध्ये गुंतवणूक करण्यास अनेक उद्योजक तयार असून केवळ मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव आणि दप्तर दिरंगाईचा फटका बसल्यामुळे अनेक उद्योजकांनी इतर जिल्ह्याच्या वाटा धरल्यामुळे अकोला एमआयडीसीची अधोगती सुरु झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त एमआयडीसीमध्ये सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रवीण पोटे-पाटील, श्री. सुभाष देसाईयांच्याकरिता :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अकोला औद्योगिक क्षेत्र व अकोला विकास केंद्रात एकूण १७०० भूखंडाचे आरेखन केले आहे. त्यापैकी १३७५ भूखंडांचे वाटप केले आहे. सद्यःस्थितीत ४९८ उद्योग कार्यरत असून, उर्वरित उद्योग अपुरे आर्थिक पाठबळ, बाजारपेठेचा अभाव व व्यवस्थापनातील अडचणी इ. कारणामुळे बंद आहेत.

तसेच अकोला औद्योगिक क्षेत्र महामंडळाकडून मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(३) अकोला औद्योगिक क्षेत्र व अकोला विकास केंद्रासाठी महामंडळामार्फत डांबरी रस्ते, जल वितरीका, पथदिवे इत्यादी सुविधा पुरविण्यात आले आहेत. तसेच उद्योजकांना विद्युत पुरवठा करण्याच्या दृष्टीने १३२ के. व्ही. व ३३ के.व्ही क्षमतेच्या दोन विद्युत उपकेंद्र उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अकोला येथील औद्योगिक वसाहतीमधील भूखंडांपैकी 1375 भूखंड वाटप केले असून सद्य:स्थितीत 428 उद्योग कार्यरत असून मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत असे उत्तरात नमूद केले आहे. उद्योजकांनी त्या ठिकाणी उद्योग सुरु केले आहेत. या 4 एमआयडीसी वसाहतीमध्ये रस्ते आणि पायाभूत सुविधा देण्याबाबत केव्हापर्यंत उपाययोजना केली जाईल?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, अकोला एमआयडीसीकरिता 923 हैक्टर जागा संपादित करण्यात आली. 1700 भूखंड पाडण्यात आले, त्यापैकी 1300 भूखंडांचे वाटप करण्यात आले. त्या ठिकाणी 300 उद्योग बंद पडले असे प्रश्नात नमूद केले आहे हे खरे नसून फक्त 163 उद्योग बंद पडले आहेत. एमआयडीसी वसाहतीतील रस्त्याची लांबी 48 कि.मी.असून 33 कि.मी.चे रस्ते पूर्ण झाले आहेत व उर्वरित 15 कि.मी.चे रस्ते मे, 2015 पर्यंत पूर्ण होणार आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

27-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E.3

SGB/ KTG/ AKN/ 11:40

ता.प्र.क्र.2930.....

श्री.प्रवीण पोटे-पाटील.....

एन ब्लॉकमध्ये वसाहतनगर विकसित करीत आहोत. तेथे पथ दिवे लावण्याचे काम जून 2015 पर्यंत पूर्ण होईल. वसाहतनगरमधील रस्त्यांचे काम पूर्ण होणार आहे. जलवाहिनी 38 कि.मी.ची पूर्ण झालेली आहे. त्या ठिकाणी काम अपुरे आहे म्हणून उद्योगधंदे बंड पडतात हे खरे नाही. उद्योगधंदे बंद पडण्याची कारणे शोधली असता असे दिसून आले की, अपुरे पाठबळ, बाजारपेठेचा अभाव यामुळे काही उद्योगधंदे बंद पडत आहेत.

-------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुंबई,ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाबाबत**

**(४) *३३७८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी आपल्या विविध मागण्यांबाबत आणि वसतीगृहातील दुरावस्थेबाबत उपोषण आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) उपरोक्त प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे आणि याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) राज्यातील वसतीगृहे आणि आश्रमशाळा यांची दुरवस्था संपवण्यासाठी शासनाने धोरण आखले आहे व त्याचे स्वरूप काय आहे ?

**श्री. विष्णू सवरा :** (१) अंशतः खरे आहे.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अंतर्गत शासकीय वसतीगृहातील विद्यार्थी / विद्यार्थीनी त्यांच्या मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी दि. ४.१२.२०१४ व दि. १०.१२.२०१४ रोजी अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालयात आले होते. त्याचप्रमाणे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्या अंतर्गत शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागण्यांसंदर्भात दि. १९.१२.२०१४ रोजी शासकीय मुलांचे वसतीगृह, पनवेल येथे एकत्र येऊन उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे. तथापि अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे हा विभाग वगळता राज्यात इतर ठिकाणच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आंदोलन वा उपोषण केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) विद्यार्थ्यांच्या मागण्या या प्रामुख्याने आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. ११ नोव्हेंबर, २०११ मधील तरतुदीनुसार सोयी-सुविधा पुरविण्याशी संबंधित आहेत.

(३) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अधिनस्त ७ प्रकल्प कार्यालयांतर्गत असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. ११ नोव्हेंबर, २०११, शासन शुध्दीपत्रक दि. १०.४.२०१३ व शासन शुध्दीपत्रक दि. २९.६.२०१३ नुसार सोयी-सुविधा पुरविण्याची कार्यवाही प्रकल्प स्तरावर केली जाते.

भाडयाच्या इमारतीमध्ये सुरु असलेल्या वसतीगृहांमध्ये शासनाच्या निकषाप्रमाणे सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जागेअभावी मर्यादा येतात. सदर बाब वगळता इतर आवश्यक सर्व मुलभूत सोयी-सुविधा शासन निकषाप्रमाणे पुरविण्यात येत आहेत. त्याकरीता आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) शासकीय वसतिगृहे व शासकीय आश्रमशाळांकरीता शासकीय अथवा खाजगी जमीन संपादित करुन त्यावर इमारत बांधण्याचा कार्यक्रम सुरु आहे, जेणेकरुन निवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहात व आश्रमशाळेत जागेअभावी येणाऱ्या अडचणी दूर होऊन सर्व सोयी-सुविधा उपलब्ध होऊ शकतील. आश्रमशाळेतील मुलांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. २१ डिसेंबर, २००९ नुसार जेवण तसेच भौतिक व शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी ३७ वैद्यकीय पथकांची स्थापना केलेली आहे. आश्रमशाळेतील स्वच्छतेसाठी uस्वच्छ भारत - स्वच्छ आश्रमशाळा ही मोहिम युनिसेफच्या सहकार्याने दि. ११.३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सुरु केली आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.३३७८.....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला अंशतः खरे आहे असे उत्तर देण्यात आले आहे. राज्यातील सर्वच वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींनी पनवेल येथे आंदोलन केले होते. राज्यात विशेषतः मुलींच्या वसतिगृहांची अवस्था फार वाईट आहे. तेथे टॉयलेटची सुविधा नाही. पाण्याची सोय नाही. त्यामुळे मुली वारंवार आजारी पडतात. त्याबद्दल उत्तर देण्यात आलेले नाही. कँप किती घेणार याची माहिती दिली आहे. कोणत्या गैर सुविधा आहेत त्याचे निराकरण ठराविक वेळेत होणार आहे काय?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, हे खरे आहे की, मुलांच्या आणि मुलींच्या वसतिगृहामध्ये काही गैरव्यवस्था आहेत किंवा पूर्ण सुविधा नाहीत. याचे कारण असे की, ज्या ठिकाणी विभागाचे स्वतःचे बांधकाम आहे त्या ठिकाणी पूर्णपणे व्यवस्था देऊ शकतो. परंतु ज्या भाड्याच्या इमारती आहेत त्या ठिकाणी सर्व सुविधा पुरविण्यात अडचणी येतात. नजिकच्या काळात बांधकामावर विशेष लक्ष दिले आहे. त्याप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी बांधकामे होतील त्या ठिकाणी शासनाने कबूल केलेल्या सर्व प्रकारच्या सुविधा देण्यात येतील.

-----------------

...६..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**वसईतील (जि.पालघर) संजय गांधी निराधार योजनेतील ३०० लाभार्थ्यांची झालेली उपासमार**

(५) * **४०८६ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनील तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसईतील (जि.पालघर) तहसिलदार कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना कार्यालयाच्या मनमानी कारभारामुळे सुमारे ३०० गोरगरीब लाभार्थ्यांना गेल्या जून, २०१४ या महिन्यापासून आर्थिक लाभ मिळालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने ३०० लाभार्थ्यांना त्यांचे थकित लाभ तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप कांबळे, श्री. राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील संजय गांधी योजना समितीने दि. १९/६/२०१४ रोजीच्या बैठकीत एकूण १४३ अर्जांपैकी १२१ अर्ज मंजूर केले व उर्वरित २२ अर्ज कागदपत्रांचे पूर्तता अभावी/निकष पूर्ण करीत नसल्यामुळे नामंजूर केले.

तद्नंतर संजय गांधी योजना समितीचा बैठक दि. ४/३/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली. या बैठकीत माहे जुलै, २०१४ ते फेबुवारी २०१५ या कालावधीत प्राप्त झालेल्या एकूण ३१८ अर्जांपैकी २२७ अर्ज समितीने मंजूर केले व ९१ अर्ज नामंजूर केले.

संजय गांधी योजना समितीची बैठक जुलै, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत विधानसभा निवडणूक आचारसंहिता तसेच पालघर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक आचारसंहिता तसेच अन्य कारणांमुळे आयोजित करता आली नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, माहे जून, २०१४ रोजीच्या संजय गांधी योजना समितीच्या बैठकीत मंजूर केलेल्या लाभार्थ्यांचे अनुदान माहे जून २०१४ पासून सुरु करण्यात आले आहे. तसेच माहे मार्च, २०१५ मधील बैठकीत मंजुरी दिलेल्या लाभार्थ्यांचे अनुदान सुरु करण्यासाठी कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे. जून, 2014 पासून मार्च, 201 पर्यंत बैठका झालेल्या नाहीत. कारण आचारसंहिता लागू होती असे म्हटले आहे. आचारसंहिता 9 महिने लागू होती का? त्याचबरोबर 28 फेब्रुवारी, 2015 पर्यंत वसई तालुक्यामध्ये संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या किती आहे, या लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाची रक्कम किती आहे?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, साधारणत: या कालावधीत लोकसभा व विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झालेल्या होत्या. त्यामुळे विलंब झाला हे खरे आहे. साधारणत: जानेवारी, 2015 पर्यंतची लाभार्थ्यांची संख्या 318 असून 227 जणांना प्रत्यक्षात अनुदान

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दिलेले आहे.

...7...



**सभापती** : मंत्री महोदय, आपण माननीय सदस्यांची भावना लक्षात घ्यावी आणि जो न्याय द्यायचा असेल तो द्यावा. आचारसंहितेच्या काळात जो अनुशेष निर्माण झाला आहे तो दूर करण्याच्या संदर्भात आपण संबंधितांना निर्देश द्यावेत.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, तातडीने निर्देश देण्यात येतील.

-----------------

...८...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शेंद्रा व वाळूज (औरंगाबाद) एम.आय.डी.सी. प्रशासनाने लघुउद्योजकांना जागा देण्यासाठी दोन वर्षापूर्वी मागविलेल्या अर्जाबाबत**

**(६) * ३९३४ श्री.सतिश चव्हाण, श्री.संदीप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंद्रा व वाळूज (औरंगाबाद) मध्ये लघुउद्योजकांना जागा देण्यासाठी एम.आय.डी.सी. प्रशासनाने दोन वर्षापूर्वी लघुउद्योजकांकडून अर्ज मागविले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अर्जानुसार लघुउद्योजकांना लहान औद्योगिक प्लॉट देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रवीण पोटे-पाटील, श्री. सुभाष देसाई यांच्याकरिता :** (१) शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात ऑक्टोंबर २०१० पासून ऑनलाईन अर्ज सेवा सुरु असल्यामुळे एकूण ११४६६ अर्जदारांनी ऑन लाइनद्वारे भूखंडाची मागणी केली होती. परंतु, सदर क्षेत्रात भूखंड वाटपास उपलब्ध नसल्यामुळे सदर अर्जदारांना अतिरिक्त शेंद्रा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड घेण्यास संमती आहे काय, अशी विचारणा करण्यात आली होती.
(२) अतिरिक्त शेंद्रा औद्योगिक क्षेत्राकरीता संपादित केलेल्या जमिनीवर केंद्र व राज्य शासनामार्फत संयुक्तिक दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर हा प्रकल्प राबविण्यात येणार असल्यामुळे सदर क्षेत्रामधून जागा वाटप करण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्राप्त झालेले सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मंत्री महोदयांना उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे काय?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करु इच्छितो. प्रश्न क्रमांक-1 च्या उत्तरामध्ये "शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात ऑक्टोबर, 2010 पासून ऑनलाईन अर्ज सेवा सुरु असल्यामुळे" असे म्हटले आहे त्या ऐवजी "शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात पूर्ण ऑनलाईन अर्ज सेवा सुरु असल्यामुळे" असे वाचावे.

नंतर एफ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3934...

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सदरील प्रश्न हा शेंद्रा व वाळूज येथील लघुउद्योजकांना जागा देण्यासंबंधातील आहे. उत्तरात केवळ शेंद्राच्या संबंधातील माहिती आहे. वाळूजच्या संदर्भातील उल्लेख लेखी उत्तरात करण्यात आलेला नाही. तेव्हा हा प्रश्न राखून ठेवावा. कारण लेखी उत्तरात वाळूजसंबंधात उल्ल्ेखच नाही.

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वाळूज संबंधी प्रश्न विचारावेत मी त्याची तोंडी उत्तरे देण्यास तयार आहे.

**सभापती :** असे करता येत नसल्यामुळे मी हा प्रश्न राखून ठेवतो.

....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू असलेली समाजकार्य महाविद्यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे वर्ग करण्याबाबत**

(७) * **३७६८ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू असलेली समाजकार्य महाविद्यालये प्रशासनाच्या दृष्टीने अधिक सुसुत्रता यावी यादृष्टीने सामाजिक न्याय विभागाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, शासनाने केलेल्या कार्यवाही स्वरुप काय आहे,
(३) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप कांबळे,श्री. राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१) व (२) समाजकार्य महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे वर्ग करण्याचा प्रस्ताव त्या विभागाकडे सहमतीसाठी पाठविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, समाजकार्य महाविद्यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे वर्ग करण्याचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाने कधी पाठविला आहे व सदर प्रस्ताव प्रलंबित असण्याचे कारण काय आहे ?

श्री.दिलीप कांबळे : माननीय सभापती महोदय, दिनांक 2.8.2014 रोजी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्यावर कार्यवाहीचे काम सुरू आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3768....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, दोन्ही विभागाचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे महाविद्यालये हस्तांतरित करावयाची आहेत. त्यामुळेच समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना वेतन मिळत नाही. त्यांना सहावा वेतन आयोग लागू करता येत नाही. अशा अडचणी आज त्यांच्या समोर आहेत. आपल्या राज्यात अशी फक्त 15 महाविद्यालये आहेत. ती आपण उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे वर्ग केली पाहिजेत. या विभागाच्या अंतर्गत सर्व महाविद्यालये येतात. त्यामुळे समाजकार्य महाविद्यालये देखील वर्ग करण्यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे त्यास विभागाची संमती नाही काय ?

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सभापती महोदय, हा प्रश्न दोन वर्षा पूर्वी मीच या सभागृहामध्ये उपस्थित केला होता व त्यावेळी यासंबंधातील निर्णय करून घेतला होता. पण त्यावेळी मी प्रश्न मांडताना ॲकेडमिक उपयोगितेचा विचार केला होता. आता सन्माननीय सदस्य प्रश्न उपस्थित करताना वेतनश्रेणीचा मुद्दा मांडत आहेत. ते त्यांचे कामच आहे. सदर फाईल आमच्याकडे आलेली आहे आम्ही हे पुढच्या महिन्यात करून घेऊ.

......

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मराठा आणि मुस्लिम आरक्षणाला उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती**

(८) * **२८३६ डॉ.अपूर्व हिरे: तारांकित प्रश्न क्रमांक १४१६ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा आणि मुस्लिम आरक्षणासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयास दिलेल्या स्थगितीसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यासाठी करण्यात येणाऱ्या व इतर अनुषंगिक कार्यवाहीचे संनियंत्रण करण्यासाठी मा.मंत्री, शालेय व उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येवून अपिल दाखल करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अपिल दाखल करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, मराठा व मुस्लिम आरक्षणासंदर्भात राज्य शासनाचे धोरण काय आहे, मा.सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात यापूर्वी दिलेले आदेश व आरक्षणाची विहीत केलेली एकूण मर्यादा यानुषंगाने पुढे कोणती कारवाई करणे प्रस्तावित आहे,
(४) नसल्यास, उक्त कार्यवाहीस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले : (१) व (२)**
मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे.
(३) मराठा आरक्षणाबाबत शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षणाबाबत सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, दि.९/१/२०१५ रोजी पारित केला आहे. दि. २१/२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशापूर्वी सदर आरक्षणांतर्गत झालेले शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश व शासकीय निमशासकीय सेवेतील नेमणूका अबाधित राहतील असे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच स्थगितीपूर्वी नोकरीकरिता जाहिरात दिली असल्यास सदर प्रवर्गाची पदे मा. उच्च न्यायालयाच्या अंतीम आदेश होईपर्यंत भरण्यात येऊ नयेत असेही आदेश देण्यात आलेले आहेत.
मुस्लिम आरक्षणाची बाब शासनाच्या विचाराधीन असून अनुषंगिक बाबी तपासण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2836...

श्री.अपूर्व हिरे : सभापती महोदय, मराठा आणि मुस्लिम समाजाला आरक्षण दिल्यानंतर न्यायालयाने हे आरक्षण रद्द केले आहे. सदर आरक्षण रद्द करण्यामागे न्यायालयाची नेमकी भूमिका कोणती आहेत आणि यासंबंधात राज्य शासनाची पुढे कोणती भूमिका राहणार आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, हा प्रश्न न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहे. त्यामुळे या प्रश्नावर फार मोठे भाष्य करता येणार नाही.

**सभापती :** मंत्री महोदय, आपण न्यायालयाच्या निर्णयावर टिपणी करण्याचा सन्माननीय सदस्यांचा उद्देश दिसत नाही. न्यायालयाने अट्रा व्हायरस का ठरविले आहे त्यासंबंधी खुलासा करावा.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मराठा आणि मुस्लिम आरक्षणासंबंधातील हा विषय आहे. मुळातच सरकार या दोन्ही समुदायाला आरक्षण देण्यास अनुकूल आहे. यात कायदेशीर मार्ग काढून लवकरात लवकर निर्णय होण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. दोन्ही समुदायाला आरक्षण देण्यासाठी शासन अनुकूल आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, शैक्षणकि संस्थांमधील प्रवेश व शासकीय, निमशासकीय सेवेतील नेमणुका अबाधित राहतील. तसेच, स्थगितीपूर्वी नोकरीकरिता जाहिराती दिली असल्यास सदर प्रवर्गाची पदे मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम आदेश होईपर्यंत भरण्यात येऊ नयेत असेही आदेश देण्यात आलेले आहेत. अतिशय चांगला निर्णय सरकारने घेतलेला आहे. पण याची अंमलबजावणी होत नाही. नोकरीची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर, मुलाखती झाल्यानंतर, नोकरीत रूजू होण्याचे ओदश निघालेत पण उमेदवारांना रूजू करून घेतले नाही अशी अनेक प्रकरणे माझ्याकडे आलेली आहेत. मी आपल्याला उदाहरण म्हणून सांगतो की, कंत्राटी पद्धतीवर ग्रामसेवकांच्या नेमणुका झाल्या त्यांना रूजू सुद्धा करून घेतले नाही. तेव्हा यासंबंधी शासन त्यांना सेवेत रूजू करून

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2836....

श्री.विनायक मेटे...

घेण्यासंबंधी, शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासंबंधी परत स्पष्ट आदेश काढणार आहे काय ? हिवाळी अधिवेशनात आपण मराठा आरक्षणासंबंधीचा कायदा केला. न्यायालयाची अध्यादेशाला स्थगिती असून कायद्याला स्थगिती नाही. तेव्हा त्या कायद्याची अंमलबजावणी शासन त्वरित करणार आहे काय, तसेच मुस्लिम समाजाला आरक्षण लागू करण्यासंबंधातील अध्यादेश शासन परत काढणार आहे काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, आरक्षण लागू केल्यानंतर ते न्यायालयाने स्थगिती देईपर्यंतच्या मधल्या काळात ज्या ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असेल किंवा ज्या उमेदवाराला नोकरीचा कॉल येऊन नोकरी लागली असेल अशा सर्व लाभार्थींना कायद्यानेच संरक्षण आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, शासनाचे आदेश अस्पष्ट आहेत. त्यामुळे त्यांनी उत्तरामध्ये दुरूस्ती केली पाहिजे.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मी सुरूवातीला सांगितल्याप्रमाणे मधल्या काळात मराठा किंवा मुस्लिम समाजाला या कायद्या अनुसार नोकरी मिळाली असेल, महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळाला असेल त्या सर्वांना संरक्षण आहे. कायद्यात अस्पष्टता आहे असे सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांचे म्हणणे आहे. ती अस्पष्टता तपासून दुरूस्त करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना विसंगती निर्माण केली आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, दोन्ही समाजाला आरक्षण देण्यात आले असून मराठा समाजाच्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. मुस्लिम समाजाला शैक्षणिक लाभ घेण्यास अनुमती दिलेली आहे. मात्र, नोकरीमधील आरक्षणाला स्थगिती दिलेली आहे. यासंबंधी राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील केले असून ते प्रलंबित आहे. हिवाळी अधिवेशनामध्ये आपण नव्याने कायदा आणला होता. तो कायदा मंजूर झाला आहे. कायदा मंजूर झाला असेल तर त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यास न्यायालयाचा प्रत्यवाय नाही. त्यामुळे मराठा आरक्षणाची तातडीने कार्यवाही करावी असा माझा पहिला प्रश्न आहे. मुस्लिम समाजाच्या आरक्षणासबंधी उच्च न्यायालयाने शैक्षणिक सुविधा लागू करण्यासंबंधी कुठल्याही प्रकारची स्थगिती दिलेली नसताना ती सुविधा न

...7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2836...

श्री.सुनील तटकरे...

देण्याची कारणे काय आहेत तसेच, मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यासंबंधी शासन नेमकी कार्यवाही कधी करणार आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,.....

श्री.सुनील तटकर : सभापती महोदय, संबंधित विभागाचे माननीय मंत्री उपस्थित असल्यामुळे त्यांनाच उत्तर देण्यास अनुमती देण्यात यावी. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना उत्तर देण्यास अनुमती देऊ नये.

**सभापती :** माझी माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना सूचना आहे की, संबंधित विभागाच्या माननीय मंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर मग आपण पूरक माहिती देऊन सभागृहाला अवगत करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कलेक्टीव्ह रिस्पॉन्सीबीलीटी असते म्हणून मी उभा राहिलेलो आहे.

**सभापती :** कलेक्टीव्ह रिस्पॉन्सीबीलीटी असते याची मला जाणीव आहे. परंतु, संबंधित खात्याचे माननीय मंत्री उपस्थित असतील तर त्यांनी प्रथम उत्तर दिले पाहिजे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आपण जे निदेश देत आहात ते आम्हाला मान्य आहेत. मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी असते हे आपल्याला माहीत आहे. यासंबंधी जी समिती नेमली होती त्या समितीचे सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडे हे सदस्य आहेत. माननीय मंत्र्यांनी या अगोदर उत्तरे दिली नाहीत असे नाही.

**सभापती :** मी काय म्हणालो ते सन्माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांनी नीटपणे लक्षात घ्यावे. संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित असतील तर त्यांनी प्राथम्याने उत्तर द्यावे. परंतु, त्यात जास्त काही ॲड करावयाचे असेल तर ते आपण नंतर करू शकता.

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो अत्यंत महत्त्वाचा आहे. मराठा आरक्षणासंबंधी उच्च न्यायालयामध्ये सुनावणी सुरू आहे. दिनांक 7.4.2015 रोजी सुनावणी आहे. त्यामुळे यावर जास्त काही भाष्य करता येणार नाही. माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 14 नोव्हेंबर 2014 रोजी स्थगिती दिली आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:3934....

श्री. राजकुमार बडोले .....

सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेले आरक्षण अबाधित राहील असे सांगण्यात आले होते. दि.14 नोव्हेंबर, 2014 पूर्वी शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाच्या आधारे उमेदवारांच्या नेमणुका झाल्या असतील त्यासंदर्भात माननीय उच्च न्यायालयाच्या अधीन राहून त्या नेमणूका कायम राहतील. दि. 14 नोव्हेंबर, 2014 पूर्वी शैक्षणिक व सामाजिकदृष्या मागासप्रवर्गाच्या आरक्षणाच्या आधारे शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना व शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी अशा सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या असून त्या सूचनांचे पालन झालेले आहे.

सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजाचा जो प्रश्न आहे त्यासंदर्भात....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यासभागृहाचा मी गेल्या 12 वर्षापासून सदस्य असून या सभागृहात अनेक वेळा माजी माननीय मंत्री श्री. नारायण राणे तसेच माजी स्व.गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी त्यांच्या विभागाचा प्रश्न नसतांनाही उत्तर दिलेले आहे. आम्हाला उत्तर घेण्यामध्ये रस असतो. उत्तर कोण देतो त्याला अडवण्यामध्ये आम्हाला अजिबात रस नव्हता. आपल्याला हा विषय सोडवायचा आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे असे आम्हाला प्रामाणिकपणे वाटते. सरकारकडून पॉझिटीव्ह उत्तर कसे मिळेल यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे.

**सभापती :** आपल्या भूमिकेबद्दल मला माहिती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माजी स्व. मंत्री श्री. आर.आर.पाटील यांचा विषय नसतांना सुध्दा ते बोलत होते. त्यावेळेस काय मंत्री सक्षम नव्हते ? मी उत्तर देण्यासाठी उभा राहिलो असतांना मला बसवण्यात आले हा खरा प्रश्न आहे.

..2..



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्री. विनोद तावडे......

सभापती महोदय, मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात मी उत्तर देण्यासाठी उभा राहिलो आहे. मराठा आरक्षणाच्या समिती मध्ये मी तसेच माननीय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील,माननीय श्री. अजित पवार, माननीय श्री. विनायक मेटे तसेच सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे सुध्दा होते. आम्ही सर्व कोर्ट किंवा कोर्टाच्या बाहेर सातत्याने पाठपुरवा करीत आहोत. माननीय श्री. मेटे साहेबांनी म्हटल्या प्रमाणे कोर्टाने स्थगितीच्या आरक्षणाला संरक्षण दिले असून त्याचे पालन आपण केले पाहिजे. यासंदर्भात कॅबिनेटने स्पेसिफिक निर्णय घेतलेला असून त्याप्रमाणे आदेश सुध्दा निर्गमित झालेले आहेत. अशा पध्दतीची कोणत्याही संस्थेची स्पेसिफिक तक्रार असेल तर कृपया ती तक्रार आपण आमच्याकडे दिली तर त्यासंदर्भात योग्य ती कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, आपल्या सर्वांच्या मनात शंका आहे की, अध्यादेशाचे हेअरींग कोर्टात सुरु असून त्यासंदर्भात आपण कायदा पारित केलेला आहे. कायद्याप्रमाणे अंमबजावणी करण्याचा विचार कन्टेम्प्ट होईल अशा सूचना आल्यानंतर सुध्दा तो विषय आम्ही कॅबिनेटमध्ये घेतला. परंतु आता कोर्टाने अध्यादेशाच्या कायद्याचा मुद्दा सुध्दा प्रेअरमध्ये ॲड करण्याची परवानगी कोर्टाने दिली आहे. आज या विषयाच्या संदर्भात हिअरिंग होते परंतु ते पुढे ढकलले गेले आहे. यामुळे यापुढे सरकारच्या मर्यादा राहू शकतात. परंतु तरी सुध्दा या अगोदरही कन्टेम्प्टचा धोका पत्करुन मराठा आरक्षणाचा मुद्दा कॅबिनेटपुढे घेण्यात आला होता एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देऊन बर्हिगमन करतात.)

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** ज्येष्ठ साहित्यिक प्रा.भालचंद्र नेमाडे यांना "ज्ञानपीठ"पुरस्कार मिळाल्याबाबत अभिनंदन
**मु.शी.:** ज्येष्ठ साहित्यिक प्रा.भालचंद्र नेमाडे यांना "ज्ञानपीठ"पुरस्कार मिळाल्याबाबत अभिनंदनाचा प्रस्ताव

**सभापती** : "ज्येष्ठ साहित्यिक लेखक, कादंबरीकार, समीक्षक, कवी म्हणून साहित्य क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविणारे प्रा.भालचंद्र नेमाडे यांचा जन्म 27 मे, 1938 रोजी जळगाव जिल्ह्यातील सांगवी येथे झाला. त्यांनी पुणे विद्यापीठातून पदवी तर मुंबई विद्यापीठातून पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेऊन अहमदनगर, धुळे, औरंगाबाद, मुंबई व गोवा येथे अध्यापनाचे कार्य केले. लहानपणापासून साहित्याची विलक्षण आवड असणाऱ्या नेमाडे यांनी अवघ्या पंचविशीत असताना "कोसला" ही कादंबरी लिहिली. ती खूपच गाजली. त्यामुळे साहित्य क्षेत्रात त्यांची ओळख 'कोसलाकार' म्हणूनच झाली. त्यांनी मराठी साहित्यविश्वात स्वत:चे वैशिष्टपूर्ण स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या 'बिढार','जरीला' व 'झुल' या कादंबऱ्यांनी तर साहित्य रसिकांना वेगळी अनुभूती दिली. त्याचबरोबर त्यांचे 'मेलडी' आणि 'देखणी' हे काव्यसंग्रह खूपच लोकप्रिय झाले. 'साहित्याची भाषा' आणि "टिकास्वयंवर", 'तुकाराम' हे समिक्षा ग्रंथ त्यांनी लिहिले. "हिंदू-जगण्याची समृध्द अडगळ" ह्या महाकादंबरीला तर अनेक पुरस्कार मिळाले. त्यांनी मराठी साहित्य क्षेत्रातील कादंबरी, काव्य व समिक्षा लेखानातून पारंपरिक रुढी परंपरेच्या अनिष्ठ प्रथा विरुध्द आवाज उठविला. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील अव्दितीय कामगिरीबद्दल त्यांना "ह.ना.आपटे पुरस्कार", "यशवंतराव चव्हाण पुरस्कार", "साहित्य अकादमी पुरस्कार" व कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा "जनस्थान" पुरस्कार तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने त्यांना "डि. लिट" पदवी देऊन त्यांचा सन्मान केला. तसेच सन 2011 मध्ये भारत सरकारने 'पद्मश्री' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे. मराठी साहित्यात आपल्या असामान्य लेखन कर्तृत्वाने मराठी साहित्याला समृध्द करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यीक प्रा.भालचंद्र नेमाडे यांना दिनांक 06 फेब्रुवारी, 2015 रोजी भारतीय साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असणारा "ज्ञानपीठ पुरस्कार" जाहीर झाला आहे. मराठी भाषा वैभवाला समृध्द करणाऱ्या वि.स.खांडेकर,वि.वा.शिरवाडकर,व विंदा करंदीकर यांच्यानंतर प्रा. भालचंद्र नेमाडे हे चौथे इ ाानपीठ पुरस्कार विजेते ठरले आहेत. सभागृहाने या आनंददायी क्षणाची नोंद घ्यावी यासाठी मी हा अभिनंदनपर प्रस्ताव मांडतो आणि साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असणारा "ज्ञानपीठ पुरस्कार" मिळाल्याबद्दल सर्वांच्यावतीने प्रा.भालचंद्र नेमाडे यांचे अभिनंदन करतो. प्रा.भालचंद्र नेमाडे यांचा अभिनंदनपर प्रस्ताव या सभागृहाने एकमताने संमत केला आहे. अभिनंदनपर प्रस्तावाची प्रत त्यांच्याकडे पाठविण्यात येईल.

---

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION



**पृ.शी./मु.शी.:**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित, नवी मुंबई यांचा सन 2011-2012 या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. दिलीप कांबळे (सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ,मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये अल्पसंख्याक विकास विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय(अविभाज्य भागासह प्रयत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मा.राज्यपाल महोदयांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन 2015-2016 च्या वार्षिक आखणीच्या नियोजनाबाबतचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :**वार्षिक आखणीच्या नियोजनाबाबतचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. दिलीप कांबळे (सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2011-2012 व 2012-2013 या वर्षाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**निमय 260 अन्वयेच्या मराठवाडयाच्या चर्चेबाबत**

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनचा मुद्दा आहे. मराठवाडयाच्या संदर्भात नियम 260 ची चर्चा अपूर्ण आहे. त्यामुळे ही चर्चा कधी घेण्यात येणार आहे.

**सभापती :** मराठवाडयाच्या संदर्भातील चर्चा पुढील आठवडयात घेतली जाईल.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभागृहातील कामकाजाच्या संदर्भात पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.माणिकरराव ठाकरे : सभापती महोदय, मला कामकाजासंदर्भात माहिती पाहिजे की, आपण आठवड्यातील पाच दिवसांपैकी सतत चार दिवस शासकीय कामकाज घेत आहोत. आठवड्यातील शेवटचा दिवस हा अशासकीय काजकाजासाठी असतो. अशासकीय कामकाज हा सदस्यांचा अधिकार आहे. परंतु आजसुद्धा अशासकीय कामकाजाचा दिवस असताना अशासकीय कामकाजाच्या अगोदर दोन शासकीय विधेयके दाखविण्यात आलेली आहेत त्यामुळे अशासकीय कामकाजावर बंधन येते.

माझा दुसरा मुद्दा, आपण यापूर्वी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये शेवटच्या पाच मिनिटांमध्ये प्रश्नोत्तराच्या यादीतील कोणत्याही क्रमांकावरचा महत्वाचा प्रश्न चर्चेसाठी घेत होतो. आपल्या सभागृहात ती प्रथा पडली होती आणि अनेक वर्षे सुरु होती. तेव्हा आपण प्रश्नोत्तराच्या तासासाठी शेवटच्या पाच मिनिटांमध्ये एक महत्वाचा प्रश्न चर्चेसाठी घ्यावा अशी आपणास माझी विनंती आहे.

**सभापती** : प्रा.ना.स.फरांदे हे सभापती असताना त्यांनी ही पद्धत अमलात आणली होती. नंतर ती पद्धत बंद करण्यात आली. आपणास ती पद्धत पुन्हा सुरु करावयाची असेल तर त्या संदर्भात गटनेत्यांशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माझ्याकडे आज दिनांक 27 मार्च, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "भाटसावंगी, ता.जि.बीड ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत मग्रारोहयोच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी "श्रीमती नाथाबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या पुणे येथील विद्यार्थीनींनी रितसर प्रवेश परीक्षा व मुलाखत, शिकवणी फी भरुन देखील त्यांना परीक्षेस बसण्याची संधी न देता 8 महिन्यानंतर न्युट्रीशन सायन्सची पदवी नसल्याचे कारण दाखवून अपात्र ठरविल्याने त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी " मुंबईतील मौजे कांजूर, ता.कुर्ला येथील न.भू.क्र.15 येथे मॅरेथॉन ग्रुप व भांडूप इस्टेट यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्विकास योजनेबाबत बोगस प्रस्ताव मंजुरीसाठी दाखल केल्याचे माहे फेब्रुवारी, 2015 मध्ये निदर्शनास येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "मुंबईतील नळबाजार येथे मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या 11 वर्षीय विद्यार्थिनीवर शाळेच्या सफाई कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याचे दिनांक 24 मार्च, 2015 रोजी उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**नियम 93 अन्वये सूचनेवरील निवेदना संदर्भात**</u>

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण या ठिकाणी नियम 93 अन्वयेवरील निवेदन पुकारले. आज फक्त एकच निवेदन चर्चेसाठी आहे. याठिकाणी माननीय गृहराज्यमंत्री उपस्थित नाहीत ही अतिशय गंभीर बाब आहे. आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर त्या सूचनेची मेरीट पाहून आपण शासनास निवेदन करण्याचे आदेश देता, परंतु ही निवेदन विहित कालावधीत देण्यात येत नाहीत. आम्ही पहिल्या आठवडयात "पुणे जिल्ह्यातील लोणावळा येथील हॉटेल कुमार रिसॉर्टमध्ये एका सात वर्षीय मुलीचा गळा चिरुन करण्यात आलेली निर्घृण हत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्या संदर्भातील निवेदन उशिरा देण्यात आलेले आहे आणि याठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित नाहीत. ही अतिशय गंभीर बाब आहे. तेव्हा आपण सभागृहाचे कामकाज थांबवावे अशी विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विधानसभा सभागृहात प्रश्नोत्तराचा तास सुरु असल्यामुळे माननीय गृह राज्यमंत्री तेथे गेले आहेत.

**सभापती** : ठीक आहे. आपण माननीय गृह राज्यमंत्र्यांची वाट पाहू तोपर्यंत मी पुढील कामकाज घेत आहे.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**सभापती/उप सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

ॲड.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मुंबई वरळी-वांद्रे हा सी-लिंक महामार्ग लहान वाहनांसाठी तयार करण्यात आला असून या महामार्गावरुन वरळीवरुन वांद्र्याला कमी वेळात जाता येते. त्यामुळे या मार्गावरुन मोठ्या संख्येने वाहने ये-जा करीत असतात. या मार्गावर पोलिसांची गस्त अत्यंत कमी प्रमाणावर असून या सी-लिंकवरुन मागील दोन वर्षात अनेक आत्महत्येच्या घटना घडल्याचे दिसून आले आहे. आत्महत्येचे प्रमाण कमी होत नसून त्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. परिणामी स्थानिक परिसरातील जनतेत भीतीचे वातावरण पसरलले आहे. वरळी-वांद्रे सी-लिंकवर होत असलेल्या आत्महत्येच्या घटनांना आळा बसण्यासाठी तत्काळ पोलीस विभागामार्फत कार्यवाही वा उपाययोजना करण्याची गरज आहे. सदर विषय सार्वजनिक महत्वाचा असल्याने मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास शिफारस करीत आहे."

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./मु. शी.** : सातारा व सोलापूर या दोन जिल्ह्यातून जाणारा लोणंद ते पंढरपूर रेल्वे मार्ग पूर्ण करयाची कार्यवाही करणे याबाबत ॲड.रामहरी रुपनवर,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.रामहरी रुपनवर ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"सातारा व सोलापूर या दोन जिल्ह्यातून जाणारा लोणंद ते पंढरपूर रेल्वे मार्ग आहे. या रेल्वेमार्गाचा सर्व्हे 1908 साली पूर्ण करण्यात आला आहे. संपूर्ण रेल्वे मार्गाची जमीन संपादित झाली असून रेल्वे मार्गाच्या जमिनीला भारत सरकारने रेल्वे अशी नोंद आहे. त्या मार्गावर एकही नदी आडवी येत नाही तसेच डोंगर चढउतार नाही. या मार्गावर जवळपास 18 साखर कारखाने व अनेक दूध संघ व छोटे मोठे उद्योग आहेत. हा मार्ग झाल्यास दक्षिण काशी म्हणून समजल्या जाणाऱ्या पंढरपूरला भारतातील सर्व मार्ग जोडले जातील व लाखो वारकऱ्यांची प्रवासाची सोय होईल. तसेच या परिसरात उत्पन्न होणारा फळे-भाजीपाला व साखर वाहतुकीस फार मोठी मदत होईल. सध्या सदर मार्गाचे काम फलटणपर्यंत पूर्ण झाले असून राहिलेले 100 कि.मी.चे काम शिल्लक आहे. हा मार्ग पूर्ण होणे ही त्या परिसरातील लोकांची अत्यंत निकडीची व आवश्यक बाब आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाने तातडीने लक्ष देणे व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून हा रेल्वेमार्ग पूर्ण करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

( पुढे सुरु.....)

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

स्वाईन फ्ल्यू किंवा इबोला सारख्या रोगांच्या प्रसाराबद्दल आपण सर्वजण अतिशय जागरुकता दाखवत असतो. मात्र 1880 पासून अतिशय घातक आणि सहज लक्षात न येणाऱ्या क्षयरोगाबाबत शासन यंत्रणा विशेष दक्षता घेत नसल्याने आजमितीस क्षयरोगाने भारतात प्रतिवर्षी 19 लाख तर एकट्या मुंबईत प्रतिदिन सरासरी 18 व्यक्तींचा मृत्यू ओढवतो. या रोगावर इलाज करण्यासाठी मुंबईच्या शिवडी येथील एकमेव रुग्णालयातून उपचार केले जातात. मात्र तिथेही सर्वांना नियमित उपचार मिळत नसून या रुग्णांना वेळीच योग्य उपचार मिळाला नाही त्यांचा मृत्यू ओढवू शकतो. वर्षभरात किमान 15 लोकांना हा आजार होत असल्याचे उघडकीस आले असून क्षयरोगाच्या नियंत्रणासाठी शासनाने विनाविलंब पावले उचलून त्याची औषधे युद्धपातळीवर सर्व मनपा व शासकीय रुग्णालयातून उपलब्ध करुन देण्याची व योग्य जनजागृती करण्याची नितांत आवश्यकता असल्याने ही बाब मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

--------------

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेतून वगळण्यात आलेली 27 गावे पुन्हा महापालिकेमध्ये समाविष्ट करण्याच्या शासनाच्या अधिसूचनेला सर्वपक्षीय संघर्ष समितीने हरकत घेतली आहे. या गावांना पायाभूत सुविधा देण्यासाठी पुरेसा निधी पालिकेच्या तिजोरीत नसल्यामुळे पालिकेला या गावांचा फायदा होण्यापेक्षा पालिकेवर आर्थिक ताणच येणार असल्याचे स्थानिक नगरसेवकांनी या निर्णयाला एकमताने विरोध केलेला आहे. मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो की, या संबंधी सर्व स्टेट होल्डर्सना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा. एकतर्फी निर्णय घेण्यात येऊ नये. या ठिकाणी माननीय मंत्री उपस्थित आहेत त्यांनी या मुद्याची दखल घ्यावी अशी आपल्यामार्फत मी त्यांना विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री परवा डोंबिवलीला गेले असताना तेथे सर्वांनी हा विषय मांडला असता माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भात सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेण्यात येईल.

-------

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा निर्माण झालेला आहे. पालघर जिल्ह्याचे सर्व क्षेत्रातील कामकाज सुरु झाले आहे. इतर विभागांप्रमाणेच शिक्षण विभागाचे सुध्दा कामकाज सुरु झाले आहे. तथापि, शिक्षण विभागाच्या माध्यमिक विभागासाठी अद्यापपर्यंत पूर्णवेळ शिक्षणाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. आदिवासी विभागातील पूर्ण पदे भरण्याची आवश्यकता असताना मुंबईच्या शिक्षण निरीक्षकांकडे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) पदाचा तात्पुरत्या स्वरुपात कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. त्यामुळे ते कधी मुंबईला आणि कधी पालघरला असतात. परिणामी, पालघर जिल्ह्याच्या शिक्षण विभागातील अनेक कामे ठप्प झाली आहेत. ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर ठाणे जिल्ह्यात येणाऱ्या वसई, विरार, डहाणू, पालघर, मोखाडा या तालुक्यांच्या हजारो फाईल्स ठाणे शिक्षण विभागाने पालघर जिल्ह्याकडे हस्तांतरित केल्या आहेत. मुळात या फाईल्स ठाणे शिक्षण विभागाकडे वर्षानुवर्षापासून प्रलंबित होत्या. त्या फाईल्स पालघर जिल्ह्याकडे हस्तांतरित केल्यानंतर स्टाफ उपलब्ध नसल्यामुळे तेथे सुध्दा त्या प्रलंबितच आहेत. या विषयी शिक्षणाधिकारी दखल घेत नाहीत. मी एका महिन्यापूर्वी त्यांच्यासोबत या विषयासह अनेक विषयांवर चर्चा केली, परंतु त्यातील एकाही विषयाचा निर्णय होत नाही. सहा महिन्यांपूर्वी पाठविलेल्या सेवासातत्याच्या प्रस्तावांना शिक्षणाधिकारी मान्यता देत नाहीत. आर्थिक मागणीशिवाय कोणतेही काम होत नाही. ही अत्यंत गंभीर स्वरुपाची बाब आहे. या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून माझी मागणी आहे की, माननीय शिक्षण मंत्र्यांनी या सर्व बाबींची दखल घ्यावी. तसेच आदिवासी बहुल असलेल्या पालघर जिल्ह्याच्या शिक्षण विभागाकडे लक्ष द्यावे आणि त्या अधिकाऱ्याची चौकशी करावी."

श्री.विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जी बाब निदर्शनास आणून दिली ती खरी आहे. परंतु मी त्यांना सांगतो की, मागच्या सरकारने अधिकारी/कर्मचाऱ्यांना घालून दिलेल्या सवयी बदलविण्यासाठी या सरकारला थोडा वेळ द्यावा. आपण वेळ दिल्यास एक-दोन महिन्यामध्ये मी बदल करुन दाखवितो.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"दिनांक 25 फेब्रुवारी ते 1 मार्च, 2015 या कालावधीमध्ये गुजरात मधील भावनगर येथे प्रत्यक्ष निसर्ग चित्रण शिबिराचे आयोजन करण्यात येणे, त्या कला प्रदर्शनासाठी महाराष्ट्रातील गुणी कलावंतांना आमंत्रित करण्यात येणे, भावनगर शहरामध्ये कोणत्याही ठिकाणी चित्र रेखाटण्याची परवानगी देण्यात येणे, मुंबईतल्या गुणी 5 कलावंतांपैकी नानासाहेब येवले यांनी पलिताना येथे चित्र रेखाटण्यासाठी निवडलेली जागा फारशी वर्दळीची नव्हती. त्यांचे चित्र पूर्ण होत आले असतानाच एका पोलीस अधिकाऱ्याने नानासाहेब येवले यांना काम बंद कर असा दम देणे व ते काढत असलेल्या इझलला लाथ मारणे, इतकेच नव्हे तर कलावंतांवर हात उगारण्यात येणे, परिणामी गुजरात सरकारविषयी महाराष्ट्रातील कलावंतांमध्ये निर्माण झालेला असंतोष व निराशेची भावना, या बाबत उचित कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी मी या औचित्याया मुद्याद्वारे शासनास करीत आहे."

सभापती महोदय, हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. आपल्या राज्याच्या कलाकारांना गुजरातमध्ये आमंत्रित करुन कोणत्याही शहरात चित्र रेखाटण्याची परवानगी देण्यात आलेली असताना सुध्दा, एक कलाकार चित्र काढत असताना पोलिसांनी त्याला अशाप्रकारे दमबाजी करणे योग्य नाही. त्यामुळे या प्रकरणी आपले राज्य सरकार काय कारवाई करणार आहे, या बाबतचा खुलासा झाला पाहिजे.

---------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"महोदय, दिनांक 1 जुलै, 1998 रोजी अकोला जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन वाशिम जिल्ह्याची निर्मिती करण्यात येणे, जिल्हा विभाजनानंतर शालेय शिक्षण विभागांतर्गत अकोला जिल्हा परिषदेमधील शिक्षण विभाग मुख्यालयाकरिता एकूण 52 पदे मंजूर असणे, तथापि, अकोला जिल्हा परिषदेकडून वाशिम जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग मुख्यालयाकरिता एकही पद वर्ग करण्यात न येणे, वाशिम जिल्हा परिषदेच्या निर्मितील 16 वर्षे होऊन सुध्दा शालेय शिक्षण विभागाने आकृतिबंधानुसार नवनिर्मित वाशिम जिल्ह्याला अद्याप पदे मंजूर केलेली नाहीत. परिणामी, अपुऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांअभावी शिक्षण विभागाच्या कामकाजावर विपरित परिणाम होत असणे, या प्रकरणी वाशिम जिल्हा परिषदेकडून प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मा.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांना मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे मार्फत विविध 32 पदे मंजूर करण्याबाबत माहे डिसेंबर, 2012 मध्ये प्रस्ताव सादर करुन अद्यापही त्याबाबत कार्यवाही न झाल्याने शैक्षणिक विषयक कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे वाशिम जिल्हा परिषदेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार सदरची पदे तातडीने मंजूर करण्यात यावीत, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे."

महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांनी या औचित्याच्या मुद्याला न्याय दिला तर बरे होईल.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"माझ्या विधानपरिषद मतदारक्षेत्रांतर्गत येणाऱ्या चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात प्रभू राजारामजी शैक्षणिक संस्था, रेशीमबाग नागपूर या संस्थेच्या एकूण सहा शाळा कार्यरत आहे. या सर्व शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संस्था चालकांकडून सतत मानसिक त्रास होत असतो. संस्थेमध्ये नव्याने रूजू झालेल्या कर्मचाऱ्याला रूजू होतांनाच कोऱ्या कागदावर स्वाक्षरी घेऊन रूजू केल्या जाते. शालेय पटावर नोंद असलेल्या कर्मचाऱ्यांना शालेय वेळातच घरगुती व वैयक्तिक कामे सांगितली जातात. शाळेच्या पटावर असलेला कर्मचारी घरगुती वाहनावर वाहन चालक म्हणून काम करतो. गडचिरोली जिल्ह्यातील शाळेत असलेले कर्मचारी कार्यालयीन वेळेत सतत चंद्रपूर जिल्ह्यात निवासी असतात. एखाद्या शिक्षकाने संस्था चालकांचे ऐकले नाही तर कोणतीही पूर्वसूचना न देता संस्थेच्या जिल्ह्यातील एका शाळेतून संस्थेच्या दुसऱ्या जिल्ह्यातील शाळेत रूजू होण्याच्या सूचना दिल्या जातात, पगार थांबविण्याची धमकी दिली जाते. शाळेची सर्व महत्त्वाची कागदपत्रे शाळेच्या कार्यालयात न ठेवता संस्था संचालक आपल्या घरीच सर्व कागदपत्रे ठेवतात. या सर्व विषयाबाबत मी स्वतः शिक्षणाधिकारी, माध्यमिक चंद्रपूर, शिक्षणाधिकारी माध्यमिक, गडचिरोली, तसेच शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांच्याशी पत्र व्यवहार करून वस्तुस्थिती बाबत अवगत केलेले आहे. मात्र यापैकी कोणीही याची दखल सुध्दा घेतली नाही. मात्र मी तक्रार केली म्हणून संस्था चालकांनी मला तक्रार का केली़ म्हणून दूरध्वनीद्वारे धमकी दिली. या सर्व तक्रारीवर शासन उदासीन असल्यामुळे शालेय कर्मचारी व सामान्य नागरिकांच्या मनात शासनाविरूध्द रोष निर्माण झालेला आहे. शासन स्तरावर या विषयी कडक उपाययोजना करून कर्मचारी तसेच सामान्य नागरिकांना दिलासा देण्याची आत्यंतिक गरज आहे. या करिताच मी ही बाब औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे."

महोदय, शिक्षण उप संचालक आणि शिक्षणाधिकारी हे संस्था चालकाच्या पे-रोलवर आहेत. माझी मागणी आहे की, संबंधित अधिकारी आणि संस्था चालकावर माननीय मंत्र्यांनी कारवाई करावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अतिशय गंभीर मुद्दा मांडला आहे. संस्था चालक कर्मचाऱ्यांबरोबर कसा वागतो हे ऐकून वाईट वाटते. मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारांवर अंकुश ठेवता येईल या दृष्टीने राज्य सरकार बृहत योजना तयार करीत आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी जी बाब निदर्शनास आणून दिलेली आहे, त्या बाबत ताबडतोब चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री हे केवळ सत्ताधारी बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्यावरच सविस्तरपणे उत्तर देत आहेत. परंतु विरोधी बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्यावर केवळ 'होय' किंवा 'नाही' एवढेच म्हणतात, हे योग्य नाही.

श्री.विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्यांचा हा माझ्यावर आक्षेप आहे. माझी मागणी आहे की, त्यांचा आक्षेप रेकॉर्डवरुन काढून टाकावा. मी विरोधी बाजूचे सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त आणि श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्यावर उत्तर दिले आहे.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाअंतर्गत (बंदरे व परिवहन) असलेल्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मांडवा बंदर यांनी दिनांक 7/3/2014 रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत असे नमूद केले आहे की, दिनांक 13/1/2006 च्या अधिसूचनेनुसार फक्त रो-रो बोटीसाठी (अद्याप रो-रो बोटी सुरु नसल्याचे समजते) किंवा ज्या बोटीची नोंदणी व सर्व्हे प्रमाणपत्रावर पाळीव प्राणी, वाहने, माल अशाप्रकारची वाहतूक करण्याची परवानगी दिली आहे, अशा बोटीसाठी लागू होत असल्याने इतर बोटीसाठी सदर अधिसूचना लागू होत नसल्याने प्रवाशी वाहतुकीसाठी परवानगी असलेल्या बोटीमधून प्रवाशांव्यतिरिक्त पाळीव प्राणी, वाहने, माल यांची वाहतूक करु नये अन्यथा त्यांच्याविरुध्द उचित कारवाई करण्यात येईल, असे नमूद केले आहे. तर दिनांक 21/1/2014 च्या अधिसूचनेद्वारे प्रवाशी लॉंचमधून दुचाकी वाहनांची ये-जा बंद करावी असे नमूद केले आहे. वास्तविक पाहता विशिष्ट भौगोलिक परिस्थित असलेल्या व रस्त्याने प्रवास करण्यासाठी लागणाऱ्या वेळेत प्रामुख्याने बचत होऊन जल वाहतुकीचा प्रवास खर्च कमी व्हावा यासाठी तसेच सर्वसामान्य लोकांना आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखा असल्याने जल वाहतुकीचा पर्याय शासनाने उपलब्ध करुन दिला आहे. तसेच प्रवाशांना केवळ नाईलाजास्तव पाळीव प्राणी, वाहने व माल किंवा दुचाकी वाहने प्रवाशी बोटीतून आपल्यासोबत नेणे भाग पडत असते व गेल्या अनेक वर्षांपासून ही प्रथा सुरु आहे. त्याला अधिसूचनेद्वारे प्रतिबंध करणे अयोग्य आहे. तरी उक्त दोन्ही अधिसूचना परत घेण्यात याव्यात, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे."

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यातील पूर्व विदर्भातील जिल्ह्यांकरिता जिल्हा परिषद माध्यमातून प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर सन 2013-14 या वर्षात सोलर दुहेरी पंप (ड्युअल पंप) योजना राबविण्यात येणे, सन 2013 मध्ये जिल्हा परिषदेला सदर योजनाचा निधी प्राप्त होऊन जिल्हा परिषद माध्यमातून ग्रामपंचातीला पैसे देण्यात येऊन, त्या माध्यमातून कामे करण्यात येत असणे, परंतु, 2013-14 या वर्षात सदर पध्दत बंद करून ई-टेंडरिंगच्या माध्यमातून सदर योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेऊन त्याकरिता पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदया या जिल्ह्यांतील कंत्राट ऊर्जा क्युअर या कंपनीला तर उर्वरित भागातील कंत्राट विस्टार कंपनी व पर्ल्स एनर्जी या कंपन्यांना देण्यात येणे, शासनाने आरसी देण्यात येणे, परंतु पूर्व विदर्भातील गडचिरोलीला 65 सोलर पंप, गोंदियाला 30 सोलर पंप, चंद्रपूरला 60 सोलर पंप यांचे कंत्राट देणे, प्रत्येक पंपाची किंमत 5 लाख रूपये असून करार होऊनही सदर ऊर्जा क्युअर कंपनीकडून तीनही जिल्ह्यांत अजूनपर्यंत एकही सोलर पंप ग्रामपंचायत भागात लावण्यात न येणे, त्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण होणे, शासनाने या योजनेवर लाखो रूपये खर्च करूनही ग्रामीण भागात पाण्याची टंचाई कंत्राटदाराच्या कामचलाऊ धोरणामुळे निर्माण होणे, गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी, एटापल्ली, भामरागड, कोरची, कुरखेडा भागात एकही सोलर पंप बसविण्यात न येणे, 100 टक्के नक्षलग्रस्त भाग असुनही आदिवासींना पाणी टंचाईचा सामना करावा लागणे, त्यामुळे सदर कंत्राटदाराचे करार रद्द करून त्याला काळ्या यादीत टाकून त्याचे ई-टेंडरिंग रद्द करून जिल्ह्यातीलच कंत्राटदारामार्फत कामे करण्याची आवश्कता. शासनाने या संदर्भात कार्यवाही करावी अशी विनंती आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहतुकदारावर कारवाई करणे आवश्यक आहे. राज्यामध्ये लाखांच्या वर अवैध वाहतुकदार प्रवास करीत आहेत. अनधिकृतपणे परवाना नसताना प्रवाशांची ये-जा करीत आहेत. राज्यामध्ये नोकऱ्या व दुसरा इतर कुठलाही उत्पन्नाचा धंदा नसल्यामुळे ऑटोरिक्षा मालकाला राज्यात ऑटोरिक्षा चालविणे आवश्यक आहे. कुटुंबाचे पोलनपोषण करणे, मुलांना शिक्षण देणे ही त्याची जबाबदारी आहे. प्रायव्हेट ऑटोरिक्षा युनियनने अनेकदा मोर्चे, आंदोलन करणे, पोलीस व आरटीओ विभागाशी सतत संघर्ष असणे, आरटीओ व पोलीस विभागाने त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करून 4 ते 5 हजार रुपये दंड आकारणे, हाजारो ऑटोरिक्षा पोलीस व आरटीओ विभागाकडून जप्त करून संबंधितांचे ड्रायव्हिंग लायसन्स व परवाने रद्द करणे आणि त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट येणे, परिणामी ते आत्महत्येस प्रवृत्त होणे, हा त्यांच्यावर अन्याय असणे. सदर विषयावरील उपाय म्हणून सर्व खाजगी ऑटोरिक्षा व विना परवाना असलेल्या ऑटोरिक्षा यांना नव्याने 1 लाख नवीन ऑटोरिक्षा परवाने देण्याची कार्यवाही सरकारने न केल्यामुळे ऑटोरिक्षा चालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण. असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्यामुळे त्वरित प्रायव्हेट ऑटोरिक्षा चालकांना परवाने द्यावेत. शासनाने राज्यभर ऑटोरिक्षा चालकांकरिता नवीन ऑटो परवाना धोरण निश्चित करावे अशी विनंती आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यातील एमसीव्हीसीच्या शेकडो कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमातील इंग्रजी, मराठी व जनरल फाऊंडेशन कोर्स या विषयासाठी घड्याळी तासिकेप्रमाणे नेमणुका दिल्या जात होत्या. गेल्या अनेक वर्षांपासून अशाप्रकारे घड्याळी तासिकेवरील हजारो शिक्षक सेवेत कार्यरत होते. मात्र शैक्षणिक पात्रतेचे कारण देऊन व्यवसाय शिक्षक व प्रशिक्षण संचालक, मुंबई यांनी येत्या शैक्षणिक वर्षापासून सदर शिक्षकांना परवानगी देऊ नये असा आदेश काढल्याने राज्यातील जवळपास 40 हजार तासिका तत्वावर काम करणाऱ्या व्यवसाय शिक्षण विभागातील एमसीव्हीसीच्या शिक्षकांना आज बेरोजगार होण्याची वेळ आली आहे, त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळे त्यांना सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासून पुन्हा तासिक तत्वावर नेमणूक देण्याविषयी शासनाने तातडीने उपाययोजना करावी अशी मी मागणी करतो.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यातच नव्हे तर संपूर्ण भारतात पाय धुवून श्री विठ्ठलाच्या दर्शनाला जाण्याचा प्रघात आहे. बऱ्याच वर्षापासून चंद्रभागेची स्थिती अतिशय वाईट झाली आहे. पाण्याची टंचाई, वाळू उपसा, अनेक प्रकारच्या गाड्या तेथपर्यंत नेणे असे बरेच प्रश्न तेथे निर्माण झाले आहेत. माननीय उच्च न्यायालयाने देखील यामध्ये लक्ष घातले आहे. त्यामुळे आता त्यावर बरीच बंधने आणली आहेत आणि ती योग्य आहेत.

सभापती महोदय, मोठ्या प्रमाणात भाविक चंद्रभागेच्या तिरावर जात असून सुध्दा तेथे कोणत्याही सुविधा नाहीत. कोल्हापूर मंदिरात, तुळजापूर मंदिरात किंवा अन्य ठिकाणच्या मंदिरात प्रदक्षिणा घालताना भाविकांसाठी सोयी-सुविधा दिल्या जातात. परंतु चंद्रभागेच्या ठिकाणी अशा कोणत्याही सोयी-सुविधा दिल्या जात नाहीत. चंद्रभागेच्या तिरावर 38-40 डिग्री तापमान असतानाही भाविक अनवाणी जातात. भाविकांसाठी तेथे कोणत्याही सोयी-सुविधा नाहीत. स्थानिक रहिवाशांना चंद्रभागेच्या तिरावर दशक्रियाविधी करावा लागतो. ज्येष्ठ नागरिकांनाही तेथे उन्हात चटके सहन करावे लागतात. त्यामुळे तेथे जमिनीवर सतरंज्या टाकणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे गरजेचे आहे. पंढरपूर नगरपालिकेने आणि संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी यामध्ये लक्ष घालून चंद्रभ्ांगेच्या तिरावर भाविकांच्या सोयीच्या दृष्टीने पावले उचलावीत याकडे मी लक्ष वेधत आहे.

----

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुलुंड, मुंबई येथील डॉ. आर.पी.रोड, सिध्दार्थ नगर-1 येथे रिध्दी-सिध्दी कॉर्पोरेशन कंपनीचे एसआरए व प्रायव्हेट इमारतीचे बांधकाम सुरू आहे. स्थानिक नागरिक मागील अनेक वर्षांपासून तेथे राहत असून पूर्वीपासून त्यांच्या वापरात असलेला रस्ता विकासकाने तोडून त्यांना फक्त 10 फुटांचा रस्ता वापरण्यासाठी ठेवण्यात आल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. या रस्त्यावर मोठे ट्रक, ट्रॉली व क्रेन या वाहनांची दिवसभर सतत वाहतूक सुरू असल्यामुळे या रस्त्यावरून जाणाऱ्या स्थानिक नागरिकांना व शाळेत जाणाऱ्या मुलामुलींना, वयोवृध्द नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिकांना याच रस्त्यावरून ये-जा करावी लागत असल्यामुळे अतिशय लहान असलेल्या या रस्त्यावर वारंवार अपघात होऊन त्यामध्ये जीवित हानी होण्याचा धोका वाढला आहे. विकासकाने अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी आरटीआय किंवा महानगरपालिकेची कोणत्याही पकारची परवानगी न घेता वाहतूक सुरू केली आहे. यामुळे स्थानिक नागरिकांनी संबंधित पोलीस ठाण्यावर तक्रार केली असता सरदहू विकासकाने परिसरातील नागरिकांना दमदाटी करणे, मारहाण करणे, त्यांना ठार मारण्याची धमकी देणे हे प्रकार सुरू ाहे. विकासकाचे गुंड रहिवाशांमध्ये भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण करीत आहेत. सदर बाबतीत परिसरातील नागरिकांनी मुलुंड पोलीस स्टेशन येथे दिनांक 21.11.2014 रोजी तक्रार केली तरी सुध्दा विकासकावर पोलिसांकडून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. यामुळे परिसरातील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, त्यांच्यात भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सबब या प्रकरणी सखोल चौकशी होऊन सदर ठिकाणी राहणाऱ्या स्थानिकांना या विकासकापासून, गुंडांपासून संरक्षण देण्याची कायदेशीर कारवाई करावी.

सभापती महोदय, राज्याचे माननीय राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील सभागृहात उपस्थित आहेत, त्यांनी या संदर्भात निवेदन केले तर फार बरे होईल.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सदर बाबतीत नोंद घेतली आहे.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आज जागतिक अवयवदान दिन आहे. वैद्यकीय शास्त्र जसे प्रगत होऊ लागले आहे तसा अवयव प्रत्यारोपनाचा चांगला उपयोग होत आहे. अजुनही पुरेशा प्रमाणात मरणोत्तर नेत्रदान उपलब्ध होऊ शकत नाही. हार्ट, किडणी, लिव्हर प्रत्यारोपणात वाढ होण्याची आवश्यकता आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागरण मोहिम घेण्याची आवश्यकता आहे. देहदान सुध्दा मोठ्या प्रमाणात होऊ शकते आणि त्याचा वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निश्चित उपयोग होतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले........

अवयव दान व नेत्रदान करणाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घ्यावा. राज्यातील गेल्या काही वर्षातील आकडेवारी अशी आहे की, सन 2011-2012 पासून फेब्रुवारी, 2015 पर्यंत 7650 नेत्रदान झाले आहेत. ब्रेनडेड पेशंट कडून अवयव उपलब्ध होऊ शकतात. परंतु, अल्पप्रमाणात अवयव मिळत आहेत. पेशंटला वाचविण्यासाठी या अवयवदानाचा खूप उपयोग होतो. वैद्यकीय शिक्षणासाठीही देहदानाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत असतो. त्यामुळे या अतिशय महत्त्वाच्या विषयावर जनजागरण मोहिम काढण्यासाठी विशेष बाब म्हणून राज्य शासनाने कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

------------

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे 1921-22 मध्ये लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिकत असताना किंग हेन्रीरोड येथील घरात वास्तव्यास होते. त्या वास्तुचा लिलाव संबंधित प्रॉपर्टी मालकाने सुरु करण्यात येणे, सदर लिलाव तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी ब्रिटनच्या उपआयुक्तांना पत्र लिहून चार महिने थांबविण्याची विनंती करण्यात येणे, सदर वास्तुही हेरिटेज म्हणून जाहीर करण्यात येणे, सदर कामासाठी अर्थसंकल्पात 35 कोटी रुपयांची तरतूद केली असून वास्तू खरेदीसाठी आस्किंग प्राईसच्या 10 टक्के रक्कम जमा केली आहे. तसेच, हिंदू कॉलनी, दादर येथील राजगृहास स्मारक बनविण्याची सुध्दा मागणी पुढे येत आहे. सदर दोन्ही कामांसाठी निधी उभारुन कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनास करीत आहे.

-------------

..3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ येथे इलेक्ट्रॉनिक्स विभागात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या गलथान कारभारामुळे मनस्ताप सहन करावा लागत आहे. सदर विद्यापीठात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रथम वर्ष किंवा व्दितीय वर्ष अभ्यासक्रमातील एखाद्या सेमिस्टरमध्ये नापास झाले असल्यास तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेता येत नाही. बऱ्याचदा प्रथम किंवा व्दितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात नापास ठरविल्या गेलेल्या विद्यार्थ्यांना पेपर पुनर्तपासणीत चांगले मार्क्स मिळालेले आढळून आले आहे. काही उत्तरे तपासायची राहून गेलेली असतात तर काहींच्या मार्कांची बेरीज करायची राहून गेलेली असते. हा दोष पेपर तपासणाऱ्या व्यक्तिचा असतो. मात्र त्याचा परिणाम विद्यार्थ्यांना भोगावा लागतो. यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाते, त्यांच्या प्रगतीची संधी हुकते म्हणून विद्यापीठाने अशा विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या परीक्षेस बसण्याची परवानगी द्यावी, याकरिता विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या अशा बाबीकडे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**<u>लक्षवेधी सूचनांबाबत</u>**

**सभापती :** सन्माननीय पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी अशी विनंती केली आहे की, त्यांची तब्येत चांगली नसल्यामुळे कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या क्रमांक 5 च्या लक्षवेधी सूचनेवर प्रथम चर्चा घ्यावी. त्यांची विनंती मान्य करण्यात येत असून लक्षवेधी सूचनेचा क्रम बदलून क्रमांक 5 च्या लक्षवेधी सूचनेवर प्रथम चर्चा घेण्यात येईल.

--------------

...5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यात उद्योगांमुळे होणारे पदूषण

**मु.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यात उद्योगांमुळे होणारे पदूषण यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उद्योगामध्ये कोळसा खाणी, बल्लारपूर पेपर मिल, पोलाद उद्योग, कोल डेपो, त्यात वरोरा पॉवर, एमको कंपनी, कर्नाटक एम्टा, सिमेंट कारखाने, महाऔष्णिक विद्यूत केंद्र, या सारख्या कंपन्या व उद्योग कार्यरत असणे, सदर कंपन्या व उद्योगांचे दूषित पाणी वर्धा, इरई नदीत सोडले जात असल्यामुळे जिल्हावासीयांना जलप्रदूषणाचा सामना करावा लागणे, सर्व उद्योगांमधून जल, वायू, धूळीचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत असणे, वास्तविक प्रदूषण कायद्यानुसार दूषित पाण्यावर प्रक्रिया करुन सोडणे बंधनकारक असतांना या नियमांचे कंपनी व उद्योगांनी उल्लंघन करणे, जिल्ह्यातील उद्योग अटींचे उल्लघंन करीत असल्याने मागील वर्षी 24 उद्योगांची बँक गॅरंटी प्रदूषण नियंत्रण मंडळाने जप्त केल्याचे उघडकीस येणे, त्यातच औद्योगिक व कृषी प्रदूषणात वाढ झाल्याने जिल्हातील भूजलात नायट्रेटसच्या प्रमाणात वाढ झाली असून 5,904 नमुन्याची प्रयोगशाळेत तपासणी केली असता 3,510 नमुने नायट्रेटयुक्त असल्याचे आढळणे, त्यातच जिल्ह्यात नियमबाह्य वाहतुक होत असल्याचे मा. पर्यावरण मंत्री यांनी पाहणी केली असता त्यात चोरट्या व अवैद्य वाहतुकीचे 25 ट्रकांवर कारवाईचे आदेश देणे, त्यातच जिल्ह्यातील चंद्रपूर, भद्रावती व राजूरा या तीन तालुक्यातील 23 गावे अतिप्रदूषित असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ तथा आय.आय.टी. ने केलेल्या पर्यावरणीय लेखा परिक्षण समितीने सप्टेंबर, 2011 ला केलेल्या सर्व्हेत ठपका ठेवणे, परिणामी नागरीकांवर परिणाम होवून सर्दी, खोकला, कर्करोग, दमा या आजाराचे 70 टक्के लोक आढळून येणे, त्यातच धूळीमूळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकाचे होणारे नुकसान, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, प्रदूषणावर आळा घालण्याच्यादृष्टीने या उद्योगांवर शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------

...7.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा केवळ प्रदूषणाचा प्रश्न नाही. हवामानाच्या प्रदूषणामुळे वातावरणात अतिशय बदल झाला आहे आणि निसर्गही बदलला आहे. त्यामुळे त्या भागात बाराही महिने शेतकऱ्यांना अतिवृष्टी, अवर्षण, गारपीट, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. हा प्रदूषणाचाचा परिणाम आहे. त्यादृष्टीने ही लक्षवेधी सूचना अतिशय महत्त्वाची आहे.

सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला शासनाने सहा पानी निवेदन दिले आहे. त्यामुळे किती उपप्रश्न विचारायचे, असा प्रश्न माझ्यासमोर निर्माण झाला आहे. या निवेदनाने आमचे समाधान झालेले नाही. कारण असे आहे की, गेल्या 25 वर्षांपासून मी या प्रश्नाचा पाठपुरावा करीत आहे. प्रदूषण हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. हा विषय थट्टामस्करीने घेण्याचा नाही. गेल्या 25 वर्षापासून मी विधानसभा सदस्य या नात्याने विधानसभेमध्ये या प्रश्नाचा पाठपुरावा करीत आहे. परंतु, 'असे घडत नाही', 'असे घडत नाही', असेच उत्तर मला मिळत आले आहे.

सभापती महोदय, बल्लारपूर पेपर मिलच्या संदर्भात या निवेदनात सविस्तर माहिती दिलेली आहे, याबद्दल सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे मी कौतुक करते.

सभापती महोदय, माझ्याकडे बल्लापूर पेपर मिलच्या संदर्भातील दिनांक 29/06/2012 चा अहवाल आहे. त्यामध्ये स्पष्टपणे रसायनांचा वापर केला जातो, असे नमूद केले आहे. बल्लारपूर पेपर मिल ही फार जुनी मिल आहे. बल्लापरपूर पेपर मिल या कारखान्याला औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संयत्रात अतिरिक्त थिकनर व प्रेस लावणे, डीस्क फिल्टर पेपर मशीन मध्ये लावणे, पाण्याची गुणवत्ता वाढविण्याकरिता फिल्टर बसविणे, प्रक्रिया केलेले सांडपाणी झाडांसाठी वापरण्याकरिता योग्य प्रकारे आराखडा बनविणे, जुन्या प्रकल्पाचे आधुनिकीकरण करणे, ज्यामुळे हवा पदूषण संयत्रणामधुन उत्सर्जित होणाऱ्या धुळीकणांचे प्रमाण 50 एमजी/एनएम3 पर्यंत सीमित राहील, क्लोरीनचा वापर न करणे, अद्रवीभूत वायू जाळणे, चुन्याच्या ढिगाऱ्यावर वृक्षारोपण करणे, इत्यादी निर्देश देण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, सन 2012 आणि सन 2013 चा अहवाल माझ्याकडे आहे. उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, अशाच प्रकारचे उत्तर मला नेहमी मिळत आले आहे. प्रत्यक्षात त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.........

ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना केलेल्या नाहीत. आताही पुन्हा निवेदनात 'निदेश दिलेले आहेत', असे उत्तर मिळाले आहे. प्रदूषण मंडळाचे नेमके काम काय आहे ? ज्यावेळी मंडळाचे अधिकारी तपासणी करण्यासाठी जातात, त्यावेळी ते निदेश का देत नाहीत ?

सभापती महोदय, सन 2013 मध्ये एक बैठक झाली होती. त्यामध्येही निदेश देण्यात आले होते. परंतु, आजपर्यंत त्या निदेशांची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे आम्ही कोणाकडून अपेक्षा करायची, असा प्रश्न पडतो. सन 2013 चा अहवाल माझ्याकडे आहे. सन 2013 मध्ये आम्ही काय काय केले आहे, हे यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामध्ये थर्मल पॉवर स्टेशनमध्ये काय केले आहे, कोळसा कोणत्या प्रकारचा वापरला जाईल, याची माहिती नाही, संच क्रमांक 1 ते 7 मध्ये अमोनिया डोजिंग लावले आहे, राखेचा वापर सिमेंट प्लँटमध्ये करण्यात येतो, एअर क्वालिटीचे परीक्षण करण्यासाठी सिस्टिम स्थापित केली आहे, असे नमूद केले आहे. असे उत्तर मिळाल्यानंतर मी मंडळाच्या अधिकाऱ्यांना अचानक भेट देण्याची विनंती केली आणि त्यांना कारखान्यावर घेऊन गेले. प्रत्यक्षात त्या ठिकाणी काय सुरु आहे, हे दाखविले. त्या ठिकाणी आश्वासन दिल्याप्रमाणे कंपनीने कोणतीही उपाययोजना केली नव्हती. कोळशाची धूळ खाली बसविण्यासाठी स्प्रिंक्लर्स बसविण्यात आले आहेत, असे सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात आम्ही बघितले की, त्या ठिकाणी एकही स्प्रिंकलर बसविले नव्हते. ज्यावेळी अधिकारी तपासणी करीत होते, त्यावेळी अधिकाऱ्यांच्याच अंगावर धूळ बसली होती. त्या ठिकाणी 25 कोळशाचे ट्रक कोळसा वाहून नेत होते. ट्रकवर आच्छादन टाकण्यात आले नव्हते. परंतु, आम्हाला असे सांगण्यात आले होते की, ताडपत्री टाकून ट्रकव्दारे कोळशाची वाहतूक केली जाते.

सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. प्रदूषणाच्या बाबतीत आजही देशात चंद्रपूर जिल्ह्याचा चवथा क्रमांक आहे. आमची मुले इंजिनिअर होऊन बसली आहेत. त्या ठिकाणी भूपृष्ठात प्रचंड प्रमाणात खनिज संपत्ती आहे. तेथील उद्योग बंद करण्याचे काम केंद्र सरकारने केले आहे. परंतु, अद्याप प्रदूषण मात्र प्रदूषण मंडळाला थांबविता आलेले नाही. ज्यावेळी प्रदूषण

मंडळाचे अधिकारी त्या ठिकाणी तपासणी करण्यासाठी जातात त्यावेळी ते नेमके काय करतात, कशा प्रकारे तपासणी करतात आणि कशा प्रकारे प्रमाणपत्र दिले जाते ?

...9....



श्रीमती शोभा फडणवीस.........

सभापती महोदय, हा प्रश्न वायूच्या प्रदूषणावर आधारित आहे. या प्रश्नाने गंभीर रुप धारण केले आहे. सूर्य आणि पृथ्वी यामधील वजन कमी होत चालले आहे, हा प्रदूषणाचा प्रकोप आहे, असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे हा विषय अतिशय गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गेल्या 25 वर्षात बल्लारपूर पेपर मिलने प्रदूषण प्रतिबंधक उपाययोजना का केल्या नाहीत, त्याची कारणे काय आहेत ?

सभापती महोदय, त्या ठिकाणी थर्मल पॉवर स्टेशनमध्ये काळ्या धुराच्या चिमण्या मी प्रत्यक्षात अधिकाऱ्यांना दाखविल्या आहेत. अशा पध्दतीने उद्योग प्रदूषण करीत असतील तर त्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांची तळमळ अतिशय योग्य आहे, या प्रश्नाबाबत त्या सतत पाठपुरावा करीत आहेत. गेल्या 25 वर्षापासून विधानसभेत हा प्रश्न मांडतांना मी त्यांना पाहिले आहे. चंद्रपूर येथील प्रदूषणाबाबत त्या सतत आवाज उठवित असतात मागील अधिवेशनात चंद्रपूर येथील प्रदूषणाबाबत त्यांनी लक्षवेधी सूचना दिली होती. त्यावेळी असे आश्वासन दिले होते की, मी स्वत: तेथे येऊन आपणाला घेऊन त्या भागाची पाहणी करीन. मी तेथे जाऊन पाहणी केली, सन्माननीय सदस्या आतापर्यंत सभागृहात याबाबत जे प्रश्न विचारीत होते ते शंभर टक्के बरोबर आहेत. हा सर्व प्रकार मी माझ्या डोळयाने पाहिला आहे. त्यावेळी मी कंपनीला ताबडतोब दोन महिन्याची नोटीस दिली होती. त्यांची 50 लाख रुपयांची बँक गॅरटी जप्त केली आहे. अधिकाऱ्यांना तेथे पाठवून 22 ट्रक जप्त केले आहेत. सभागृहात आश्वासन दिले असल्यामुळे मी तेथे गेलो होतो. विरोधी पक्ष नेत्यांनी अशी लक्षवेधी सूचना दिली होती की, मंत्री महोदय श्री.रामदास कदम तेथे स्वत: कसे काय गेले. सभागृहात आश्वासन देऊन मी तेथे गेलो होतो. तरी देखील अशी लक्षवेधी सूचना देण्यात येते की, मी तेथे कशासाठी गेलो होतो. तेथे जे ट्रक आढळले ते पकडण्यात आले आहेत. तेथील एकाही ट्रकवर ताडपत्री नव्हती, ते सर्व ट्रक ओपन होते, त्यामुळे संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही वस्तुस्थिती आहे, यामध्ये चुकीचे काही नाही. सभागृहात आश्वासन दिल्यावर तेथे मंत्री गेले तर यामध्ये काय चूक आहे. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले ते चुकीचे नाहीत.

सभापती महोदय, सन 2010 मध्ये केंद्र सरकारने संपूर्ण देशात सर्व्हे केला होता, त्यामध्ये चंद्रपूर जिल्हा अतिप्रदूषित आहे हे मी स्वत: वाचले आहे, त्याचा अभ्यास देखील मी केला आहे. प्रदूषण महामंडळाने आता मोठ्या प्रमाणात याबाबत कारवाई केली आहे. 10, 20, 25 लाख रुपयांची 28 कंपन्यांची बँक गॅरटी जप्त करण्यात आली आहे. सभागृहाचा वेळ जाऊ नये म्हणून मी 28 कंपन्यांची नावे सांगत नाही. प्रदूषण महामंडळाचे काम चांगल्या प्रकारे चालू आहे, अनेक ठिकाणचे प्रदूषण थांबविण्याचे काम सुरु आहे. पाण्याचे प्रदूषण थांबविण्यासाठी कंपन्यांकडून सोडण्यात येणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. प्रदूषण महामंडळ काहीच करीत नाही असे म्हणणे चुकीचे होईल. सर्वच अधिकारी लायक नाहीत असे म्हणणे देखील चुकीचे होईल. मागील 10 ते 15 वर्षात जी कामे व्हायला पाहिजे होती ती होऊ शकली नाहीत. अधिकाऱ्यांकडून

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामदास कदम...

जी उत्तरे मिळतात व प्रत्यक्षात वस्तुस्थिती काये त्याची मी पाहणी केली आहे. यापुढे या कंपन्यांकडून प्रदूषण होणार नाही याची शासन दखल घेत आहे. प्रत्येक महिन्याचा अहवाल मी स्वत: घेणार आहे. अधिवेशन संपल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी व सचिव यांची बैठक घेण्यात येईल. तेथील लोकप्रतिनिधींच्या सूचना घेण्यात येतील. सर्वांना विश्वासात घेऊन प्रत्येक महिन्याचा अहवाल मला मिळेल तसाच तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींना देण्यात येईल. त्यामुळे लोकप्रतिनिधींचे त्याकडे लक्ष राहील अशी व्यवस्था भविष्यकाळात शासनाकडून करण्यात येणार आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला देण्यात आलेल्या निवेदनावरुन असे वाटते की, केवळ प्रश्नोत्तरामधून हा प्रश्न सुटणार नाही. हवेचे प्रदूषण केवळ महाराष्ट्रात आहे असे नसून ते सगळीकडे आहे. याबाबत गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. प्रदूषण हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. या विषयाबाबत चर्चा घेतली तर त्यावर मला सविस्तर बोलता येईल. यासंदर्भातील सविस्तर माहिती माझ्याकडे आहे, इरई आणि झरपट या नद्यांच्या पाण्याच्या तपासणी अहवालावरुन पाण्याची गुणवत्ता खालावली नसल्याचे निदर्शनास येते. झरपट नदीचे पाणी महाकाली यात्रेतील लोक वापरतात. हे पाणी इतके घाणेरडे असते की, त्या पाण्याने पाय धुण्याची देखील इच्छा होत नाही. त्यामुळे प्रदूषण मंडळ काय तपासणी करते. नदीच्या पाण्याची तपासणी करुन अहवाल कशा प्रकारे दिला जात आहे. बँक गॅरटी जप्त करुन या कंपन्यांना काही फरक पडत नाही. 2009 पासून सर्व पर्यावरण मंत्री महोदयांना मी या भागात नेले आहे. प्रत्येक मंत्री महोदयांनी मला असे सांगितले की, बँक गॅरटी जप्त करण्यात येईल. बल्लारशा पेपर मिलची बँक गॅरटी बैठकीत ठरल्याप्रमाणे जप्त करण्यात आली. तरी देखील त्या कंपन्यांना काही फरक पडत नाही. बँक गॅरंटी जप्त केल्याने काही फरक होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे या कंपन्यावर शासन कोणती कठोर कारवाई करणार आहे. वर्धा नदीचे पाणी चांगले आहे असे म्हटले जाते. वर्धा नदीच्या पाण्यात बल्लारशा पेपर मिलचे पाणी सोडले जाते. घाणेरड्या पाण्याचे नमुने मी दिले आहेत. त्या पाण्याची तपासणी करण्यात आली आहे. त्या बाजूला बल्लारशा पेपर मिलची वॉटर सप्लाय स्कीम आहे. बल्लारशहा शहराला हे पाणी पुरविले जाते. त्यामुळे तेथे

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

पाण्याचे शुध्दीकरण होत नाही. जनतेच्या जीवनाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. प्रदूषण मंडळातील कोणते अधिकारी चांगले व कोणते वाईट आहेत हा माझा प्रश्न नसून ते अधिकारी आपले काम व्यवस्थित करीत नाही असा माझा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामुळे माझे समाधान होऊ शकणार नाही. प्रदूषणाबाबत चर्चा घेतली तर हवेचे प्रदूषण पाण्याचे प्रदूषण इतर विषयावर देखील चर्चा करता येईल. त्यामुळे मंत्री महोदयांनी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत व भविष्यासाठी आपण काही निदेश द्यावेत, असा माझा प्रश्न आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नदीच्या पाण्यात जे सांडपाणी सोडण्यात येते त्यावर चंद्रपूर महानगरपालिकेने प्रोसेस यंत्रणा बसविली आहे. 95 टक्के काम झाले असून 5 टक्के काम शिल्लक आहे, त्यामुळे चंद्रपूर शहरातील सांडपाणी यापुढे नदीत जाणार नाही अशी व्यवस्था करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांची तळमळ मी पाहिली आहे. यामुळे मी एक कटू निर्णय येथे घेत आहे. ज्या कंपन्यांची बँक गॅरंटी सातत्याने जप्त केली किंवा त्यांना अनेक वेळा ताकिद देऊन देखील ज्या कंपन्यानी सुधारणा केली नाही. त्यामध्ये (1) सीएसटीपीएस जिल्हा चंद्रपूर (2) मे.कर्नाटका एम्टा तालुका बल्लारपूर जिल्हा चंद्रपूर (3) मे अवंथा पॉवर ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर बल्लारपूर (4) मे.वर्धा पावर कंपनी लि.वरोरा, जि.चंद्रपूर (5) मे.बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रॉडक्ट लि. यांची 45 लाख रुपयांची बँक गॅरंटी जप्त केली आहे. या पाचही कंपन्या आजच्या आज बंद करण्याचे आदेश मी देत आहे. जोपर्यंत यांचे प्रदूषण थांबत नाही, पूर्णपणे झिरो शॅम्पल येत नाही तोपर्यंत या कंपन्या चालू होणार नाहीत असे आदेश मी आजच्या आज संबंधितांना देतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात व त्या परिसरात प्रदूषणाचे प्रमाण अतिशय जास्त आहे. वेगवेगळ्या सर्व्हेवरुन हे अनेक वेळा सिध्द झाले आहे. त्या ठिकाणी औद्योगिक क्षेत्र आहे, त्यासाठी जी बंधने टाकावयास पाहिजे होती ती टाकण्यात आली नाहीत. त्यामुळे तेथील प्रदूषणाची पातळी अमर्याद वाढली आहे. हवेतील व पाण्यातील प्रदूषण जास्त वाढले आहे. सर्वात जास्त प्रदूषण पॉवर प्रोजेक्टमधून होते. महाराष्ट्रातील इतर कोणत्याही जिल्ह्यात खाजगी पॉवर प्रोजेक्ट येत नसून फक्त चंद्रपूर जिल्ह्यात येताात. यासाठी मी सतत विरोध केला होता. पाणी परिषद घेऊन विदर्भातील पाण्याचा एकही थेंब खाजगी पॉवर प्रोजेक्टला देण्यात येऊ नये, या मताशी आम्ही सर्व लोक सहमत आहोत. खाजगी पॉवर प्रोजेक्टमधून त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

परिसरातील लोकांना कोणताही फायदा मिळत नाही, नोकऱ्या मिळत नाहीत. तेथील सर्व जमीन बरबाद होते, प्रदूषण तयार होते, सगळीकडे राख पसरते, त्यामुळे त्या भागात खाजगी पॉवर प्रोजेक्ट येणार नाहीत, आले तरी त्यांना पाणी देणार नाही अशा प्रकारची भूमिका राज्य शासन घेणार आहे काय ? त्या भागात खाजगी पॉवर प्रोजेक्ट उभारण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा पॉवर प्रोजेक्टला यापुढे शासनाने परवानगी देऊ नये. तेथील प्रदूषण मर्यादेच्या पुढे गेले आहे. हे प्रदूषण पाण्यात व वातावरणात आहे, त्यामुळे अशा पॉवर प्रोजेक्टला यापुढे मान्यता देणार नाही किंवा त्यांना पाणी उपलब्ध करून देणार नाही याबाबत शासनाची नेमकी काय भूमिका राहणार आहे ?

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, केंद्र शासनाने चंद्रपूर जिल्हा अतिप्रदूषित जिल्हा म्हणून जाहीर केलेला आहे, ही गोष्ट खरी आहे. एका बाजूला प्रदूषण होते आणि दुसऱ्या बाजूला नवीन खाजगी औष्णिक वीज प्रकल्पांना मान्यता देणे हे निश्चितपणे चुकीचे होईल. म्हणून आपण या बाबतीत चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच भविष्यात निर्णय घेऊ.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की,शासन या विषयी धोरण स्पष्ट करणार आहे काय ? त्या ठिकाणी खाजगी पॉवर प्रोजेक्टला मान्यता देण्यात येऊ नये, असे आमचे मत आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी देखील आपल्या मताशी सहमत आहे. म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच आपण भविष्यात या संदर्भात निर्णय घेऊ.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, त्या ठिकाणी जे जळण होते त्यामुळे वायू प्रदूषण होत नाही, असे उत्तर देण्यात आलेले आहे. पॉवर प्लँटमध्ये टायरची भुकटी जाळली जाते, धानाचा कोंडा जाळला जातो. टायरच्या भुकटीतून सर्वात जास्त विषारी वायू निघतो आणि त्याची तपासणी आज पर्यंत कोणी केलेली नाही. टायरच्या भुकटीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असल्याचे आम्ही प्रत्यक्ष बघतो. शासनाला याची माहिती आहे काय आणि त्यावर शासनामार्फत कोणती उपायोजना करण्यात येणार आहे ? तसेच, बल्लारपूर पेपर मिलमध्ये फक्त 7 हजार टन औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था आहे आणि जवळपास 80 हजार टन औद्योगिक सांडपाणी निघते. मग आपण 20 हजार औद्योगिक सांडपाण्याचे काय करणार आहात ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, चंद्रपूरमध्ये टायरमधील लोखंडी तार काढण्यासाठी भर वस्तीत टायर जाळले जातात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होते. मी विचारलेल्या तीन प्रश्नांच्या संदर्भात मंत्री महोदय कोणता निर्णय घेणार आहेत ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याकडून अधिकची माहिती घेईन आणि पूर्णपणे माहिती घेऊन तत्काळ योग्य ती कार्यवाही केली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, चंद्रपूर हा देशातील चौथ्या क्रमांकाचा प्रदूषण असलेला जिल्हा आहे, हे आपण मान्य केलेले आहे. आपण त्या कंपन्यांची बँक गॅरंटी जप्त करण्याबाबत सूचना देता. परंतु, त्या कंपन्यांच्या एकूण उलाढालीचा विचार केल्यानंतर आपण जी बँक गॅरंटी जप्त करतो ती रक्कम अतिशय नगण्य आहे. त्यामुळे त्या रकमेचा त्यांच्यावर कोणताही प्रतिबंधात्मक परिणाम होऊ शकत नाही. तसेच, देशात सेंट्रल पोल्युशन कन्ट्रोल बोर्ड आहे आणि राज्यात राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे. चंद्रपूर विशेष जिल्हा असल्यामुळे आपण केंद्र शासनाकडे, सेंट्रल पोल्युशन कन्ट्रोल बोर्डाकडे अधिक मनुष्यबळाची, तंत्रज्ञानाची मागणी केलेली आहे काय ? आपल्याला त्या निमित्ताने केंद्र शासनाकडून चंद्रपूर जिल्ह्यासाठी एक मॉनेटरिंग सेंटर मिळविता येईल काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मला माझ्या उत्तरात एक दुरूस्ती करावयाची आहे. माननीय ऊर्जा मंत्री यांची अशी विनंती आहे की, आपण चंद्रपूर वीज प्रकल्प तत्काळ बंद केला तर वीज निर्मिती बंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्याला वीज कमी मिळेल. तेथून प्रदूषण होणार नाही, याची जबाबदारी ते स्वतः घेत आहेत. म्हणून मी मघाशी सांगितल्याप्रमाणे 5 प्रकल्पांमधून मी हा 1 प्रकल्प वगळत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितले की, आपण अतिशय कमी बँक गॅरंटी घेतो. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण यापुढे 10 लाक्षापेक्षा जास्त बँक गॅरंटी घेऊ आणि बँक गॅरंटी जप्त करताना देखील 10 लाखापेक्षा जास्त बँक गॅरंटी जप्त करू

--------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.**: लोणावळा येथील हॉटेल कुमार रिसॉर्टमधील एका लग्न समारंभास आलेल्या मुलीची गळा चिरुन करण्यात आलेली निर्घृण हत्या याबाबत सर्वश्री सुनील तटकरे, जयंत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, लोणावळा येथील हॉटेल कुमार रिसॉर्टमध्ये दिनांक 15 फेब्रुवारी, 2015 रोजी अत्यंत भयावह आणि दुर्दैवी अशा प्रकारची घटना घडली. लग्न समारंभासाठी आलेल्या 7 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिची निर्घृण हत्या करण्यात आली. निवेदनामध्ये अशी माहिती दिलेली आहे की, दिनांक 15 फेब्रुवारी, 2015 रोजी फिर्याद आली आणि दिनांक 16 फेब्रुवारी, 2015 रोजी त्याची नोंद घेण्यात आली. अत्यंत गंभीर अशा गुन्ह्याची केवळ नोंद घेण्यात आलेली आहे. दिनांक 16 फेब्रुवारी, 2015 रोजी अज्ञात व्यक्ती विरुद्ध लहान मुलीला पळवून नेल्याबाबतचा गुन्हा नोंदविण्यात आला. निवेदनात असे म्हटले आहे की, "दिनांक 17 फेब्रुवारी, 2015 रोजी अपहरीत मुलीचा गळा चिरल्याच्या अवस्थेमधील प्रेत कुमार रिसॉर्ट हॉटेलच्या टेरेसवरील सोलर वॉटर हिटरच्या पॅनेलखाली दिसणार नाही अशा बेताने पुरावा नष्ट करण्याच्या इराद्याने टाकल्याचे आढळून आले आहे." ही गंभीर बाब असताना या प्रकरणी दोन दिवस तपासामध्ये दिरंगाई झालेली आहे. हे प्रेत मिळाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर लोकांच्या प्रतिक्रिया उमटल्या. आपण राजकीय गुन्हे मागे घेण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. ही मुलगी रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यातील इंदापूर येथे राहणारी आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी स्थानिक लोक, व्यापारी आणि इतर सर्व लोकांनी मोर्चा काढला होता. ठीक आहे, त्या संदर्भात स्वाभाविकपणे काही प्रतिक्रिया आल्या. परंतु, त्याबद्दल लोकांवर भारतीय दंड विधान संहिता कलम 395, 452, 141, 143, 323, 427 अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आणि पोलिसांना मारहाण झाली म्हणून कलम 141, 143, 146, 147, 333, 504 अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. 7 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिचा खून केला जातो, पुरावा नष्ट केला जातो. पोलिसांनी त्या अरोपींना बिहारच्या आसपास बघितले, अशी माहिती मिळत आहे. परंतु, अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. एका आरोपीला अटक करण्यात आली. परंतु त्या संदर्भात असे उत्तर देण्यात आलेले आहे की, त्या आरोपीला दिनांक 13 मार्च, 215 रोजी अटक झाली आणि दिनांक 19 मार्च, 2015 पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर करण्यात आला. 19 किंवा 20 तारखेला मॅजेस्टिक कस्टडी होऊन त्याला जामीन मिळाला असा

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.........

त्याचा दुसरा अर्थ होऊ शकतो. म्हणजे एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन, तिचा गळा चिरुन तिची हत्या केली जाते. या संदर्भात शासनाची, पोलिसांची भूमिका अत्यंत अन्यायकारक, नाकर्तेपणाची दिसत आहे. अद्याप या गुन्ह्याचा तपास लागलेला नाही. या प्रकरणी तातडीने कोणती कारवाई केली जाणार आहे ? त्याच बरोबर, पोलिसांनी आरोपींना बघितले, असे समजते, ही बाब खरी आहे काय ? हे रिसॉर्ट कोणाचे आहे हे मी राजकीय दृष्ट्या या ठिकाणी बोलू इच्छित नाही. परंतु, ज्या निरपराध लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत ते मागे घेण्याची घोषणा आज या ठिकाणी केली जाणार आहे काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, लोणावळा येथे जी घटना घडली त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या मुलीचे पालक मुलगी हरविल्याबाबचा गुन्हा नोंद करण्यासाठी दिनांक 15.02.2015 रोजी रात्री 20 वाजून 30 मिनिटांनी पोलीस स्टेशनमध्ये गेले होते. त्यावेळी मिसिंगची केस दाखल करण्यात आली. त्यानंतर रात्री 01 वाजून 15 मिनिटांनी कलम 363 चा गुन्हा दाखल करण्यात आला. रात्री 8.30 आणि रात्री 01.15 यामध्ये आपण तारखेचा विचार केला तर दोन दिवस लागले असे वाटते. परंतु या संदर्भात गुन्हा दाखल करुन घेण्यामध्ये कोणतीही दिरंगाई झालेली नाही. त्यानंतर कलम 302, 301 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आणि मेडिकल रिपोर्ट आल्यानंतर कलम 376 अन्वये देखील गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल करुन घेण्यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई झालेली नाही. दुसरा प्रश्न असा होता की, या घटनेमध्ये एका आरोपीला अटक करण्यात आली आणि त्याला 19 तारखेपर्यंत पोलीस कस्टडी होती. त्यानंतर न्यायालयाने काय सांगितले याबाबतची माहिती मी निश्चितपणे सभागृहाचा पटलावर ठेवतो....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, त्या आरोपीला जामीन मिळाला किंवा नाही याबाबतची माहिती गृह राज्यमंत्री महोदयांनाकडे नसणे, ही गंभीर बाब आहे. म्हणजे या प्रकरणाकडे आपले किती लक्ष आहे, हे यावरुन दिसून येते.

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, त्यांना पीसीआर 19 तारखेपर्यंत मिळाला होता. त्यानंतरची माहिती.....

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, लोणावळ्याच्या पोलीस यंत्रणेची भूमिका संशयास्पद आहे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, पोलिसांची भूमिका संशयास्पद नाही. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आलेली आहे. पथक नेमण्यात आलेले आहे. दुसऱ्या संशयीत आरोपीला अटक करण्यासाठी पोलीस बिहारकडे रवाना झालेले आहेत.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे......

आरोपी पाहिला गेला असे आपण वक्तव्य केले. अशा स्वरूपाचा कोणताही आरोपी पाहिलेला नाही. कोणत्याही परिस्थितीत आरोपीला दिसताक्षणी बिहारमधून अटक करून आणण्यात येईल. रिसॉर्टवर हल्ला झाला. हा तेथील नागरिकांचा प्रक्षोभ होता. या सदनामध्ये राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते. सदरच्या घटनेमध्ये सीसीटीव्ही फुटेज तपासून जे कोणी समाविष्ट नसतील त्यांची नावे वगळण्याच्या संदर्भात निश्चितपणे सूचना देतील. नियमानुसार कारवाई होईल. माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना निश्चित स्वरूपात विचारात घेतल्या जातील. जो आरोपी अटकेत आहे त्याला जामीन मंजूर झालेला नाही. त्याची नार्को टेस्ट करण्यासाठी न्यायालयाकडे परवानगी मागितली आहे. या प्रकरणामध्ये कोणतीही दिरंगाई झालेली नाही. शासन गुन्हेगाराला अटक केल्याशिवाय राहणार नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, लोकांनी काढलेल्या मोर्चाच्या संदर्भातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याबाबत पोलिसांनी तत्परता दाखविली. 16 तारखेला घटना दाखल झाली. 16 तारखेला हॉटेल चेक केले असते तर आरोपी पकडले गेले असते. 17 तारखेच्या संध्याकाळपर्यंत तपासणी न करण्याचे कृत्य निंदनीय आहे. याबाबत काय भूमिका घेतली जाणार आहे? हॉटेलवरील हल्ल्याबाबतचे सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असेल तर हॉटेलमध्ये असलेले सीसीटीव्ही फुटेज का तपासले जात नाही?

प्रा.राम शिंदे : अनेक लोकांची त्यामध्ये तपासण्ी केली आहे. गुन्हेगारांची तपासणी करीत असताना 29 संशयित इसमांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली, 301 साक्षीदारांची तपासणी करण्यात आली. याबाबत कोणताही हलगर्जीपणा झालेला नाही. आपली सूचना आहे त्याबाबत कायदा व सुव्यवस्था विभागाच्या पोलीस महानिरीक्षकांना घटनास्थळी समक्ष भेट देऊन पुन्हा एकदा आढावा घेण्याबाबत शासन स्तरावरून सूचना दिल्या जातील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, 300 लोकांची तपासणी केली हे सरकारचे मेरिट सांगण्याचा प्रयत्न होत आहे का? आजपर्यंत आरोपी सापडलेला नाही ही निंदनीय बाब आहे. घटना होऊन एक महिन्याचा कालावधी उलटून गेला आहे....(अडथळा)...दाभोळकरांच्या हत्येच्या घटनेची तुलना करु नका. पानसरे यांच्या हत्येचा तपास तातडीने झाला पाहिजे. 7 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार होतो, दोन दिवस प्रेत तेथेच राहते. कुमार रिसॉर्टची तातडीने पाहणी केली असती तर आरोपी सापडले असते. जी दिरंगाई झाली त्याबाबत उत्तर दिले पाहिजे.

प्रा.राम शिंदे : या संदर्भात चौकशी केली. घटनेच्या संदर्भात दोन वेगवेगळ्या तारखा आहेत. 4 तासाचे मिसिंग आहे.......

श्री.सुनील तटकरे : रिसॉर्ट त्याच वेळी सील केले असते तर पुढील अनर्थ टळला असता. 15 तारखेची सायंकाळ ते 17 तारखेपर्यंत किती तास होतात, पोलिसांनी काय तत्परता दाखविली, लोकांचा प्रक्षोभ कशासाठी झाला? लोकांचा प्रक्षोभ आपण मान्य करण्यास तयार नाही.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी म्हटले की, हॉटेल सील केले असते तर पुढील अनर्थ टळला असता. निश्चित स्वरुपात त्या गुन्हयाचा तपास केला तो कालावधी 16 ते 18 तारखेपर्यंत म्हणजे तीन दिवसाचा होता. 18 तारखेला जनतेचा प्रक्षोभ झाला आणि हॉटेलवर हल्ला करण्यात आला. दरम्यानच्या काळात 24 ते 30 तास उलटून गेले. अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून तपासामध्ये तत्परता दाखविली नसेल तर त्या संदर्भात चौकशी केली जाईल. चौकशी अंती जे निष्पन्न होईल त्यानुसार कारवाई केली जाईल.

------------

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यात निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाई

**मु.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यात निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाई यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, सुनील तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई, या तालुक्यात मुबलक पाणीसाठा असतानासुध्दा तेथील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागणे, नियोजित नळपाणी पुरवठा योजना, सार्वजनिक विहिरी व विंधन विहिरीची कामे मार्गी न लागल्याने त्या गावांवर पाणी टंचाईचे निर्माण झालेले संकट, शासनाने गेल्या काही वर्षात जलस्वराज्य भारत निर्माण व स्वजल धारा योजना अंमलात आणून कोट्यावधी रुपये उपलब्ध करुन देऊनसुध्दा या योजना यशस्वीपणे राबविल्या गेल्या नसल्याने निर्माण झालेली पाणीटंचाई, लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांनी योग्य सांगड घालून दोडामार्ग मधील पाणीटंचाईचे कायमचे निवारण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या निवेदनामुळे माझे समाधान झाले असून मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

--------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मुंबई विमानतळावर काम करणारे कामगार व कंपनी व्यवस्थापन यांच्या कलहामध्ये पोलिसांचा होत असलेला हस्तक्षेप

**मु.शी.** : मुंबई विमानतळावर काम करणारे कामगार व कंपनी व्यवस्थापन यांच्या कलहामध्ये पोलिसांचा होत असलेला हस्तक्षेप यासंबंधी सर्वश्री किरण पावसकर, सुनील तटकरे, हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री धनंजय मुंडे, नरेंद्र पाटील, प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मुंबई विमानतळावर काम करणाऱ्या कामगारांच्या व कंपनी व्यवस्थापनाच्या कलहात पोलिसांचा मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप होत असणे, व्यवस्थापन पोलिसांच्या संगनमताने कायदा धाब्यावर बसविण्याचे काम करीत असणे, विमानतळावरील कामगारांकडून व्यवस्थापनाविरुध्द तक्रारी दाखल करुनही पोलिसांकडून कारवाई न होणे, उलटपक्षी सिनिअर पी.आय., सहार पोलीस स्टेशन ए.सी.पी. यांच्या अधिकारात नसतानाही त्यांनी विमानतळावर वाहनचालकांचे काम करणाऱ्या कामगारांना धमकावून त्यांच्याकडून वाहनांच्या चाव्या काढून घेवून त्यांना तडकाफडकी कामावरुन काढून टाकणे, त्यांच्या जागी नवीन कामगार भरणे, अशाप्रकारे पोलीस अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप होत असणे, परिणामी विमानतळावरील कामगारांच्या हिताच्या दृष्टीने व कायदा सुव्यवस्थेला बाधा पोहचण्याची निर्माण झालेली परिस्थिती, आदी गैरप्रकाराविरुध्द नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना कामगारांवर पोलिसाकडून होत असलेल्या अन्यायाच्या बाबतीत निश्चित भूमिका घेण्याबाबत दिलेल्या आश्वासनाची पूर्ती न केल्यामुळे कामगारांच्या तीव्र असंतोषामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."***

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री {शहरे}) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..6...

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मागील माझ्या 8 वर्षाच्या काळात मी सभागृहात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला आपण न्याय दिला. दिनांक 16 डिसेंबर, 2014 रोजी सभागृहात मी याच विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावरील चर्चेच्या अनुषंगाने आपण उप सभापती या नात्याने दिलेले निर्देश मी वाचून दाखवितो.

"लक्षवेधी सूचना सुरु झाल्यापासून मी माननीय मंत्र्यांची उत्तरे ऐकत आहे. मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, 50 कामगारांना कामावरून एकदम काढून टाकणे हा त्यांच्यावर घोर अन्याय झाला आहे. सदर प्रकरणी एसीपीचा काहीही संबंध नव्हता आणि असे असताना त्या एसीपीने 50 कामगारांना एकत्र बोलावून त्यांच्याकडून गाड्यांच्या चाव्या काढून घेऊन तिसऱ्या गुंडांच्या हातात देणे ही बाब संपूर्णतः आक्षेपार्ह आहे. वास्तविक पाहता, या गोष्टीचा तपास आपण निश्चितपणे चांगला कराल. परंतु, दरम्यानच्या काळात हे लोक मोकाट सुटतील. याकरिता माझी आपल्याला सूचना आहे की, एसीपीवर ताबडतोब कारवाई सुरु करावी आणि 50 निरपराध वाहनचालकांपैकी ज्या वाहनचालकांवर कोर्टात केसेस नसतील त्यांना ताबडतोब कामावर घेण्याच्या संदर्भात आपण आदेश द्यावेत." या निर्देशास अनुसरुन मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिले.

दिनांक 16 डिसेंबर, 2014 रोजी मी प्रश्न उपस्थित केला त्यावेळी ज्या 50 कामगारांना कामावरुन काढून टाकले, हे लोण पुढे वाढत जाईल अशी शंका व्यक्त केली होती. ती खरी ठरली आहे. तेथील 250 कामगारांना कामावरुन कमी केले आहे. तुम्हाला कामगार नको असतील तर ज्यांनी 10 ते 15 वर्षे सेवा केली आहे त्यांना पी.एफ., ग्रॅच्युईटीची रक्कम देऊन घरी पाठवा. ते त्यांची आयुष्याची कमाई घरी घेऊन जातील. आपण निर्देश देऊनही ऑक्टोबर, 2014 पासून आजपर्यंत त्या कामगारांना कामावर रुजू करुन घेतलेले नाही. आजच्या निवेदनावरुन सरकारची भूमिका अधिक गंभीर दिसून येते. दिनांक 16 डिसेंबर, 2014 रोजी मी विषय सभागृहात उपस्थित केल्यानंतर माझ्यावरच कारवाई करण्याच्या दृष्टीने कलम 502 अन्वये गुन्हा दाखल केल्याची बातमी वृत्तपत्रातून मला वाचावयास मिळाली. हा विधानपरिषदेचा सदस्य म्हणून माझा केवळ अवमान नसून सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, अन्यायाविरुध्द आवाज उठविला, सभागृहात विषय उपस्थित केला म्हणून माझ्यावरच कारवाई केली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

27-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N.8

SGB/ KTG/ AKN/ 13:10

श्री.किरण पावसकर....

जाणार असेल तर हा माझ्या विशेष हक्कभंगाचा विषय ठरतो. एसीपी, सिनियर पी.आय.यांच्यावर कारवाई करावी म्हणून आपण निर्देश दिले होते. त्या ऐवजी माझ्याविरुध्द खंडणीचा गुन्हा दाखल केला जातो. भविष्यात कोणावर अन्याय झाला म्हणून आवाज उठवावा अशी भूमिका कोण घेईल असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, कामगारांना देशोधडीला लावले, त्या संदर्भात आजच्या निवेदनामधून दोन-तीन मुद्दे उपस्थित होतात. माझा पहिला प्रश्न कामगारांना न्याय द्या हा होता. त्यांना अजूनही न्याय मिळालेला नाही. एसीपी आणि सिनियर पी.आय.वर कारवाई करावी अशी मागणी होती, ती कारवाई झालेली नाही. मी आवाज उठविला म्हणून माझ्यावर कारवाई करण्यासाठी एफआयआर दाखल केल्याची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली. पोलीस ठाण्याकडून मला काहीही कळलेले नाही.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या निवेदनामध्ये भयानक गोष्ट नमूद केली आहे. त्यात म्हटले आहे की, गुन्हयाची नोंद 25.11.2014 रोजी करण्यात आली आहे. जर युनियनच्या सदस्यांविरुध्द 25.11.14 रोजी गुन्हयाची नोंद केली असेल तर 16 डिसेंबर, 2014 रोजी सभागृहात लक्षवेधी सूचनेला अनुलक्षून जे निवेदन दिले गेले त्यात याचा उल्लेख का केला नाही? 25 फेब्रुवारीला गुन्हा नोंद होतो. 16 डिसेंबरला सदनासमोर ही बाब का आणली नाही? कॉन्ट्रॅक्टरने काढलेल्या कंपनीच्या जून्या कामगारांना कामावर घेतले की नाही हा वैयक्तिक प्रश्न आहे. एअर इंडियाच्या संदर्भात हायकोर्टाने दिलेल्या जज्जमेंटची प्रत मी आपल्याला देतो. त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, इतिहासामध्ये लाखो कर्मचारी एअरपोर्टवर काम करतात......

नंतर ओ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

आपणाला त्याच कर्मचाऱ्यांना घ्यावे लागते हे कायदाच सांगतो आहे. आपण जे निवेदन दिले आहे त्यात म्हटले आहे की, तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. आपण कधी पासून कायदे बदलायला लागला आहात हे देखील सांगितले पाहिजे. मी हायकोर्टाच्या 2991/199 केसकडे आपले लक्ष वेधतो. यात असे नमूद करण्यात आले आहे की,

म्हणजे कॉन्ट्रॅक्टर चेंज करा, पण अस्तित्त्वात असलेल्या कर्मचाऱ्यांनाच पुन्हा घ्यावे लागेल असा त्याचा अर्थ होतो. कारण त्यांची देखील सर्व्हीस 15 ते 20 वर्षे झालेली असते. उच्च न्यायालयाच्या जज्‌मेंटची प्रत मी आपल्याकडे पाठवित आहे. त्याच बेसिसवर आज पर्यंत काम सुरू आहे. कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा अधिकार पोलीस स्टेशनला नाही. कर्मचाऱ्यांना पगार मिळत होता पण तो पी.एफ.भरत नव्हता म्हणून कर्मचारी पोलीस ठाण्यामध्ये गेले. माननीय कामगार मंत्री श्री.प्रकाश महेता यांनी सांगितले की, मालकाने पी.एफ.चा नंबरच घेतला नाही. पी.एफ.भरत नसेल तर संबंधितांवर कारवाई करण्यात येते. पण ती कारवाई बाजूला राहिली. एवढेच नव्हे तर त्या कर्मचाऱ्यांना नोकरीवर घेण्यात आले नाही. आपण निदेश दिल्यानंतर देखील ए.सी.पी., सिनिअर पी.आय.यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. आपण लेखी निवेदनात ज्या तारखा नमूद केल्या आहेत त्या कोणाला तरी नीट विचारून नमूद करायला पाहिजे होत्या. मी कर्मचाऱ्यांसाठी आवाज उठवितो म्हणून माझ्या विरूद्ध खंडणीचे कलम लावण्यात आले. एका पक्षाच्या वृत्त पत्रामध्ये 19 फेब्रुवारी रोजी ही बातमी आली होती. छत्रपती शिवाजी इंटरनॅशनल एअरपोर्ट असे विमानतळाचे नावे असल्यामुळे तेथे शिवजयंती मोठ्या प्रमाणावर साजरी करण्यात येते. त्याच दिवशी बातमी आली की किरण पावसकर यांच्या विरूद्ध खंडणीचा गुन्हा दाखल. ज्या पक्षाच्या वृत्त पत्रात ही बातमी आली त्या पक्ष प्रमुखांना खंडणी, वर्गणी आणि हप्ता यातील फरक सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. कुठल्या कंपनीकडून त्यांना हप्ता मिळतो, खंडणी मिळते हे मी

श्री.किरण पावसकर...

देखील मांडू शकतो. सभापती महोदय, ए.सी.पी.आणि सिनिअर पी.आय.यांच्या विरूद्ध कारवाई करण्यासंबंधातील निदेश आपण डिसेंबर 2014 मध्ये दिले होते. त्याप्रमाणे शासन कारवाई करणार आहे काय ? तसेच कामावरून काढलेल्या निरपराध कामगारांना पुन्हा कामावर घेण्यास सांगण्यात येणार आहे काय ? खंडणी वसुल करण्यासंबंधातील खोटी बातमी वृत्त पत्रात येत असेल तर त्यासंबंधी आपण कोणती कारवाई करणार आहात ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी सदर विषय मांडला होता त्यावेळी माननीय कामगार मंत्र्यांनी त्यास उत्तर दिले होते. गो-एअरवेज कंपनीच्या कॅबिन क्रूला ने-आण करण्यासाठी जय माता दी या कंपनीला कंत्राट देण्यात आले होते. परंतु, त्यांचे कंत्राट संपल्यामुळे वायुदूत कंपनीला ते कंत्राट देण्यात आले. तेव्हा जुने सुपरवायझर आणि चालक यांनी गाड्या घेण्यास नकार दिला. तेव्हा तेथे डयुटीवर असलेल्या दोन्ही कंपनींच्या चालकांमध्ये वादविवाद झाल्यामुळे पोलिसांनी कौन्सिलिंग करून दुसऱ्या दिवशी मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. त्यावेळी त्यांनी नवीन कंत्राटदार कंपनीला जुने कामगार घेण्यास बाध्य करू सांगितल्यामुळे त्या दिवशी काम सुरळीत सुरू झाले. खरा प्रश्न दिनांक 28.10.2014 रोजीच्या रात्रौ 10.00 वाजताचा आहे. पगार झाल्यानंतर पी.एफ., ग्रॅज्युईटी संबंधात कंपनी आणि कामगारांमध्ये पुन्हा वाद सुरू झाला. त्यामुळे त्या दिवशी चालकांनी चाव्या त्यांच्याकडे ठेवल्यामुळे पोलिसांनी मध्यस्थी करून त्या चाव्या त्यांच्याकडून हिसकावून घेतल्या. हा ड्युटीचा भाग होता काय ? त्यावेळी पोलिसांची भूमिका काय होती ? त्यांनी एका कुठल्या कंपनीला मदत व्हावी म्हणून केले आहे काय, यासंबंधी संदिग्धता आहे. गेल्या वेळी या लक्षवेधी सूचनेवर माननीय कामगार मंत्र्यांनी उत्तर दिले होते. दिनांक 28.10.2014 रोजीच्या रात्री जी घटना घडली आहे त्याची सखोल चौकशी करण्यात येईल व त्यात कोणाची किती जबाबदारी आहे हे पाहण्यात येईल. जबाबदारीच्या बाहेर जाऊन कोणाला तरी पार्शननेस दाखविण्यासाठी ए.सी.पी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

किंवी सिनिअर पी.आय. यांनी काम केले असेल, एखाद्या कंपनीच्या बाजूने काम केले असेल तर त्याची सखोल चौकशी करण्यात येईल. येत्या 15 दिवसामध्ये किंवा महिन्याभरामध्ये काहीना काही मार्ग यात काढला जाईल. कारण यातील काही प्रश्न हे कामगार विभागाशी देखील संबंधित आहेत. जवळ जवळ 50 लोकांच्या ग्रॅज्युईटीचा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आलेला आहे. येथे उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देखील देण्यात आला आहे. कंपनी कुठली आली तरी जुन्या कामगारांना घेणे बाध्य आहे असे त्यात नमूद केलेले आहे. त्यामुळे एक संयुक्त बैठक माझ्या दालनात आयोजित करून त्या बैठकीला कामगार मंत्र्यांना देखील बोलाविण्यात येईल. मी सदनाला शब्द देतो की, ए.सी.पी. आणि सिनिअर पी.आय.यांनी आपल्या कार्यकक्षेच्या बाहेर जाऊन कोणाला पार्शननेस दाखविण्याचा प्रयत्न केला असेल तर कडक कारवाई करण्यात येईल. सदर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर आपल्यावर केस दाखल करण्यात आली असा सन्माननीय सदस्यांचा मुद्दा होता. दिनांक 14 नोव्हेंबर 2014 रोजी वायुदूत कंपनीचे मालक श्री.शांकी अग्रवाल यांनी ऑल इंडिया एव्हिएशन एम्प्लॉईज असोसिएशनचे अध्यक्ष व इतर कार्यकर्त्यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार केल्यामुळे दिनांक 25.11.2014 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर दिनांक 25.11.2014 रोजी वायुदूत व जय माता दी या कंपनीच्या लोकांनी पोलिसांमध्ये परस्पारांविरोधात तक्रार केलेली आहे. या प्रकरणाचा तपास नीट होत नसल्यामुळे वायुदूत कंपनीच्या मालकांनी कोर्टामध्ये याचिका दाखल केली आहे. सदर बाब न्यायप्रविष्ट आहे अशी माझी माहिती आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. येथे दोन कंपन्यांमधील वाद दिसून येत आहे. पहिल्या कंपनीचे कंत्राट संपल्यानंतर दुसऱ्या कंपनीला कंत्राट देण्यात आले आहे. पहिल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना दुसऱ्या कंपनीने घेतले पाहिजे असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. तेव्हा यातील नेमकी वास्तविकता काय आहे ? तसेच दोन्ही कंपन्यांमध्ये जो काही करार झाला असेल त्याचे स्वरूप काय होते ? एक प्रकरण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

27-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O 4

BGO/ AKN/ KTG/ भोगले... 13:20

श्री.माणिकराव ठाकरे....

न्यायप्रविष्ट असल्याचे देखील माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे. नवीन कंपनी येत असताना जुन्या कंपनीतील सर्वच कामगारांना सामावून घेतले पाहिजे की, काही प्रमाणात सामावून घेतले पाहिजेत यासंबंधातील कामगार कायद्यातील नियम काय आहेत याची देखील माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी चांगला प्रश्न विचारला आहे. दिनांक 1.10.2014 रोजी या प्रकरणात काही मार्ग निघतो काय यासाठी ए.सी.पी., पी.आय. यांनी दोन्ही कंपनीच्या प्रतिनिधींसोबत एक बैठक घेतली. त्याचे प्रोसिडिंग नाही. ही फॉर्मल मिटींग होती. काही तरी मार्ग काढण्यासाठी यात प्रयत्न करण्यात आला होता. जय मता दी कंपनीतील ज्या कर्मचाऱ्यांवर केसेस नाहीत, जे चांगल्या वर्तणुकीचे कर्मचारी होते ते वायुदूत कंपनीच्या अटी व शर्तीनुसार त्या कंपनीमध्ये काम देखील करीत होते. ते कर्मचारी वायुदूत कंपनीसोबत एक महिना काम करीत होते. 1 तारखेपासून ते 28 तारखे पर्यंत सर्व काही सुरळीत चालले होते.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील....

परंतु त्या रात्री वेजेस किंवा इतर काही कारणामुळे दोन कंपन्यांच्या चालकांमध्ये वाद झाला होता.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सुप्रीम कोर्टाचा या दाखला या ठिकाणी दिलेला आहे. परंतु त्यासंदर्भातील निर्णय मला सुध्दा माहिती नाही. हा विषय कामगार कायद्याच्या संबंधित असून तो विषय गृहविभागाच्या कक्षेत येत नाही. परंतु तरी सुध्दा हा कायदा माझ्यापर्यंत पोहचला तर पुढील बैठकीमध्ये यासंदर्भात ॲडव्होकेट जनरलचे देखील मत घेतले जाईल आणि जर जुन्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना कायद्याच्या निदेशा प्रमाणे प्रोटेक्शन असेल तर त्यासंदर्भात नवीन कंपनीतील पहिल्या लोकांना प्रथम सामावून घेण्याच्या संदर्भात बाध्य केले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, "ऑल इंडिया एव्हिएशन एम्पलॉईज असोशिएशनचे अध्यक्ष व त्यांच्या इतर कार्यकर्त्यांनी 20 लाख रूपयाच्या हप्त्याची मागणी करून हप्ता न दिल्यास वायुदूत कंपनीचे काम बंद पाडण्याची धमकी दिल्यामुळे संबंधितांवर गुन्हा दाखल झाला. ज्यावेळेस अशा प्रकारे खंडणीचे गुन्हे दाखल होतात त्यावेळेला धमकी खरोखर दिली आहे की नाही, फोन किंवा मोबाईलवरून धमकी दिली आहे की, नाही यासंदर्भात पोलिसांना ताबडतोब निर्णय करता येऊ शकतो. कोणी कोणत्या फोनवरून कोणाला किती वाजता धमकी दिली याची माहिती पोलिसांना ताबडतोब मिळू शकते. हा गुन्हा 5 महिन्यापूर्वी दाखल झालेला आहे. उच्च न्यायालयात यासंदर्भात याचिका प्रलंबित असून तो भाग वेगळा. परंतु या गुन्हयाचा स्वतंत्रपणाने तपास करीत असताना पोलिसांना असे आढळले असेल की, अध्यक्षांना गोवण्यासाठी केवळ तक्रार म्हणून तक्रार केली असेल तर यासंदर्भात रि समरी करून हा गुन्हा फायनल करण्याचे काम सरकार करणार आहे काय ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, यासंदर्भातील भूमिका अशी आहे की, रिट याचिका क्रमांक 4710/2014 ही बाब न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्याबाबत अधिक भाष्य करणे योग्य होणार नाही असे मला वाटते. परंतु धोरण म्हणून येत्या काळात जेव्हा अशी परिस्थिती निर्माण होईल त्यावेळेस खालच्या यंत्रणेपर्यंत निश्चितपणे संदेश दिले जातील की, अशा प्रकारची कोणतीही

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील.......

तक्रार असेल, तक्रार केवळ इन्टेश्नली त्रास देण्यासाठी असेल, समोरच्या माणसाची समाजामधील प्रतिष्ठा मलीन करण्यासाठी प्रयत्न होत असेल तर त्यासंदर्भातील कडक मेसेजेस विभागाला दिले जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : ***कल्याण-डोंबिवली भागातील पाणी प्रश्न सोडविण्याची आवश्यकता***

**मु.शी.** : ***कल्याण-डोंबिवली भागातील पाणी प्रश्न सोडविण्याची आवश्यकता*** यासंबंधी सर्वश्री ***श्री. संजय दत्त, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, मुझफ्फर हुसेन सय्यद, रामहरी रुपनवर, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ. सुधीर तांबे, श्री. शरद रणपिसे,*** वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"कल्याण पूर्व व पश्चिम, मोहने-टिटवाळा व डोंबिवली भागात नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असून पाण्याची मागणी त्याच प्रमाणे वाढत असणे, परंतु महापालिकेतर्फे पाण्याच्या टंचाईकडे दुर्लक्ष होत असल्याने परिणामी या भागातील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असणे, याबाबत दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांच्यासोबत झालेल्या बैठकीत पाणीटंचाई दूर करण्यासाठी निर्णय होऊन त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नसणे, सद्य:स्थितीत जलसंपदा विभागाकडून ४० एम.एल.डी. पाणी महानगरपालिका घेत असून त्याबाबत कोणताही करारनामा आलेला नसल्याने दरमहा रु. ११ लाख दंड जलसंपदा विभाग महापलिकेकडून वसूल करत असणे, कल्याण डोंबिवलीला उल्हास नदीतून पाणीपुरवठा करण्यासंदर्भात प्रत्यक्ष उपलब्ध पाणीपुरवठा व प्रत्यक्ष पाणी वापर यामध्ये तूट आढळून येत असणे, त्यामुळे तात्रिकदृष्ट्या करारनामा करुनही पाणी उपलब्ध होत नसणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडून नवी मुंबईस होणारा १४० द.ल.लि. पाणी पुरवठा बंद करुन तो कल्याण डोंबिवली महानगर पालिकेस वर्ग करण्याबाबत उच्चाधिकारी समितीत निर्णय झालेला असणे, परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने अद्यापपर्यंत सदर कोटा जलसंपदा विभागास हस्तांतरीत केलेला नसणे, दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजीच्या जलसंपदा मंत्री यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असूनही शासन जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे जोपर्यंत पाणी प्रश्न सुटत नाही तोपर्यंत सभा चालू देणार नाही असा नगरसेवकांनी पालिका प्रशासनाला दिनांक २० मार्च, २०१५ च्या महापालिका सभेत इशारा देणे, तीव्र पाणी टंचाईने नागरिक हैराण झाले असताना दुसरीकडे पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या जलवाहिनीतून दूषित व गढूळ पाणी नागरिकांना वितरीत होत असणे, त्यामुळे या भागात पाणीप्रश्न चिघळत असून त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा तसेच नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न याकडे राज्य शासनाने हस्तक्षेप करुन कल्याण-डोंबिवली पाणीप्रश्न सोडविण्यासाठी कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."***

श्री. विजय शिवतारे ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मुळात या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरालाच माझा आक्षेप आहे. सभागृहाची दिशाभूल करणारे व मुख्य विषयाला बगल देणारे उत्तर शासनातर्फे देण्यात आलेले आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील लाखो लोकांना पाण्याची टंचाई भेडसावत आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या 3 महासभा वेगवेगळया दिवशी झाल्या होत्या व या ठिकाणच्या पाण्याचा प्रश्न शासनाने त्वरित सोडवावा यासाठी सर्वपक्षीय नगरसेवकांनी या महासभा स्थगित केल्या होत्या. सभापती महोदय, या विषयाची आपल्याला संपूर्ण माहिती आहे. दि. 17 एप्रिल, 2013 रोजी मी या विषयाची पहिली लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केली होती. आपण ठाणे जिल्हयाचे नेते असल्यामुळे, या लक्षवेधी सूचनेच्या उत्तराने आमचे समाधान होत नसल्यामुळे या विषयाच्या संदर्भात संबंधित लोक प्रतिनिधींची बैठक बोलविण्यात यावी अशी विनंती केली होती. यासंदर्भात पहिली बैठक आपण 11 जून, 2013 रोजी बोलावली होती व दुसरी बैठक दि.18 जून, 2013 रोजी बोलावली होती. त्या बैठकीला ठाणे जिल्हयाच्या पालकमंत्र्यांसह सर्व संबंधित सदस्य तसेच अधिकारी उपस्थित होते. यानंतर दि. 1/8/2013 रोजी या विषयाच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केली. या लक्षवेधी सूचनेला त्यावेळचे माननीय जलसंपदा मंत्री श्री. सुनील तटकरे यांनी असे उत्तर दिले होते की, "ही वस्तुस्थिती आहे की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला बारबी धरणातून प्रतिदिन 140 द.लि.पाणी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला होता. दिनांक 16/11/2005 रोजी झालेल्या बैठकीमध्ये नवी मुंबई करिता मोरवे धरणातून पाणी पुरवठा झाला. त्यासाठी उपलब्ध असलेले पाणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला देण्याचा निर्णय झाला. उच्चाधिकार समितीची दिनांक 13/8/2009 रोजी बैठक झाली. त्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये सुध्दा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला आज एमआयडीसी मार्फत पाणी उपलब्ध करुन दिले जाते. त्याऐवजी थेटपणे पाणी उचलण्यास मान्यता देण्यात आली. परंतु या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. त्या बैठकीत ठरल्या प्रमाणे एमआयडीसी बरोबर जो करारनामा झाला होता तो रद्द करुन जलसंपदा विभागाकडून उच्चाधिकार समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला थेटपणे पाणी देण्याचा निर्णय येत्या महिन्याभरात कार्यान्वित केला जाईल." सदरचे आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी दिनांक 1/8/2013 रोजी दिले होते. शासनाने या विषयाच्या संदर्भात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय दत्त .....

आज जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये शासन मान्य करते की, दि.13/8 रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ वर्ग करु न शकल्याने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेसमवेत आरक्षणाचा करार करण्यात आलेला नाही.

त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, ज्या उच्चाधिकार समितीमध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तसेच माननीय जलसंपदा मंत्री तसेच सरकारचे सर्व प्रमुख प्रतिनिधी आश्वासन देतात. त्यानंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका जेएनएनयुआरएम मार्फत 350 कोटी रुपये खर्च करुन वॉटर ट्रिटमेंट प्लँट उभा करते. पाणी वर्ग करु अशी शासनाने हमी दिल्यामुळे हा वॉटर ट्रिटमेंट प्लँट उभा केला गेला. परंतु आज नवीन शासन वेगळी भूमिका घेऊन सांगत आहे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने पाणी वर्ग केले नाही. हा काय प्रकार सुरु आहे ? शासनाने यासंदर्भात निर्णय घेतल्यानंतर शासनाच्या एका विभागातील अधिकाऱ्यांनी निर्णयाची अंमलबजावणी केली नाही त्यामुळे शासन अशा अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार आहे, या निर्णयाची अंमलबजावणी हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन करणार आहे काय ?

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, आपल्याला या प्रश्नाबद्दलची संपूर्ण माहिती आहे. सन 2005 साली या विषयाच्या संदर्भात पहिली बैठक झाली व सन 2009 मध्ये उच्चाधिकार समितीने पाणी दिले. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दत्त साहेबांनी सन 2013 नंतर बऱ्याच वेळा लक्षवेधी सूचना उपस्थित केली परंतु या प्रश्नाचे उत्तर अद्यापि सुटलेले नाही. उच्चाधिकार समितीचा निर्णय एमआयडीसीच्या अधिकाऱ्याने पाळला नाही म्हणून त्यावर निलंबनाची कारवाई करणे किंवा त्याच्या अडचणी समजून न घेता कारवाई केली तर ते योग्य होणार नाही. केवळ एमआयडीसीच्या अधिकाऱ्याचे निलंबन करुन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आणि या परिसरातील संपूर्ण औद्योगिक वसाहतीला मिळणाऱ्या पाण्याचा जो सोर्स आहे त्याचा अभ्यास केला तर पुणे जिल्हयातील आंध्रा धरणातील 7.5 टीएमसी पाण्यावर जलनिर्मिती झाल्यावर ते पाणी उल्हास नदीत सोडले जाते व हे पाणी नंतर जांभूळ के.टी.वेअरमध्ये येते. ठाणे जिल्हयातील बारवी धरण हे 6

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय शिवतारे.........

टीएमसीचे आहे. जांभूळ केटीवेअरचे पाणी बारवी धरणात येते व तेथून या पाण्याचे डिस्ट्रीब्यूशन होत असते. या एकत्रित पाण्याचा हिशोब केला तर या पाण्यामध्ये आजच्या घडीला 14 टक्क्याची तूट आहे. ही तूट तांत्रिक थेअरॉटीकलवर आहे.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे....

आपण प्रत्यक्ष पाण्याचा वापर पाहिला तर तो दिवसाला 1267 एमएलडी आहे. या संदर्भातील मी आपणास आकडेवारी देतो. आपण 257 दिवसांचे पाणी वाटप आणि दिवसाचा 1267 एमएलडी पाण्याचा हिशोब केला तर 325 दशलक्ष घनलीटर पाणी साठा वापरला जातो. सिंचन कालावधीसाठी साधारणतः 42.33 दशलक्ष घनलीटर पाणी साठा वापरला जातो. एकूण 367.95 दशलक्ष घनलीटर पाण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये 10 टक्के वहन तूट म्हणजे ट्रान्समीशन लॉस 36.80 आहे म्हणजे एकूण 404.7 दशलक्ष घनलीटर पाण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे पाणी किती उपलब्ध आहे ते सांगतो. आंध्रामधून 213 दशलक्ष घनमीटर आणि बारवी धरणातून 172 दशलक्ष घनमीटर म्हणजे एकूण 385 दशलक्ष घनलीटर पाणी उपलब्ध होते. बाष्पीभवनाचे 38 दशलक्ष घटलीटर पाणी वजा केले तर एकूण 346.55 दशलक्ष घनलीटर पाणी वाटपासाठी उपलब्ध आहे. म्हणजे एकूण आकडेवारी 404.75 वजा 346.55 केले तर 58.15 दशलक्ष घनलीटर म्हणजे 14 टक्के शॉर्टेज आहे. प्रत्यक्षातील पाणी पुरवठा 1510 म्हणजे 25 टक्के होतो. हा प्रश्न बैठका घेऊन सुटणार नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या संदर्भात दिनांक 15 जानेवारी रोजी बैठक घेतली होती. बारवी धरणाची साठवण क्षमता 6 टीएमसी आहे. आपण बारवी धरणाची उंची वाढविण्याचे काम प्रस्तावित केले असून जवळपास 80 टक्के काम पूर्ण झालेले आहे. त्या ठिकाणी गेटस बसविल्यानंतर अजून सहा टीएमसी पाणी वाढणार आहे म्हणजे 12 टीएमसी पाणी साठा होणार आहे. आपण सहा टीएमसी पाणी साठा वाढविला तर सहा गावे बुडीत क्षेत्रात जाणार आहेत. आपण दरवाजे न लावता फक्त अपेक्षित आरसीसीची उंची वाढविली तर दोन टीएमसी पाणीसाठा वाढू शकतो. यामुळे आपल्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटू शकेल. दोन टीएमसी पाणी साठा वाढविण्यासाठी धरणाची उंची वाढविली तर त्यामध्ये दोन गावे आणि 120 कुटुंबे बाधित होत आहेत. या 120 कुटुंबाचे पुनर्वसन करावे लागेल. या प्रश्नाबाबत जलसंपदा मंत्री, मा.पुनर्वसन मंत्री, आयुक्त,जिल्हाधिकारी, ठाणे या सर्वांनी एकत्र बसून पुढील आठ-दहा दिवसांत निर्णय घेतला जून महिन्यात हे काम पूर्ण करण्यात येईल. गेटस बसविण्याचे काम नंतर बसविण्यात येतील. पण

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे....

आपले दोन टीएमसी पाणी वाढल्यामुळे हा प्रश्न ताबडतोब सुटणार आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, यामध्ये अतिशय तातडीने निव्वळ आर्ग्युमेंट करण्यापेक्षा हा प्रश्न 100 टक्के सुटणार आहे. पुनर्वसन मंत्री, जलसंदा मंत्री, आयुक्त, आणि सर्व संबंधित अधिकारी यांनी एकत्र बैठक घेऊन पुनर्वसनाचा प्रश्न सोडविला तर बारवी धरणात दोन टीएमसी पाणी साठा वाढण्यासाठी धरणाची उंची वाढविण्याचे काम एक महिन्यात पूर्ण होऊ शकते. फक्त दोन गावे आणि 120 कुटुंबाच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे. आपण हा प्रश्न युद्ध पातळीवर सोडविला तर दोन टीएमसी पाणी अडविले जाईल आणि कल्याण-डोंबिवली भागासाठी आवश्यक असलेले पाणी त्यांना देता येईल. हा प्रश्न 100 टक्के सुटू शकतो फक्त सर्वांनी सामंजस्यपणे लक्ष घालण्याची गरज आहे.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे परंतु मला ते त्यांचे उत्तर इसापनीतीतील गोष्टीप्रमाणे वाटले. इसापनीतीतील गोष्टीमध्ये जसे असे झाले तर असे होईल, तसे झाले तर असे होईल. आम्ही हे सर्व दोन-चार वर्षे ऐकत आहोत. या प्रश्नाच्या संदर्भातील आपल्या भावना मला समजल्या. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, रोगापेक्षा इलाज भयंकर असे होऊ नये. कारण गेटस बसविण्यासाठी बराच वेळ लागेल. इट वील टेक टाईम. आज अशी परिस्थिती आहे की, खेडेगावात जशा महिला 10-11 मैलावरुन हंडेभरुन पाणी आणतात त्याप्रमाणे या भागातील महिला ट्रेनने दुसऱ्या भागातून पाणी आणून भरत आहेत इतकी विदारक परिस्थिती आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भात बैठक घेण्यात येईल. ती बैठक येत्या सोमवारी किंवा मंगळवारी घेऊन त्या बैठकीमध्ये सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बोलवावे. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना देखील बैठकीसाठी बोलवावे. आपण हा प्रश्न निकाली काढण्याकरिता तातडीने उपाययोजना कराव्यात.

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, या प्रश्नावर दोन-तीन वेळा बैठका होऊन त्यामध्ये खूप चर्चा देखील झालेली आहे. आपण कितीही ऊहापोह केला तरी उल्हास नदीच्या खोऱ्यात तेवढेच पाणी आहे. आपण नवी मुंबईतील लोकांचे पाणी कमी केले तर ते ओरड करतील. मीरा-भाईंदरचे पाणी कमी करावयाचे म्हटले तर त्यांची परिस्थिती अतिशय भयानक आहे. ठाण्याची परिस्थितीसुद्धा तशीच आहे. रोगापेक्षा इलाज भयंकर असे आपण म्हणालात ते बरोबर आहे. परंतु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन....

आपणास शेवटी निर्णयाप्रत यावे लागेल. नवी मुंबई महानगरपालिकेने सांगितले होते की, आम्ही मोरबे धरणातून 140 एमएलडी पाणी घेऊ. त्याप्रमाणे उच्चाधिकार समितीने निर्णय घेतला की, शिल्लक राहिलेले पाणी तुम्हाला देण्यात येईल. परंतु नवी मुंबईने मोरबे धरणाचे पाणी घेतले आणि उल्हासनगर नदीवरील पाण्याचा अधिकार सोडला नाही म्हणून हा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपण नवी मुंबई महानगरपालिकेला पाणी कमी करण्यास सांगितले तर ते सांगतात आमची लोकसंख्या वाढलेली आहे, सोसायट्या वाढत आहेत. म्हणजे ज्याच्या भागातील पाण्याला हात लावण्याचा प्रयत्न केला तर ते अशी कारणे सांगतात.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे तोडगा काढावा लागेल. महानगरपालिकेने सांगितले आम्ही सहा कोटी रुपये देण्यास तयार आहोत, पण आपण धरण बांधून द्या. परंतु आपणास धरण बांधायचे असेल तर पुनर्वसनाचा प्रश्न येतो. त्या ठिकाणी 120 कुटुंबाचा प्रश्न आहे. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटला तर दोन टीएमसी पाणी उपलब्ध होईल आणि त्यातून सर्वांना मदत होईल. 120 कुटुंबे लवकर हलविण्यात आली तर आपले काम लवकर होईल. सहा कोटी रक्कम काही जास्त नाही. ते काम झाल्यानंतर उर्वरित चार टीएमसी पाणी साठविण्यासाठी चार गावांचे स्थलांतर करावे लागेल, तो पुढचा प्रश्न आहे. आज आपण कल्याण-डोंबिवली भागाचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी नवी मुंबई, मीरा-भाईंदर, ठाणे महानगरपालिकांचे पाणी कमी केले तर ते आमचे पाणी का केले म्हणून ते ओरड करतील. कारण आपणास कुणाचे पाणी वाढवावयाचे असेल तर कुणाचे तरी पाणी कमी करावे लागेल. आपण सांगितल्याप्रमाणे बैठक घेण्यात येईल. परंतु आपणास या प्रश्नावर तोडगा काढायचा असेल तर वर सुचविल्याप्रमाणे हाच एक मार्ग आहे. लवकरात लवकर 120 कुटुंबाची व्यवस्था करून दोन टीएमसी पाणी वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच आपण सांगितल्याप्रमाणे सोमवार किंवा मंगळवारी बैठक घेण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले. आपणही हस्तक्षेप करुन शासनला निर्देश दिलेत. एक गोष्ट खरी आहे की, एमएमआर रिजनमध्ये लोकसंख्या वाढत आहे. त्या खोऱ्यामध्ये पाण्याची उपलब्धता प्रचंड प्रमाणात आहे. मराठवाडा आणि इतर ठिकाणी पाण्याच्या उपलब्धतेबाबत तूट आहे. कृष्णा खोरेमध्ये काही प्रमाणात तूट आहे. परंतु उल्हासनगरच्या बेसीनमध्ये पाण्याची तूट नाही. या ठिकाणी माननीय मंत्री आणि राज्यमंत्र्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, बारवी धरणातील पाणी ठाणे महानगरपालिका घेते, मीरा-भाईंदर महानगरपालिका घ्ेते, भिवंडी महानगरपालिका तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका पाणी घेते आणि नवी मुंबई महानगरपालिका देखील त्यातून पाणी घेते. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितले की, उच्चाधिकार समितीने एमआयडीसीचा पाण्याचा कोटा रद्द करुन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा पाण्याचा कोटा वाढविला होता. पाण्याचे वाटप कशा पद्धत्ीने केले जावे हा अधिकार उच्चाधिकार समितीचा आहे. त्यावेळी त्याची अंमलबजावणी झाली असती तर हा प्रश्न उद्भवला नसता. भविष्यात ठाणे महानगरपालिकेची पाण्याची गरज वाढणार आहे. त्यांना सुद्धा स्वतंत्र धरणाची आवश्यकता आहे. तेव्हा आपण सोमवारी बैठक घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा. श्री.नारायण राणे उद्योग मंत्री असताना त्यांनी बारवी धरण्याची उंची वाढविण्यासाठी पॅकेज दिले होते. त्याचाशेतकऱ्यांवर सकारात्मक परिणाम झालेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

त्याची अंमलबजावणी सुध्दा तातडीने करावी. एमएमआर रिजनचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी ठाणे जिल्ह्यामध्ये जो अतिरिक्त पाणीसाठा आहे, त्याचे नियोजन कालबध्द पध्दतीने करावयास पाहिजे. काळू, शाही, वसई-विरार धरणाच्या बाबतीत काही प्रश्न असतील. या निमित्ताने एवढेच विचारतो की, या प्रकरणी माननीय जलसंपदा मंत्री आणि अन्य विभागांनी तातडीने नियोजन करुन पाणी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल काय ?

श्री.गिरीश महाजन : महोदय, वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी हा रेशिओ कुठे बसत नाही. उल्हास नदीच्या खोऱ्यात पाणी आहे, परंतु उंची वाढविल्याशिवाय अन्य पर्याय नाही. पण शेवटी आपल्याला पाणी अडवावे लागणार आहे. त्यामुळे आजच्या घडीला तत्काळ काही करावयाचे असेल तर 2 टीएमसी पाणी अडविता येईल. त्यातून अनेक भागातील पाण्याचा प्रश्न बराचसा मार्गी निघेल, असे मला वाटते. हा उपाय योग्य आहे. तसेच या विषयी सोमवारी किंवा मंगळवारी बैठक घेऊ आणि याबाबत निर्णय घेऊ.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : नागपूर शहरातील शासकीय मुद्रणालय इमारतीच्या आधुनिकीकरणाच्या कामास सुरुवात न होणे

**मु.शी.** : नागपूर शहरातील शासकीय मुद्रणालय इमारतीच्या आधुनिकीकरणाच्या कामास सुरुवात न होणे, यासंबंधी सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, अनिल सोले, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर शहरातील 150 वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली शासकीय मुद्रणालयाची इमारत जीर्ण झाल्यामुळे केव्हाही कोसळून दुर्घटना घडण्याची व जीवित आणि वित्त हानी होण्याची दाट शक्यता, या मुद्रणालयातील जुनाट झालेल्या मशिनी, या मुद्रणालयात अनेक पदे मागील अनेक वर्षांपासून रिक्त पडून असणे, या संबंधी कामगार संघटनेतर्फे शासनास वारंवार पत्रव्यवहार करुन दिलेल्या सूचना, यासंबंधी शासनाने एक आराखडा तयार करुन आधुनिकीकरण करण्याच्या प्रस्तावास दिनांक 28 जानेवारी, 2002 रोजी मंजुरी देवूनही लागणाऱ्या निधीची तरतूद न केल्यामुळे सदरहू कामास सुरूवात न होणे, परिणामी, कामगार वर्गात निर्माण झालेली भीती, या गंभीर व महत्त्वाच्या प्रश्नाकडे शासनाने जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, यावर शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची उपाययोजना व यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री.प्रवीण पोटे-पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, नागपूर येथील शासकीय मुद्रणालयाची इमारत जीर्ण झाल्यामुळे कामगार, कर्मचारी आणि अधिकारी यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे मी आणि सन्माननीय सदस्य श्री.अनिल सोले यांनी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे.

महोदय, नागपूर शहरात 150 वर्षापूर्वी बांधण्यात आलेली शासकीय मुद्रणालयाची इमारत जीर्ण झाली आहे. या इमारतीला पाडून त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याचा निर्णय दिनांक 28 जानेवारी 2002 रोजी झाला होता. त्यावेळी नवीन इमारत बांधण्यासाठी 13 कोटी 98 लाख 63 हजार रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतु तद्‌नंतर शासनाने आपला निर्णय बदलला आणि ही इमारत बीओटी तत्त्वावर बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु या निर्णयाला सुध्दा मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे शासनाने ही इमारत स्वत: बांधण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी 25 कोटी 21 लाख 95 हजार 600 रुपयांचे सुधारित अंदाजपत्रक शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले. सदरहू अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरही त्या इमारतीचे बांधकाम सुरु झाले नाही. म्हणून दिनांक 28 जानेवारी, 2014 रोजी पुन्हा नव्याने 46 कोटी 51 लाख 30 हजार 300 रुपयाच्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. हा सर्व प्रकारावरुन प्रशासनाच्या कारभारातील दिरंगाई आणि शासकीय यंत्रणेची असंवेदनशीलता लक्षात येते. महोदय, जीर्ण झालेल्या शासकीय मुद्रणालयाच्या इमारतीचे बांधकाम 2002 पासून अद्यापपर्यंत सुरु होऊ शकलेले नाही. या निमित्ताने माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, सदरहू जीर्ण झालेल्या इमारतीमध्ये शेकडो कामगार व अधिकारी/कर्मचारी आपला जीव धोक्यात घालून काम करीत आहेत, त्यांच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये म्हणून शासन या संदर्भात तत्काळ दखल घेऊन या इमारतीच्या बांधकामासंदर्भातील कार्यवाही सुरु करणार काय ?

महोदय, या मुद्रणालयात गट-अ चे 1, गट-क चे 75 आणि गड-ड चे 21, अशाप्रकारे एकूण 97 पदे रिक्त आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, सदरहू रिक्त पदे तत्काळ भरणार काय, तसेच त्या मुद्रणालयामध्ये अत्याधुनिक यंत्रसामुग्री बसविणार काय ? अशाच प्रकारची परिस्थिती पुणे येथील शासकीय मुद्रणालयाची झालेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेतून नागपूरच्या शासकीय मुद्रणालय इमारतीची वस्तुस्थिती मांडली आहे. ही इमारत 150 वर्षांपूर्वीची आहे. सदरहू इमारतीच्या बांधकामाबाबत सांगू इच्छितो की, बांधकाम विभागाने या संदर्भातील प्रस्ताव नियोजन विभागाकडे पाठविलेला आहे. उक्त विभागाकडून 46.51 कोटी रुपयांचा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करुन घेऊन, सदरहू इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात येणार आहे.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी सदरहू शासकीय मुद्रणालयातील रिक्त पदांबाबत प्रश्न विचारला आहे. मी सांगू इच्छितो की, जी पदे रिक्त आहेत ती भरण्याची कार्यवाही सुरु आहे. ती पदे लवकरात लवकर भरण्यात येतील. या निमित्ताने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, शासकीय मुद्रणालय, नागपूर येथे गट-अ चे 1, गट-क ची 75 आणि गट-ड ची 21 पदे रिक्त आहेत.

श्री.भाई जगताप : महोदय, किती पदे रिक्त आहेत या बाबतची माहिती सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. त्यामुळे माननीय मंत्र्यांनी एवढेच सांगावे की, ही रिक्त पदे केव्हा भरणार आहात ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, ही पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून, सदरहू पदे ताबडतोब भरण्यात येतील.

प्रा.जोगेंद्र कवाडे : महोदय, नागपूर शहरातील शासकीय मुद्रणालयाची इमारत 150 वर्षांपूर्वीची आहे. त्या इमारतीला एक इतिहास आहे. माननीय मंत्र्यांनी रिक्त पदे भरण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. शासकीय मुद्रणालय इमारतीचे पुनर्निर्माण किंवा नूतनीकरण, तेथे अत्याधुनिक यंत्रसामुग्री बसविणे आणि त्या ठिकाणी रिक्त असलेली पदे भरणे या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. या इमारतीसाठी 2009 पासून पंचवार्षिक योजनेमध्ये जो निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्यातून 2010-11 ते 2014-15 या कालावधीत वेगवेगळ्या प्रकारची 46 यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पण आजच्या घडीला ही इमारत जीर्ण झालेली आहे. त्या इमारतीमध्ये शेकडो कर्मचारी आणि तंत्रज्ञ

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

काम करीत आहेत. आजच्या घडीला ती इमारत कोसळली तर त्यात नवीन बसविलेली यंत्रसामुग्री

..5..



प्रा.जोगेंद्र कवाडे....

सुध्दा नष्ट होईल. ती इमारत जीर्ण झाल्यामुळे वित्त व जीवित हानी होऊ नये म्हणून त्या इमारतीची पुनर्बांधणी करणे गरजेचे आहे. विहित मुदतीत इमारतीची पुनर्बांधणी केली नाही तर जीवित हानी बरोबरच वित्तीय हानीसुध्दा होईल व यंत्रसामुग्रीवर केलेला खर्च वाया जाईल. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, शासकीय मुद्रणालय इमारतीची पुनर्बांधणी नेमकी केव्हा करणार आहात ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : महोदय, मी या बाबत मी अगोदरच उत्तर दिलेले आहे. बांधकाम विभागाने 46.51 कोटी रुपये किंमतीचा बांधकामाचा प्रस्ताव मंजुरीसाठी नियोजन विभागाकडे पाठविलेला आहे. या कामी नियतव्यय मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहे.

श्री.भाई जगताप : महोदय, 2002 पासून हा प्रश्न प्रलंबित आहे. मी शासनाचे स्वागत करतो की, शासनाने या कामी सकारात्मक भूमिका घेतली आहे. मी या निमित्ताने एवढेच विचारतो की, इमारतीचे बांधकाम किती कालावधीत सुरु केले जाईल, तसेच रिक्त पदे किती कालावधीत भरण्यात येतील ? महोदय, नुकताच अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे. परंतु त्यामध्ये या इमारतीच्या बांधकामासाठी नियतव्यय प्रस्तावित केल्याचे दिसत नाही. माननीय मंत्री महोदय, सांगत आहेत की, वित्त विभागाकडे या संदर्भातील प्रस्ताव पाठविलेला आहे. पण अर्थसंकल्पात या कामासाठी एका पैशाचीही तरतूद नाही. त्यामुळे या कामासाठी तरतूद कशी करण्यात येणार आहे, तसेच इमारतीच्या पुनर्बांधणीचा विषय किती कालावधीत निकाली काढण्यात येणार आहे ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, रिक्त पदे भरण्याच्या बाबतीत सांगू इच्छितो की, एमपीएससीने दोन उमेदवारांची शिफारस केली असून, यापैकी गट-अ चे एक पद तातडीने भरण्याचा सरकारचा विचार आहे. गट-क ची 75 पदे रिक्त आहेत. ही पदे सुध्दा आम्हाला भरावयाची आहेत. यातील 40 पदांचा विषय महत्त्वाचा आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, भरती प्रक्रिया राबविण्यापूर्वी जाहिरात वगैरे सर्व प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. त्यामुळे नियमानुसार ही पदे भरण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी या विषयाचा पूर्णपणे अभ्यास केल्याचे दिसत नाही. 2002 पासून ही पदे रिक्त आहेत. 2002 ते 2014 या कालावधी मुद्रण





श्री.जयंत प्र.पाटील....

व्यवसायामध्ये जमीन-अस्मानाचा फरक झालेला आहे. जी यंत्रसामुग्री आपण आणू पाहत आहात त्या यंत्रसामुग्रीची आजच्या घडीला गरज नाही. उदाहरणार्थ प्लेट मेकींगला आता वेगळी भूमिका आलेली आहे. कारण आता कॉम्प्युटरवर ताबडतोब प्लेट मेकींग होत आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

त्यावेळी 8 लोक आणायचे. माझा स्वतःचा तो व्यवसाय आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांचा देखील पूर्वीपासून हा व्यवसाय आहे. अर्थसंकल्पात या संदर्भात आर्थिक तरतूद करणार नाही. माझ्या माहितीप्रमाणे हे मुद्रणालय आपल्या विधान भवनच्या परिसरातील एका इमारतीत आहे. आपण हे मुद्रणालय शहराच्या बाहेर नेऊन, स्वतः इमारत बांधावी आणि त्यासाठी पैसे उपलब्ध करावेत. आपण हे बीओटी तत्वावर करूनका. शासनाने स्वतः इमारत बांधून अत्याधुनिक मुद्रणालय करावे. शासन तत्संदर्भात धोरणात्मक निर्णय घेईल का, तसेच, लागणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पुनर्विचार करून, कर्मचाऱ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, वय पाहून कामगारांचे नवीन पॅटर्न तयार करून, अत्याधुनिक मशिनरीच्या आधारे मुद्रणालय करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेणार का ?

श्री. प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, होय.

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## <u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>

**पृ.शी./मु.शी.** : रिक्षाचालकांना परमिट देण्यासाठी शासनाने घातलेल्या आठवीपर्यंतच्या शिक्षणाच्या अटीमुळे कल्याण-डोंबिवलीतील 5 हजार रिक्षाचालकांवर उपासमारीची वेळ येण्याची स्थिती निर्माण झाली असणे याबाबत श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"रिक्षाचालकांना परमिट देण्यासाठी शासनाने घातलेल्या आठवीपर्यंतच्या शिक्षणाच्या अटीमुळे फक्त कल्याण-डोंबिवलीतील 5 हजार रिक्षाचालकांवर गंडातर येणार असल्याचे उघडकीस आले असून शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील अनेक सर्वसामान्य रिक्षाचालकांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येण्याची परिस्थिती निर्माण झालेली असून या रिक्षाचालकांवर कुटुंबांचा उदरनिर्वाह व मुलांच्या शिक्षणाची असलेली जबाबदारी लक्षात घेऊन पूर्वीपासून ज्या रिक्षाचालकांना परमिट दिलेली आहेत त्यांना वगळून नवीन रिक्षाचालकांना हा नियम लागू करावा अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहराचा शैक्षणिक मागासलेपणा दूर होण्यासाठी तंत्र शिक्षणाची सोय व्हावी आणि मुस्लीम समाजाला न्याय मिळावा म्हणून भिवंडी येथे तंत्र महाविद्यालय सुरू करणे याबाबत श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"ठाणे जिल्ह्यात अनेक महानगरपालिकांची स्थापना झाली आहे. त्यामध्ये भिवंडी-निजामपूर ही एक महानगरपालिका आहे. या मनपा क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात मुस्लीम अल्पसंख्याक समाज राहतो. विशेषतः तो मुस्लीम अल्पसंख्याक समाज भिवंडी शहरात राहतो. शिक्षणाच्या बाबतीत विशेषतः उच्च व तंत्र शिक्षणापासून हा समाज वंचित राहिला आहे. शासनाने अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी विविध योजना जाहीर केल्या आहेत. अल्पसंख्याक समाजासाठी उच्च व तंत्र शिक्षणाची सोय व्हावी म्हणून राज्य शासनाने घोषणा केली आहे की, अल्पसंख्याक समाजासाठी 4 नवीन तंत्र महाविद्यालये सुरू करण्यात येत आहेत. भिवंडी शहराचा शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्यासाठी, अल्पसंख्याक समाजातील गरीब विद्यार्थ्यांसाठी तंत्र शिक्षणाची सोय होण्यासाठी आणि मुस्लीम समाजाला न्याय मिळण्यासाठी भिवंडी येथे तंत्र महाविद्यालय सुरू करण्याबाबत शासनाने अनुमती द्यावी, शासनाकडून या संदर्भात विचार व्हावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : शासनाच्या दिरंगाईमुळे प्रियदर्शनी टॅक्सी सेवेच्या अंतर्गत 100 टॅक्सींचे परवाने रखडणे याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"प्रवासादरम्यान महिलांवरील वाढत्या अत्याचारांची संख्या लक्षात घेता महिला चालक असलेली प्रियदर्शनी टॅक्सी सेवा सुरू करण्यात आली. सुरूवातीच्या काळात 25 टॅक्सी रस्त्यांवर उतरल्यानंतर वाढती मागणी लक्षात घेऊन दोन वर्षांपूर्वी आणखी 100 टॅक्सींची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. मात्र शासनाच्या दिरंगाईमुळे 100 टॅक्सींचे परवाने रखडले आहेत. महिला चालकांची टॅक्सी सेवा उत्तम असल्याने यामुळे महिलांना रोजगार सुध्दा उपलब्ध होणार आहे. नाईट लाईफ सारख्या प्रस्तावांना शासनाकडून हिरवा कंदील मिळत असताना महिला सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलण्यास शासन दिरंगाई करीत असल्याने जनमाणसात तीव्र असंतोष निर्माण होत आहे. शासनाने महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे. महिला चालकांची टॅक्सी सेवा उत्तम असल्याने शिवाय यामुळे महिलांना रोजगार देखील उपलब्ध होऊ शकत असल्याने राज्य शासनाने दिनांक 08.03.2015 रोजी झालेल्या महिला दिनाचे निमित्त साधून प्रियदर्शनी टॅक्सी वाहतुकीबाबत आपली भूमिका स्पष्ट करून तत्संदर्भात कार्यवाही करून शासनाने लवकर निर्णय घ्यावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : वाडा तालुका (जि.पालघर) येथील शिरीषपाडा-कोने या गावादरम्यान मंजूर झालेले क्रीडा संकुल उभारणे याबाबत ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"वाडा तालुक्यातील (जि. पालघर) खेळाडुंच्या गुणांना वाव मिळावा, त्यांना राष्ट्रीय व आतंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी मिळावी, यासाठी शिरीषपाडा-कोने या गावादरम्यान क्रीडा संकुल उभारण्यासाठी शासनाने 16 एकर जागा उपलब्ध करून देऊन त्यास दोन वर्षांपूर्वी मंजुरी देखील देण्यात येणे तथापि अद्यापपावेतो त्या ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्यात आलेले नाही. प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकुल उभारण्याचे शासनाचे धोरण असतानाही सदरचे क्रीडा संकुल उभारण्यात न येणे, त्यामुळे या विरोधात दिनांक 16 मार्च, 2015 रोजी वाडा तालुक्यातील विद्यार्थी, युवक व खेळाडू यांनी तहसील कार्यालयासमोर खेळांचे आयोजन करून अनोखे आदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणे, परिणामी, वाडा या आदिवासी तालुक्यातील खेळाडुंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी प्राप्त व्हावी, याकरिता वाडा तालुका (जि. पालघर) येथील शिरीषपाडा-कोने या गावादरम्यान मंजूर झालेले क्रीडा संकुल तातडीने उभारण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, एवढीच मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : मनोरा व मंगरूळपीर तालुक्यात (जि.वाशिम) जलसंधारणामार्फत केलेल्या कामांमध्ये झालेल्या गैरकारभारबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मौजे कोलार, ता. मानोरा, जि. वाशिम येथे कोल्हापुरी बंधारा बांधण्यात आल्याची नोंद दप्तरी असणे, परंतु प्रत्यक्षात कोलार शिवरात कोठेही बंधारा बांधण्यात आल्याचे दिसून येत नाही.

मौजे अंबापूर, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथे तलावाचे बोगस काम केल्याने काही अवधितच हा तलाव फुटला. त्या फुटलेल्या तलावाच्या दुरूस्तीचे काम करताना कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याची परवानगी न घेता काम केले. तलावाचे दुरूस्त केलेले काम पुन्हा फुटल्याने एका इसमाला मृत्यूला सामोरे जावे लागले. मौजे गिरोली, ता. मानोरा, जि. वाशिम व मौजे आसेगाव, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथे जलसंधारण योजनेंतर्गत बांधलेल्या तलावामधून आजपर्यंत कोणत्याही प्रकारचे सिंचन न होता लाखो रूपये खर्च करण्यात आलेले आहेत.

ही कामे ज्यांच्या अधिपत्याखाली झाले, ते उप अभियंता श्री. एस.आर.पाठक हे गेली 19 वर्षे वाशिम जिल्ह्यातच कार्यरत आहे. त्यामुळे त्यांच्याकडून अनेक बोगस कामे होऊनही, त्याबाबत तक्रारी होऊनही त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.

त्यामुळे श्री. एस.आर.पाठक यांनी विशेषतः मानोरा व मंगरूळपीर तालुक्यांत जलसंधारणामार्फत केलेल्या कामांची चौकशी करून त्यामध्ये झालेल्या गैरकारभाराबद्दल व त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबद्दल त्यांच्याविरूध्द कारवाई होण्यासाठी शासनाचे लक्ष वेधावे म्हणून मी हा विशेष उल्लेख मांडत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : पुण्यासह राज्यातील शैक्षणिक काम करणाऱ्या महिलांवर होणाऱ्या अत्याचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्याकरिता "विशाखा समित्या" स्थापन करण्यात आल्या असून त्यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"पुणे शहर हे शिक्षणाचे माहेरघर व केंद्र मानले जाते. पुणे शहरात मोठ्या प्रमाणात शिक्षण संस्था आहेत. येथे देश-विदेशातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असतात. सन 2013 मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनी तसेच कामाच्या ठिकाणी असलेल्या महिला कमर्चारी यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने, पुण्यासह राज्यातील शैक्षणिक काम करणाऱ्या महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या तकारींचे निराकरण करण्याकरिता विशाखा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. परंतु त्या समित्यांकडून फक्त कागदोपत्री असून संस्थाचालक, प्राचार्य, विविध संघटना, विविध हित संबंधित गट यांच्या दबावामुळे तक्रारच नोंदवून घेतली जात नाही. दैनिक लोकसत्ता व पुण्यातील अनेक वृत्तपत्रांनी याबद्दल पाहणी केलेली आहे आणि त्यात असे दिसून आले आहे की, तक्रार नोंदवायला गेलेल्या महिलेलाच बदनामीची धमकी दिली जाते. काही ठिकाणी समितीचे सदस्य पुरूष आहेत. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील महिला शिक्षिका आणि कर्मचाऱ्यांच्या तक्रारी घेण्यासाठी कुठलीही यंत्रणा कार्यरत नाही. यंत्रणेवर देखरेख ठेवण्यासाठी लोकल कम्प्लेंट कमिटी राज्य शासनाने केली पाहिजे होती. परंतु ती केलेली नाही. अनेक महाविद्यालयांमध्ये अद्यापही महिलांसाठी हक्काची जागा नसणे, कामाच्या ठिकाणी महिलांना होणाऱ्या त्रासाबाबत प्रत्येक शैक्षणिक संस्थेमध्ये विशाखा समिती असावी असा नियम आहे. परंतु विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमध्ये अद्यापही विशाखा समित्या स्थापन करण्यात आलेल्या नाहीत. विशाखा समित्या ज्या ठिकाणी स्थापन करण्यात आल्या आहेत, त्या फक्त कागदोपत्री आहेत. दरवर्षी महिलांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ...

सुरक्षेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात तरतूद होते. परंतु घडणाऱ्या गोष्टींची तक्रार करण्यासाठी महिलांना हक्काची जागा अजुनही महाविद्यालयात नाही. महिलांच्या सुरक्षिततेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद केली असली तरी सुध्दा कोथरूड, हडपसर, जेजूरी व आंबेगाव या पुण्यातील तसेच नगर, नाशिक, नगापूर, औरंगाबाद या ठिकाणच्या महाविद्यालयातील देखील अशा पध्दतीच्या समित्या नाहीत. तेथील महिलांनी आपले म्हणणे मांडले आहे. महाविद्यालयात काही वेळा सहकाऱ्यांकडून वाईट अनुभव येत असल्याचे अनेक महिला शिक्षिकांनी सांगितले. पुणे शहरातील सरस्वती मंदिर शाळेमध्ये सुध्दा महिला कर्मचाऱ्यांना असाच अनुभव आलेला आहे उलटपक्षी त्या महिलांना बळी दिले जात आहे. त्यामुळे मी या विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधत आहे की, प्रत्यके महाविद्यालयांमध्ये तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष महिलांना नेमावे. लोकल कम्प्लेंट कमिटी नेमून सर्व कार्यवाहीसाठीची विशेष मोहिम उच्च व तंत्र शिक्षण विभागाने हाती घ्यावी. संतापजनक बाब अशी आहे की, अनेक महाविद्यालयामध्ये तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष हे पुरूषच आहेत. शासनाने यामध्ये गांभीर्याने लक्ष घालून विशाखा समित्याच्या स्थापनेबाबत व त्यांच्या अंमलबजावणीबाबत कार्यवाही करावी आणि या संदर्भात तत्काळ निवेदन करावे अशी मी विनंती करते."

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : बोरीवली येथील भगवती रुग्णालयातील शवविच्छेदन केंद्रावर असलेला कामाचा ताण याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबई महानगराच्या पश्चिम उपनगरात मृतदेहांच्या उत्तरीय तपासणीसाठी बोरीवली येथील भगवती आणि जुहूतील कुपर या रुग्णालयातील शवविच्छेदन केंद्र कार्यरत आहेत. परंतु, सध्या कुपरमधील केंद्राचे नुतनीकरण सुरु असल्याने तेथील मृतदेहही बोरीवली केंद्रात आणले जात असल्याने शवविच्छेदनास विलंब लागत आहे.

बोरीवली केंद्राची दिवसाचा 10 मृतदेहांची क्षमता असताना कुपर रुग्णालयातील पाच ते सहा मृतदेह दररोज उत्तरीय तपासणीसाठी पाठविले जात असल्याने तेथील ताण वाढत चालला आहे. या केंद्रात तीन डॉक्टर्स सकाळी 10.00 वाजेपासून रात्री 8.00 वाजेपर्यंत दिवसाला 10 मृतदेहांची उत्तरीय तपासणी करीत आहेत.

उत्तरीय तपासणी व्यतिरिक्त पोलीस प्रक्रिया, जाबजबाब व इतर कामे यामुळे शवविच्छेदनास विलंब लागत आहे. परिणामतः मृतांच्या नातेवाईकांना मृतदेह ताब्यात घेण्यासाठी ताटकळत बसावे लागते, अशी नातेवाईकांच्या दु:खावर डागण्या देणारी परिस्थिती निर्माण झाली आहे.

या संदर्भात मुंबई पालिका आरोग्य खात्याचे वरिष्ठ अधिकारी या समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत असल्याची जनतेची तक्रार आहे. या महत्त्वाच्या नागरी समस्येकडे लक्ष देण्याची नितांत गरज असून ती सोडविण्यासाठी शासनाने विनाविलंब प्रयत्न करावेत, अशी विनंती आहे.

---------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत करावयाच्या विविध उपाययोजना याबाबत श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग-शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील तरतुदीनुसार बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. पण या शिक्षणाच्या अधिकारापासून मोठ्या प्रमाणात अपंग मुले वंचित असल्याची बाब मी नागपूर हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न क्रमांक 702 व्दारे निदर्शनास आणून दिली होती.

सदर 2014-2015 च्या व U-DISE मधील आकडेवारीनुसार सध्या महाराष्ट्रात अपंग विद्यार्थ्यांची संख्या अपंगत्त्व प्रकारानुसार अल्पदृष्टी 69,638, अंध 10,236, कर्णबधीर 34,279, वाचादोष 30,174, अस्थिव्यंग 40,092, मतीमंद 52,864, बहुविकलांग 11,577, मेंदूचा पक्षाघात 3005, अध्ययनअक्षम 38,817, स्वमग्न 2601, अशी एकूण संख्या सुमारे 2,93,283 एवढ्या मोठ्या प्रमाणात आहे. यात पहिली 30,487, दुसरी 36,259, तिसरी 41,766, चौथी 44,747, पाचवी 41,421, सहावी 37,234, सातवी 36,291, आठवी 26,874 विद्यार्थी राज्यभर शिकत आहेत.

यातील काही प्रमाणात अपंग विद्यार्थी समाज कल्याण अंतर्गत चालणाऱ्या विशेष शाळेत दाखल आहेत. पण यातील बहुतांशी विद्यार्थी सामान्य शाळांमध्ये दाखल आहेत आणि तेथे त्यांना सामान्य मुलांसोबत सामान्य शिक्षकांकडून अनाकलनीय अध्यापनाला (अपंग मुलांच्या दृष्टीने) सामोरे जावे लागते. अपंग मुलांच्या शिक्षणाचा देखावा म्हणून जिल्हा परिषद व महानगरपालिका अंतर्गत कंत्राटी पध्दतीने फिरते विशेष शिक्षकांची भरती करण्यात आली आहे. फिरते विशेष शिक्षक अपंग विद्यार्थी दाखल असलेल्या शाळेला आठवड्यातून एकदाच दोन तास अध्यापन करण्यासाठी भेट देत असतात, त्यांना अध्यापनाव्यतिरिक्त कार्यालयीन कामे सोपवली जातात. त्यामुळे त्या काळात अपंग

...3....

श्री.कपिल पाटील..........

विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात, तसेच त्यांची संख्या मात्र 1947 एवढ्या कमी प्रमाणात आहे. शिक्षक-विद्यार्थी प्रमाणानुसार हे समीकरण जुळत नाही. परंतु, शासनाकडून या प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही झालेली दिसत नाही.

अपंग विद्यार्थ्यांच्या पालकांनी अपंग विद्यार्थ्यांना रोज व नियमित विशेष शिक्षक मिळावे, अपंग विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी अपंग शिक्षणातील पदवी असलेल्या शिक्षकांची नियुक्ती करावी, अपंग विद्यार्थी दाखल शाळांमध्ये अपंग शिक्षणाची पदवी असलेल्या शिक्षकांची नियुक्ती करावी, कर्णबधीर विद्यार्थ्यांना मातृभाषेतून (खुणांच्या भाषेतून) शिक्षणाची व्यवस्था करावी, अपंग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अनुकुलीत अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करण्यात यावा व अपंग मुलांच्या विशेष शिक्षणाचा स्वतंत्र विभाग निर्माण करावा, या मागण्यांसाठी महाराष्ट्रात आंदोलन सुरु ठेवले आहे. याबाबत सरकारने योग्य ती दखल तातडीने घ्यावी, ही विनंती.

-------------

**उप सभापती :** सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी 2.13 ते 3.00 वाजेपर्यंत मध्यंतर)

--------------

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री महोदय उपस्थित नाहीत, त्यामुळे कामकाज घेण्यात येऊ नये. सभागृहाची बैठक स्थगित करावी अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी आता स्थगित करतो व 3 वाजून 10 मिनिटांनी सभागृहाची बैठक पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.01 मिनिटांनी 3.10 पर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, आज अशासकीय कामकाजाचा दिवस आहे. आज कामकाज पत्रिकेवर शासकीय विधेयके आणि अशासकीय कामकाज दाखविण्यात आलेले आहे. आज शासकीय कामकाज होणार आहे काय ? सन्माननीय सदस्यांना शासकीय विधेयकांवर बोलावयाचे आहे. त्यामुळे आता कोणते कामकाज होणार आहे हे आपण सांगितले तर बरे होईल.

**तालिका सभापती** : आता अशासकीय कामकाजच होईल.

-------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अशासकीय कामकाज -विधेयके**

**पृ.शी.** : दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. I OF 2015.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS ACT, 1948.)

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 1- महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 15 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. II OF 2015.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PROJECT AFFECTED PERSONS REHABILITATION ACT, 1999.)

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 2- महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 2 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

..4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अशासकीय कामकाज-ठराव**

**पृ.शी.**: मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेले अहमदनगर-बीड-परळी, सोलापूर-बीड-जळगाव रेल्वे मार्गाचे काम सत्वर हाती घेणे

**मु.शी.**: मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेले अहमदनगर-बीड-परळी, सोलापूर-बीड-जळगाव रेल्वे मार्गाचे काम सत्वर हाती घेणे या विषयावरील श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचा ठराव.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेले अहमदनगर-बीड-परळी, सोलापूर-बीड-जळगाव या नवीन रेल्वे मार्गाचे काम सत्वर हाती घेण्यासाठी कोकण रेल्वे महामंडळाच्या धर्तीवर एक स्वायत्त रेल्वे महामंडळ स्थापन करुन हे रेल्वे मार्ग विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, आज बुलेट ट्रेनचा जमाना आहे. सन 1995-96 मध्ये मंजूर झालेला मराठवाड्यातील अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापपावेतो पूर्णत्वाकडे गेलेला नाही. एकीकडे आम्ही वर्तमानपत्रात बातम्या वाचतो, टी.व्ही. चॅनलवर बघतो की, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सुरु करण्याचा केंद्र शासनाचा प्रस्ताव आहे. आम्ही काल पर्यंत ऐकत आलो की, आपण नागपूर शहरात मेट्रो सुरु करीत आहोत. पुणे शहरातील मेट्रो बाबत वर्तमानपत्रात बातम्या छापून येतात. आम्हाला नागपूर शहरातील मेट्रो बाबत चर्चा ऐकावयास मिळते. बीड जिल्ह्यातील रेल्वे मार्गाचा प्रस्ताव सन 1995-96 मध्ये मंजूर झालेला आहे. परंतु, दुर्दैवाने या रेल्वे मार्गासाठी अत्यंत तुटपुंजी तरतूद केल्यामुळे अद्यापपावतो हा रेल्वे मार्ग पूर्णत्वाकडे गेलेला नाही.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील विकासासाठी रेल्वे मार्ग आवश्यक आहे. बीड जिल्ह्यात मायग्रेशनचे प्रमाण 61 टक्क्यापेक्षा जास्त आहे आणि दिवसेंदिवस हे प्रमाण वाढत आहे. मग बीड

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित..........

जिल्ह्यात रेल्वे किती महत्वाची आहे, हे आपल्याला नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. शनीचे राक्षस भवन, धामणगांव येथील गणपती अशी अनेक तीर्थक्षेत्रे मराठवाड्यात आहेत. पर्यटन, व्यापार, उद्योगाच्या दृष्टीकोनातून मराठवाड्यातील अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम पूर्ण होणे अतिशय गरजेचे आहे. परंतु या रेल्वे मार्गाकडे पाहिजे तेवढ्या गांभीर्याने बघितले जात नाही, हे मराठवाड्यातील लोकांचे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, सन 1995-96 मध्ये या रेल्वे मार्गाची मूळ किंमत 335 कोटी रुपये होती आणि आज 20 वर्षानंतर म्हणजे सन 2015 मध्ये या रेल्वे मार्गाची किंमत 3200 कोटी रुपयांपर्यंत गेलेली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात या रेल्वे मार्गासाठी 144 कोटी रुपयांची अल्पशी तरतूद करण्यात आलेली आहे. या रेल्वे मार्गासाठी 300 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली, अशा बातम्या वर्तमानपत्रात छापून आल्या होत्या. परंतु, आम्हाला नंतर असे कळले की, उर्वरित 144 कोटी रुपये मॅचिंग ग्रँट म्हणून राज्य सरकारने द्यावयाचे आहेत. ते 144 कोटी रुपये मिळाले तर या रेल्वे मार्गासाठी एकूण 300 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होईल. परंतु, राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये रेल्वेसाठी करण्यात आलेली एकूण तरतूद साधारणतः 67 कोटी रुपये आहे. अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गासाठी आवश्यक असलेली 144 कोटी रुपयांची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पात होऊ शकली नाही. म्हणून आज हा 3200 कोटी रुपयांचा प्रस्ताव उद्या जर 6400 कोटी रुपयांवर गेला तर नवल वाटण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, राज्यात आघाडी सरकार सत्तेवर असताना राज्य शासनाने सन 2014 मध्ये या रेल्वे मार्गासाठी 178 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आणि मॅचिंग ग्रँटही मिळाली. आज जमिनीच्या किंमती वाढत आहेत. या रेल्वे मार्गासाठी जमीन संपादित करीत असताना यदाकदाचित एवढा निधी उपलब्ध झाला नाही तर नजीकच्या 50 वर्षाच्या काळात हा रेल्वे मार्ग पूर्ण होईल, असे मला वाटत नाही.

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाप्रमाणेच सोलापूर-बीड-जळगाव रेल्वे मार्ग मराठवाड्याच्या विकासात भर घालणारा आहे. परंतु, हा रेल्वे मार्ग केवळ चर्चेतच आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ असणारे अजिंठा लेणी, तुळजापूर येथील जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र श्री तुळजाभवानी, राजूर येथील गणपती, पैठण येथील नाथ यासह पर्यटन, तीर्थक्षेत्र, व्यापार आणि उद्योगांच्या दृष्टीकोनातून हा रेल्वे पूर्ण होणे अतिशय महत्वाचे आहे. परंतु दुर्दैवाने हा रेल्वे मार्ग केवळ कागदावरच राहिलेला आहे. सोलापूर, जालना, जळगाव या राज्यातील सर्वात मोठ्या व्यापारपेठा आहेत. सोलापूर पासून या भागाला जोडणाऱ्या रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण होऊन आज त्याचा एकूण प्रकल्प अहवाल 3200 कोटी रुपये इतका आहे. परंतु, दुर्दैवाने निवडणुका जवळ आल्यानंतर या संदर्भात फक्त चर्चा होते. राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यामध्ये त्याचा उल्लेख केला जातो. परंतु, निवडणुका संपल्यानंतर त्याकडे लक्ष दिले जात नाही. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आमच्या भागात रोजगाराचा, साधन सामुग्रीचा अभाव आहे. आमच्या भागात इन्फ्रास्ट्रक्चर इतके कमी आहे की, उद्योगधंदे देखील होऊ शकत नाहीत. आम्हाला साधी शेती करण्यासाठी देखील पाणी उपलब्ध नाही.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.....

आम्ही सभागृहात भूमिका मांडल्यानंतर असे सांगण्यात येते की, शेतीचे पाणी नंतर पाहू, सध्या पिण्याच्या पाण्याकडे बघा. दुष्काळी भागाच्या संदर्भात यदाकदाचित इन्फ्रास्ट्रक्चर अपग्रेड करण्याच्या हेतूने या दोन रेल्वे मार्गांना न्याय देण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला तर मला वाटते मराठवाड्याला निश्चितपणे न्याय मिळाल्यासारखे होईल.

सभापती महोदय, या रेल्वे मार्गामुळे उत्तर, मध्य आणि दक्षिण भारताला जोडणा-या अतिशय महत्वाच्या बीड शहराच्या ठिकाणी कुठेही जंक्शन होऊ शकेल. शेवटी राजकीय इच्छाशक्ती लागते. मराठवाड्याने तुमच्या पदरात भरभरुन दान टाकले. लोकसभेच्या केवळ 2 जागा वगळता उर्वरित सर्व जागांसाठी मराठवाडा तुमच्या मागे उभा राहिला. तीच परिस्थिती विधानसभेच्या निवडणुकांमध्ये दिसून आली. मराठवाड्याकडे पाहण्याच्या दृष्टीने कदाचित नेतृत्व कमी पडते की काय याचे नेमके कारण आम्हाला कळून येत नाही. मराठवाड्याच्या या रेल्वे मार्गाच्या संदर्भात केवळ प्रबळ राजकीय इच्छाशक्ती असल्याशिवाय हे रेल्वेमार्ग पूर्णत्वाला जाणार नाहीत. मराठवाड्यातील हे रेल्वे मार्ग पूर्ण करण्यासाठी ज्याप्रमाणे कोकण रेल्वे उभारण्याकरिता स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात आले, त्याच धर्तीवर स्वतंत्र रेल्वे महामंडळ स्थापन करुन या रेल्वेमार्गाला न्याय देण्याच्या हेतूने राज्य सरकारने केंद्र सरकारला शिफारस करावी अशी मी या ठरावाद्वारे प्रमुख मागणी करतो.

सभापती महोदय, माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते हे मराठवाड्याबद्दल आस्था असणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. जेव्हा जेव्हा मराठवाड्याच्या संदर्भात आम्ही सभागृहात भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला तेव्हा माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी स्पष्टपणे व परखडपणे मराठवाड्याच्या संदर्भातील त्यांची भूमिका या ठिकाणी मांडली. आता ते सत्ताधारी पक्षात आहेत. बाके बदलली आहेत. म्हणून मराठवाडा तुमच्याकडे त्याच आस्थेने पहात आहे. बाके बदलल्यामुळे निर्णय प्रक्रियेचे तुम्ही प्रमुख आहात. नांदेड जिल्हयाचे पालकमंत्री आहात. मराठवाडयातील परभणी, नांदेड, औरंगाबाद येथे तुम्ही काम केलेले आहे. या मराठवाड्याला न्याय देण्याच्या संदर्भातील तुमची भूमिका काय आहे याकडे मराठवाडा डोळे लावून बसला आहे. मराठवाड्याच्या मातीशी ज्यांची नाळ जुळली आहे त्यांनी अचानकपणे उठून सांगितले की, या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

27-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W.2

SGB/ AKN/ KTG/ 15:20

श्री.अमरसिंह पंडित.....

ठरावावरील चर्चेला मी उत्तर देणार आहे. त्यामुळे त्यांच्याकडून या प्रश्नाला न्याय मिळावा अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली तर तो अतिशयोक्तीचा भाग ठरणार नाही. या विषयाकडे गांभीर्याने पहावे आणि याबाबतचा निर्णय करावा अशी मी विनंती करतो.

ठराव प्रस्तुत झाला.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी जी तळमळ व्यक्त केली त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते या ठरावावरील चर्चेला उत्तर देणार आहेत. विरोधी पक्षात असताना ते मराठवाडा व विदर्भाचे प्रश्न सभागृहात हिरीरीने मांडत असत. सरकारच्या बाजूने काय केले पाहिजे याबाबत अत्यंत चांगले मार्गदर्शन आम्ही त्यांच्याकडून ऐकले आहे. या प्रश्नावर त्यांच्यामार्फत निश्चितपणे मार्ग निघेल अशी आम्हाला अपेक्षा आहे. मराठवाड्याच्या रेल्वे मार्गाबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जो अशासकीय ठराव मांडला आहे त्याचे दोन भाग आहेत. अहमदनगर-बीड-परळी आणि सोलापूर-बीड-जळगाव या दोन रेल्वे मार्गाबरोबरच मी अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळेस म्हणालो होतो की, भारतीय जनता पक्षाने त्यांच्या जाहिरनाम्यामध्ये मुंबई-जळगाव-बीड-सोलापूर-रत्नागिरी-पुणे एक्स्प्रेस अशा प्रकारच्या सर्कलने पूर्ण करायचे म्हटले आहे. तो प्रश्न या निमित्ताने मार्गी लावावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बीड असा जिल्हा आहे ज्या जिल्हयाची हद्द पुणे आणि अहमदनगर जिल्हयाला जोडली जाते. बीड जिल्हा फार विस्तारला गेला आहे. बीडहून पुण्याला, औरंगाबादला, नागपूरला जाण्याकरिता फारसा चांगला मार्ग उपलब्ध नाही. पुण्यावरुन नगरला, औरंगाबादला अतिशय चांगल्या पध्दतीने प्रवास करता येतो. औरंगाबाद-जालना सुध्दा चांगल्या प्रकारे प्रवास करता येतो. म्हणून माझी विनंती आहे की, कोकण रेल्वेच्या धर्तीवर मराठवाड्यातील या रेल्वेमार्गासाठी स्वतंत्र रेल्वे विकास मंडळ स्थापन करुन राज्य शासनाला आर्थिक हिस्सा द्यावा लागणार असेल तर तो जरूर देण्यात यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, बीड, लातूर, उस्मानाबाद आणि नांदेड या भागाचा देखील विचार केला पाहिजे. स्व.विलासराव देशमुख राज्याचे मुख्यमंत्री असताना कुर्डूवाडी ते लातूर ही ब्रॉडगेज रेल्वे लाईन टाकण्यात आली. त्यामुळे फार मोठी सुविधा निर्माण झाली. आज मुंबई पुण्याहून लातूरला जाण्यासाठी चांगल्याप्रकारचा मार्ग उपलब्ध आहे. परंतु लातूरहून पुढे नांदेडला जायचे झाले तर परळीला येऊन पूर्णाकडे जायचे व तिथून नांदेड गाठावे लागते. एक प्रकारचा द्राविडी प्राणायाम करावा लागतो. लातूरच्या बाजूला एक 50 कि.मी.चा कर्व्ह आहे. तो जोडला गेला तर नांदेडला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

27-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W.4

SGB/ AKN/ KTG/ 15:20

श्री.शरद रणपिसे....

एक ते दीड तासात पोहोचू शकतो. आज जो सहा तास वेळ लागतो तो वेळ वाचू शकेल. या 50 कि.मी.च्या कर्व्हमध्ये रेल्वे लाईन टाकावी. आज पुण्याहून शताब्दी एक्स्प्रेसने सकाळी निघाल्यास दुपारी 2.00 वाजता हैद्राबादला पोहोचता येते. तेथून दुपारी निघाल्यास रात्री 11.00 वाजता पुण्याला पोहोचता येते. मराठवाड्यातील लोकांना पुण्याला येण्यासाठी पुणे-नांदेड जनशताब्दी सुरु करता येऊ शकते. श्रीमंताकरिता सोय करावी असे माझे म्हणणे नाही. सर्वसामान्यांसाठी सुध्दा जनशताब्दी सुरु करु शकता. लातूर रोड ते नांदेड या मार्गावर 50 कि.मी.चा कर्व्ह आहे त्याकरिता सुध्दा रेल्वे लाईन टाकण्याची रेल्वे बोर्डाला शिफारस करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, जायकवाडीचे उदाहरण आपण लक्षात घ्या. स्व.शंकरराव चव्हाण यांनी जायकवाडी प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला तेव्हा सर्वांनी विरोध केला. सपाट जागेवर धरण होऊ शकत नाही असे सांगितले गेले. परंतु धरण बांधले गेले आणि प्रश्न मिटला. या रेल्वे मार्गामुळे तेथे व्यापार उदीम वाढेल. लोकांची दळणवळणाची सोय होईल आणि मागास भाग म्हणून बीड जिल्हयाकडे दुर्लक्ष केले जाते तो बीड जिल्हा उस्मानाबाद, लातूर या परिसराला जोडला गेल्यामुळे चांगल्या प्रकारे विकास होईल असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. या अशासकीय ठरावाला मी माझा पाठिंबा देऊन माझे दोन शब्द संपवितो.

---------

नंतर एक्स.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एका ठरावाला 25 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. त्यामुळे वेळेचे बंधन लक्षात घेऊन मी 2-3 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त करण्यासाठी जरूर संधी देईन.

श्री.हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित हे नेहमीच मराठवाड्याच्या प्रश्नांबद्दल आग्रही असतात. त्यांनी सन्माननीय मंत्री श्री.दिवाकरजी रावते हे विरोधी पक्षात असताना मराठवाड्याच्या सर्वच प्रश्नांसाठी नेहमी आग्रही असायचे असा उल्लेख केलेला आहे. आता तर श्री.रावते साहेबांकडे परिवहन खाते आले आहे. आमचा सर्वांचा सुरूवातीला असा गैरसमज होता की, परिवहन विभागाचा फक्त एस.टी.शी संबंध येतो. एस.टी.च्या व्यतिरिक्त या विभागाचा स्कोप किती आहे हा आपण या विभागाचे मंत्री झाल्यामुळे महाराष्ट्रापुढे येणार आहे. एखाद्या खात्याला कार्यक्षम मंत्री मिळाला की, तो त्या खात्याच्या कार्यपद्धतीमध्ये तो बदल करतो हे आपण गेल्या 15 वर्षात बघितले आहे. मागासलेपणा हा मराठवाड्याला कायमचा लाभला आहे. तो मागासलेपणा रेल्वेच्याबाबतीत देखील आहे. त्याकडे देखील दुर्लक्ष केले गेले आहे. 1995 पूर्वी 335 कोटी रूपयाचा रेल्व प्रकल्प आता 3200 कोटी रूपयांवर गेला आहे. हा नुसता आकडेवारीचा खेळ सुरु आहे. या प्रकल्पासंबंधातील प्रत्यक्ष कार्यवाही कुठेच सुरू होत नाही. पाण्याच्या प्रश्नावर मराठवाडा नेहमीच तहानलेला राहतो. या रेल्वे मार्गाचा आपल्याला मराठवाड्याला पाणी देण्यासाठी देखील उपयोग करता येईल. रेल्वे वाहतुकीच्या माध्यमातून आपल्याला पाण्याचे टँकर्स नेता येतील. याचा आपल्याला भविष्यात उपयोग्य देखील होऊ शकेल. देशातील कोणत्या राज्यात रेल्वेचे जाळे कमी आहे याचा संपूर्ण आढावा आपण घेतला पाहिजे. केवळ बुलेट ट्रेनच्या मागे न लागता मागासलेल्या भागाला न्याय कसा देता येईल याचा प्राधान्याने विचार केला पाहिजे. आज श्री.सुरेश प्रभुंसारखे वेगळे विचार करणारे रेल्वे मंत्री देशाला लाभले आहेत. मराठवाड्यातील समस्यांची संपूर्ण माहिती आपल्याकडे आहे. त्यामुळे मराठवाड्यातील रेल्वे मार्गांचा विचार करण्यासाठी विशेष विचार करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपल्या ठरावामध्ये जे दोन मार्ग प्रस्तावित केले आहेत ते अतिशय महत्त्वाचे असे आहेत. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

या रेल्वे मार्गामुळे सर्व भाग जोडला जाणार आहे. इन्फ्रास्ट्रक्चरमधील एक एलिमेंट आपण नीटपणे पूर्ण करू शकलो तर त्यातून उपलब्धी देखील निर्माण होईल. एखाद्या भागाचे आर्थिक चित्र बदलवून टाकण्याची क्षमता रेल्वे मार्गांमध्ये असते. रेल्वे मार्ग हा विकासाचा अतिशय महत्त्वपूर्ण असा घटक आहे. आता भविष्यामध्ये राज्य व केंद्र शासनाचा सहभागातून अशा प्रकारच्या योजना येणार आहेत. कोकण रेल्वे प्रमाणेच मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे विकास महामंडळ स्थापन करावे अशा प्रकारची सूचना करण्यात आली आहे, ती योग्य अशीच आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी व येणाऱ्या भविष्यकालीन समस्यांना तोंड देण्यासाठी मराठवाड्याकला रेल्वेची नितांत आवश्यकता आहे म्हणून या ठरावाला मी संपूर्णपणे पाठिंबा देतो. धन्यवाद.

.....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, आता सभागृहात अशासकीय कामकाज सुरू आहे. आजच्या कामकाजपत्रिकेत एकूण 6 अशासकीय ठराव दाखविण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी अशासकीय ठराव मांडला असून त्यावर विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. अशासकीय ठरावावर बोलताना वेळेचे बंधन हे असले पाहिजे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अशासकीय कामकाज करण्यासाठी आपल्याकडे भरपूर वेळ आहे. अशासकीय कामकाजाकरिता 2.50 तास राखून ठेवलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी पाहिला प्रस्ताव मांडलेला आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर एकूण 6 अशासकीय ठराव दाखविण्यात आलेले आहेत. उर्वरित सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. त्यामुळे आपण अशासकीय कामकाजाला पुरेसा वेळ द्यावा ही विनंती.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रूपनवर यांनी भाषणास सुरूवात करावी.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रूपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी एक चांगला अशासकीय ठराव मांडलेला आहे. सोलापूर-बीड-जळगाव या रेल्वे मार्गाचे सोलापूर रेल्वे डिव्हिजन कडून सर्व्हे देखील करण्यात आलेला आहे. त्यामुळे यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. हा मार्ग तातडीने सुरू केला पाहिजे असे रेल्वे मंत्रालयाचे देखील म्हणणे आहे. यावर परवा फार मोठी चर्चा देखील झालेली आहे. त्यामुळे या मार्गाची शिफारस करणे अत्यंत गरजेचे आहे. या मार्गाला सर्व बाबी अनुकूल आहेत. मराठवाड्याचे व बीड जिल्ह्याचे मागासलेपण केवळ वाहतुकीची सोय नसल्यामुळे आहे. या रेल्वे मार्गामुळे मराठवाड्याचा विकास होण्यास मदतच होणार आहे असे माझे मत आहे.

मी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना दुसरी सूचना करणार आहे. या ठरावाला जोडूनच मी एक महत्त्वाचा विषय मांडणार आहे. 1908 साली पंढरपूर ते लोणंद असा मार्ग सुरू करण्यासाठी जमीन संपादित करण्यात आली होती. 7/12 वर रेल्वे भारत सरकार असे नाव आहे. या मार्गावर एकही नदी किंवा डोंगर आडवा नाही. 18 साखर कारखाने त्या मार्गावर आहे. दक्षिण काशी, पंढरपूर हे कोल्हापूर येथून येणाऱ्या मार्गाला जोडले जाणार आहे. 100 वर्षाचा प्रकल्प झाला नाही म्हणून संसदेमध्ये चर्चा झाली होती. त्यासाठी दहा कोटी रूपयांची तरतूद बजेटमध्ये करण्यात आली. तो मार्ग आता फलटणपर्यंत आला. फलटण ते पंढरपूर 100 कि.मी.चे काम राहिलेले आहे. या मार्गाचे काम झाले तर फळभाजीपाला व साखरेची वाहतूक करता येईल. हा संपूर्ण बागायती भाग आहे. लोणंद ते पंढरपूर हा मार्ग माळशिरस, फलटण आणि पंढरपूर तालुक्यातून जातो. हा मार्ग फार महत्त्वाचा आहे. आळंदी ते पंढरपूर या मार्गाला हा मार्ग समांतर आहे. त्यामुळे वाहतुकीची सोय होणार आहे. या मार्गामुळे रोडवरील वाढलेली वाहतूक कमी होणार आहे. लोकांना स्वस्तात माल मिळणार आहे. साखरेच्या निर्यातीच्यादृष्टीने हा मार्ग फार सोयीचा आहे. या भागात डिझेल-पेट्रोल साठ्याचा एकही टँक नाही. सिमेंट उतरविण्यासाठी एकही डॉक नाही. 1908 साली इंग्रजांनी हा मार्ग अग्रक्रमाने करण्याचे ठरविले होते. दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर तो मार्ग करण्याचे राहून गेले. आता या मार्गासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. फलटण पर्यंत या मार्गाचे अर्धे काम झालेले आहे. आता फक्त 100 कि.मी.पर्यंतचे काम राहिलेले आहे. ते काम देखील यात समाविष्ट करावे व या मार्गाची अनुकूलता शासनाने दर्शवावी अशी विनंती करून मी थांबतो.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून त्यातल्या त्यात अत्यंत मागासलेल्या बीड जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने रेल्वे मार्गाची मागणी केली आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. मराठवाडा, विदर्भावर प्रेम कररणारे श्री.दिवाकर रावते यांच्या सारखे जिज्ञासू मंत्री परिवहन विभागाला लाभले आहेत. ते यासंबंधी सकारात्मक विचार करतील अशी मला आशा आहे.

सभापती महोदय, जेथे रस्ते आणि रेल्वे जातात तेथे विकास होतो. बीड संबंधी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपले दु:ख मांडले आहे. मी अनेकदा बीडला जातो. कधी पुणे-नगर मार्गे किंवा जामखेड वरून बीडला जातो. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे एस.टी.चे मंत्री नसून राज्यातील संपूर्ण परिवहनाचे सूत्रधार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी अहमदनगर-बीड-परळी, सोलापूर-बीड-जळगाव असा नवीन रेल्वे मार्ग सुरू करावा अशी विनंती केली आहे. जालना-बीड असा मार्ग केला तर मराठवाड्यातील विकासासाठी त्याचा निश्चितच उपयोग होईल. तेव्हा माननीय मंत्र्यांनी या मार्गासंबंधी देखील गांभीर्याने विचार करावा अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी अत्यंत चांगला ठराव मांडला असून त्या ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मराठवाडा, विदर्भ तसेच यवतमाळ या भागात रेल्वेचा विकास न झाल्यामुळेच या ठिकाणी मोठया प्रमाणात आत्महत्या होतात असे मला वाटते. त्यामुळे या भागात रेल्वेचा विकास होणे जरूरीचे आहे. नांदेड, वर्ध्यातील रेल्वे प्रोजेक्ट सुध्दा 50-50 पर्सेंट मधीलच आहे. त्यामुळे शासनाने या ठिकाणच्या रेल्वेमार्गासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी सूचवलेला प्रोजेक्ट हा स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या स्वप्न पुर्तीचा प्रोजेक्ट आहे. खरे म्हणजे आपण स्व.गोपीनाथ मुंडे यांच्यासाठी स्मारक उभे करणार आहोत परंतु त्याऐवजी बीड-परळी, सोलापूर-बीड-जळगाव हा रेल्वेमार्ग तयार केला गेला तर तो रेल्वेमार्ग स्व.गोपीनाथ मुंडे यांच्यासाठी खरे स्मारक ठरेल.

सभापती महोदय, मला आठवते की, मी त्यांच्या बरोबर बीड येथे उपोषणाला बसलो होतो त्यावेळेस स्व.गोपीनाथ मुंडे यांनी सांगितले होते की, बीड-परळी, सोलापूर-बीड-जळगाव रेल्वेमार्गाचे काम आपले सरकार आल्यावर आपण करु. त्यामुळे आता आपण बुलेट ट्रेन वगैरे सोडून द्या. मराठवाडयाचा विकास रेल्वेच्या मार्गाने करुन स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या नावाने खरे स्मारक उभारावे अशी या निमित्ताने विनंती करतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

-----

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी केलेल्या स्वतंत्र मराठवाडा मंडळाच्या मागणीच्या ठरावाला मी पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. रेल्वेच्या बाबतीत मराठवाडा आणि विदर्भ हे दोन विभाग अतिशय मागासलेले आहेत. विदर्भातून रेल्वेची सेंट्रल लाईन गेली आहे परंतु मराठवाडयात ते सुध्दा नाही. विदर्भातील बुलढाणा जिल्हा हा मराठवाडयाला लागून आहे. बुलढाण्यातील अर्ध्या तालुक्यांचा मराठवाडयांशी संबंध येतो. खामगाव-जालना रेल्वेमार्गाची मागणी गेल्या 70-80 वर्षापासूनची जुनी आहे. मी मागच्यावेळेला ज्यावेळेस लोकसभेत होतो त्यावेळेला केंद्रसरकारने असे सांगितले होते की, रेल्वेच्या संदर्भात राज्य शासनाने समभागाच्या संदर्भात सहमती दिली तर खामगाव-जालना रेल्वेमार्गाला आम्ही अग्रक्रम देऊ. खामगाव-जालना प्रकल्प मराठवाडा आणि विदर्भाला जोडणारा प्रकल्प आहे. खरे म्हणजे खामगाव-जालना-बीड-सोलापूर या मार्गाशी हा रेल्वे मार्ग जोडला जाऊ शकतो. या प्रकल्पामध्ये राज्य शासनाने 50 टक्के सहभाग दिला तर केंद्रसरकार हा मार्ग करण्यास अग्रक्रम देऊ शकेल. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना आम्ही भेटलो असताना त्यांनी असे सांगितले की, राज्य सरकारने यामध्ये आम्हाला जर 50 टक्के सहभाग दिला तर निश्चिपणे या रेल्वेमार्गाला आम्ही गती देण्याचा प्रयत्न करु. त्यामुळे माझी माननीय परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते यांनी विनंती आहे की, खामगाव-जालना मार्ग हा मराठवाडा आणि विदर्भाला जोडणारा मार्ग होऊ शकतो त्यामुळे या प्रकल्पामध्ये खामगाव-जालना या प्रकल्पाचा समावेश करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते (परिवहन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी अतिशय महत्वाचा ठराव मांडल्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. या सदनात मराठवाडयाच्या रेल्वेच्या संदर्भात क्वचित चर्चा झालेली आहे. आमचे विधान परिषदेचे एक माजी सन्माननीय सदस्य हे सभागृहात नेहमी पुणतांबा रेल्वेचा प्रश्न उपस्थित करीत असत. आता पुणतांबा रेल्वेमार्ग मार्गी लागला आहे. मी ज्यावेळेस रेल्वेच्या संदर्भात आढावा घेत होतो त्यावेळेस मला त्यांची आठवण झाली. आता या मार्गाचे 10 कि.मी.पर्यंतचे रुळ टाकण्याचे काम पूर्ण झाले असून 100 कि.मी. रेल्वे रुळ टाकण्याचे काम सुरु झालेले आहे.

सभापती महोदय, मी परिवहन मंत्री झाल्यानंतर माझ्याकडे केवळ एस.टी.महामंडळाचा कार्यभार आहे की, काय असे लोकांना वाटत होते. खरे म्हणजे हवाई विभाग आणि सागरी मार्ग सोडला तर परिवहन विभागाकडे सर्व कामे येतात. सागरी मार्गात बंदरे येत असल्यामुळे हा विभाग माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे गेलेला आहे. रेल्वे मार्गाच्या संदर्भात राज्याच्या काही मर्यादा आहेत. परंतु केंद्राला तशा प्रकारच्या मर्यादा नाहीत. रेल्वेचा विषय हा केंद्राच्या कक्षेतील असला तरी रेल्वे मार्गाचे रुंदीकरण, दुहेरीकरण या सर्व बाबी त्यामध्ये येत असतात.

सभापती महोदय, मुंबईवरुन निघणारे रेल्वेचे मार्ग आता सहा पदरी केले जाणार आहेत. माननीय रेल्वे मंत्री श्री. सुरेश प्रभू रेल्वेचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी ते महाराष्ट्रात आले असतांना त्यांच्या समवेत माननीय मुख्यमंत्री तसेच आमची बैठक झाली व त्या बैठकीत आपल्या रेल्वे मार्गाच्या संदर्भात चर्चाही झाली होती. त्या बैठकीमध्ये रेल्वेच्या वरुन जाणारे पुलाच्या (आरओबी) संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. आरओबीमुळे सर्व कामकाज होऊन सुध्दा सर्व काम अडलेले असते. त्यावेळेस रेल्वेमंत्र्यांनी संपूर्ण देशातील आरओबीच्या संदर्भात दोन महिन्यात निर्णय घेतला जाईल असा निर्णय घेण्यात आला. या वर्षीच्या रेल्वेच्या अर्थसंकल्पात आपल्या राज्यशासन कडून 3 आरओबीचा उल्लेख केला होता परंतु माननीय रेल्वेमंत्र्यांनी महाराष्ट्रातील 86 आरओबीला अर्थसंकल्पात मान्यता दिलेली आहे. देशामध्ये एकंदर 63,367 कि.मी. लांबीचे मार्ग असून महाराष्ट्रामध्ये फक्त 5987 कि.मी. लांबीचे रेल्वे मार्ग आहेत. खरे म्हणजे आपण इतर राज्याच्या तुलनेत फार मागे आहोत. महाराष्ट्राचे भौगालिक क्षेत्र देशाच्या मानाने 9.36 टक्के असतांना देखील आपल्याला तेवढया पटीत रेल्वे मार्ग मिळाले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. ...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते सभापती महोदय, मंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारुन मला तीन महिने झाले आहेत परंतु या तीन महिन्यात मी दिल्लीमध्ये जाऊन माननीय रेल्वेमंत्र्यांना आपले रेल्वेची कामे मार्गीलावण्यासाठल आतापर्यंत तीन वेळा भेटलो आहे. महाराष्ट्रात आपण नवीन 10 मार्ग केले जाणार आहेत. अहमदनगर-परळी, वर्धा-नांदेड, वडसा-गडचिरोली, कराड-चिपळूण या रेल्वेमार्गांना तांत्रिक मान्यता मिळाली आहे. पुणे-नाशिक-मनमाड-धळे-इंदौर या मार्गाला अद्याप मान्यता मिळालेली नाही. नागपूर-नागभीडचे रुंदीकरणाचे काम आहे. गडचिरोली-अलिदाबाद अशी आपली रेल्वेमार्गाची मागणी आहे. कराड-चिपळूण रेल्वेमार्गाच्या संदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना म्हणालो की, आपण कोकणातून आलेला असून हा रेल्वेमार्ग मला तातडीने पूर्ण करावयाचा आहे. केंद्रीय रेल्वे मंत्र्यांनी या अर्थसंकल्पात चिपळूण-कराड रेल्वे मार्गाला मान्यता देऊन 1200 कोटी रुपयांची त्यासाठी तरतूद केलेली आहे. आपले अधिवेशन संपल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते हे काम कोकण रेल्वेकडे हस्तांतरीत केले जाणार आहे. सदरचे काम कोकण रेल्वे करणार असून त्यासाठी श्रीफळ वाढवले जाणार आहे. मी कोकणासाठी दुसरी मागणी अशी मान्य करुन घेतली आहे की, सिंधुदुर्ग येथे स्वतंत्र रेल्वे शेड उभारले जाणार असून त्यासाठी राज्य शासनाने 21 कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी देखील दिलेली आहे. कोकणात आता स्वतंत्र रेल्वे सुरु होणार आहे.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी काल माननीय केंद्रीय वाहतूक मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्याकडे एका कामानिमित्त गेलो होतो. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, आता रेल्वेचे को-डिपार्टमेंट कॉर्पोरेशन करीत आहे. तेव्हा माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, कराड ते चिपळूण हा रेल्वे मार्ग को-डिपार्टमेंट करीत आहात त्यामध्ये अंतर्भूत करावा. जवळपास दीड लाख कोटी रुपयांची गुंतवणूक को-डिपार्टमेंट देशात करण्यास तयार आहे. हे संसदेमध्ये मंजूर झालेले आहे. त्यामध्ये कोकणातील प्रकल्प अग्रक्रमाने घ्यावेत. आपणास रेल्वेने दिलेला निधी मराठवाडा विभागाकडे वळविता येईल. आपण माननीय केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना तसे सांगावे.

सभापती महोदय, कोकणामध्ये पोर्ट होणार नाही. केंद्र सरकार पोर्टला प्रस्तावित मार्ग करण्यास सांगत आहे म्हणजे रेल्वेने जी तरतूद महाराष्ट्रासाठी केलेली आहे आपणास मराठवाड्याकडे वळविता येईल. त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांनी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशी चर्चा करावी अशी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मी धन्यवाद देतो. मी त्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात केंद्रीय वाहतूक मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्यासोबत माझी देखील चर्चा झालेली आहे. आता ते लँड पोर्ट निर्माण करीत आहेत. त्यांच्या कल्पकतेतून निर्माण झालेला हा विषय फार महत्वाचा आहे. मराठवाडा आणि विदर्भमध्ये दोन लँड पोर्ट होत आहेत. त्यासंदर्भात माझी त्यांच्याशी चर्चा झाली. त्या भागातील व्यापाऱ्यांनी लँड पोर्टमध्ये माल द्यायचा आणि तेथून जबाबदारी जेएनपीटीची असणार आहे. यापुढे विदर्भाच्या, मराठवाड्याच्या व्यापाऱ्यांनी सेंटरला माल द्यायचा तेथून लोड होऊन तो जेएनपीटीमध्ये जाईल आणि पुढची जबाबदारी जेएनपीटीची असणार आहे. अशा प्रकरचा लँड पोर्ट तयार करीत आहोत ही चांगली कल्पना आहे. त्यातून रोजगार निर्मिती होईल आणि ट्रकमधून जाणारा माल रेल्वे व्हॅगन्समधून जाईल..

सभापती महोदय, मी या ठिकाणी दहा रेल्वे मार्गाचा उल्लेख केला. मी माननीय केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे कराड-चिपळूण मार्गाची आग्रहाने मागणी केली आणि त्याप्रमाणे तरतूद झाली.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या ठिकाणी अहमदनगर-बीड-परळी या रेल्वे मार्गासंबंधी प्रश्न उपस्थित केले आणि माननीय मंत्री तो विषय सोडून इतर विषयांवर बोलत आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी अहमदनगर-बीड-परळी आणि सोलापूर-बीड-जळगाव या रेल्वे मार्गाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. जसे कोकण रेल्वे महामंडळ आहे त्याप्रमाणे या ठिकाणी सुद्धा महामंडळ निर्माण करावे असा त्याचा मुद्दा आहे. राज्य शासनाच्या अखत्यारितील हा विषय आहे. आपणास 50 टक्के रक्कम केंद्राकडे द्यायची आहे. त्यासाठी आपणास रोखे काढण्याची गरज आहे काय, जर तसे रोखे काढायचे असतील तर त्याबाबत राज्य शासनाची काय भूमिका असणार आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी अहमदनगर-बीड-परळी या रेल्वे मार्गाचा प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर या सदनातील सहा सन्माननीय सदस्यांनी रेल्वेच्या संदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले. मी फक्त अहमदनगर-बीड-परळी या रेल्वे मार्गासंबंधी उत्तर दिले आणि अन्य सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तर दिले नाही तर ते योग्य होणार नाही. कारण मी परिवहन मंत्री म्हणून सर्वांचे प्रतिनिधीत्व करीत आहे. राज्यातील रेल्वेच्या प्रश्ना संदर्भात मी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशी तीन वेळा चर्चा केली. या ठिकाणी वर्धा-नांदेड रेल्वेचा उल्लेख झाला. वर्धा-नांदेड रेल्वे मार्गाचा प्रकल्प 2 हजार 501 कोटी रुपयांचा आहे. आतापर्यंत त्यावर 92 कोटी रुपये खर्च झाले. 30 किलोमीटरची जमीन अधिग्रहीत झाली. प्रकल्पाच्या कामास सुरुवात झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी अशासकीय ठरावाद्वारे अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचा प्रश्न उपस्थित केल्यामुळे त्यावर अन्य सन्माननीय सदस्यांनी देखील काही प्रश्न मांडले. कराड-चिपळूण मार्गा सबंधी माननीय केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशी चर्चा करुन ते काम मंजूर करुन घेतले आणि आता त्या कामाचे भूमीपूजन होत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचा प्रश्न मांडला. हा रेल्वेमार्ग 261.25 किलोमीटर लांबीचा आहे. या मार्गाचे सुधारित अंदाजपत्रक 2 हजार 826 कोटी रुपये आहे. आतापर्यंत या प्रकल्पासाठी राज्य शासनाकडून सन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते..

2009-2010 मध्ये 25 कोटी रुपये, सन 2010-2011 मध्ये 31.25 कोटी रुपये, सन 2011-2012 मध्ये 42.50 कोटी रुपये, सन 2012-2013 मध्ये 60 कोटी रुपये, सन 2013-2014 मध्ये 20 कोटी रुपये आणि सन 2014-2015 मध्ये 20 कोटी रुपये असे एकूण 198.75 कोटी रुपये रेल्वे मंत्रालयाला वितरित करण्यात आले आहेत आणि रेल्वे मंत्रालयाकडून 165 कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

सभापती महोदय, सोलापूर-बीड-जळगाव हा रेल्वेमार्ग 450 किलोमीटर लांबीचा आहे. या प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रक 3205.90 कोटी रुपये आहे. दिनांक 29.8.2012 रोजी रेल्वे बोर्डाच्या सर्व्हे अहवालाप्रमाणे हा खर्च सादर करण्यात आला. या रेल्वे मार्गाच्या संदर्भात राज्य शासनाकडून रेल्वे मंत्रालयाशी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे माझी माननीय केंद्रीय रेल्वे मंत्र्यांबरोबर तीन वेळा बैठक झालेली असून त्यामध्ये राज्यातील सर्व मार्गांसाठी मी पाठपुरावा करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्वतंत्र महामंडळ स्थापन करणार काय असा प्रश्न विचारला. जर आवश्यकता असेल तर तसे महामंडळ स्थापन करण्यात येईल अन्यथा रेल्वे मंत्रालयाच्या माध्यमातून राज्य शासनाचा हिस्सा देऊन रेल्वेकडूनच हे काम कसे पूर्ण करता येईल हे पहावे लागेल.

सभापती महोदय, विदर्भातील सर्व जिल्हे रेल्वेने जोडलेले आहेत. परंतु मराठवाड्यातील जिल्ह्यांची तशी परिस्थिती नाही याची मला पूर्वीपासून जाणीव आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा मांडला. त्यांनी सांगितले की, रेल्वेने पाणी ने-आण करता येईल काय ? पाण्याचे पाईप रेल्वे यार्डपर्यंत गेले तर ते शक्य आहे. आपण दुष्काळी भागाकरिता किती टँकर पुरविणार आहोत याचा विचार करावा लागेल. भविष्यात त्याचा विचार करण्यात येईल.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, राज्यातील रेल्वेच्या प्रश्नासंदर्भात आपणा सर्वांना सोबत घेऊन माननीय केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशी चर्चा करुन त्यांच्याशी पाठपुरावा करण्यात येईल. माझी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचा ठराव मागे घ्यावा.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या महत्वाच्या ठरावावर माननीय परिवहन मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, मराठवाड्यातील मागासलेल्या भागाला न्याय देण्याच्या दृष्टीने या रेल्वे प्रकल्पाच्या संदर्भात केंद्रीय रेल्वे मंत्री महोदयांसमवेत एक बैठक घ्यावी.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित....

या प्रकल्पावर 1995 पासून 165 कोटी रुपये खर्च झाला आहे. 365 कोटी रुपये किंमत असलेला हा प्रकल्प 3200 कोटी रुपयांपर्यंत जात आहे. अशा गतीने आपण काम करीत गेलो तर या प्रकल्पासाठी दिलेला पैसा कारणी लागणार नाही. त्यामुळे मी नम्रपणे विनंती करु इच्छितो की, या विषयी निर्णय घेण्याच्या दृष्टीने माननीय केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे बैठक घेऊन त्या बैठकीला लोकप्रतिनिधींना आणि विशेषतः विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींना आमंत्रित करावे. किंबहुना या संदर्भात मध्यस्थी करण्यासाठी आपण बैठक घ्यावी, एवढीच या निमित्ताने विनंती करतो व माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मु.शी.:** चंद्रपूर जिल्ह्यात विविध उद्योगांमुळे होत असलेले प्रदूषण

**मु.शी.:** चंद्रपूर जिल्ह्यात विविध उद्योगांमुळे होत असलेले प्रदूषण, या विषयावरील श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांचा ठराव.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनमतीने खालील ठराव मांडते.

"राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाणे, त्यामुळे बहुतांश जिल्ह्यांत वायू प्रदुषण व जलप्रदुषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसा खाणीपासून होत असलेले प्रदूषण, लहान मोठे उद्योग त्यात थर्मल पॉवर स्टेशन, एम.आय.डी.सी.तील उद्योग, सिमेंट कारखाने, पेपर मिल यापासून होत असलेले प्रदूषण, उद्योजक कराननामा करुन देखील नियम पाळत नसणे, विशेषत: ज्या भागात दुर्मीळ वनसंपदा तसेच वन्यजीवांचे वास्तव्य आहे त्या भागात कोळसा खाणीसाठी परवानगी देण्याचा चाललेला प्रकार, त्यामुळे वन व वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येणे, त्यातच अपुऱ्या साधन सामग्रीमुळे प्रदूषणावर आळा घालण्याकरिता शासनास येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, या सर्वांवर आळा घालण्याकरिता शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, तसेच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता आरक्षित वनांच्या ठिकाणी देण्यात आलेले कोलब्लॉक्स रद्द करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, आज देशामध्ये चंद्रपूर जिल्हा हा प्रदूषणामध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात नवीन उद्योग येत नाहीत. प्रदूषणामुळे भूपृष्ठात असलेले खनिज आजही काढू शकत नाही आणि बेरोजगारांच्या हाताला काम देऊ शकत नाही. त्या भागात इंजिनियरींग आणि आयटीआय झालेले लोक मोठ्या प्रमाणावर आहेत. परंतु आमच्या भागात उद्योगच येत नसल्यामुळे त्या लोकांना रोजगार मिळू शकत नाही. त्यामुळे चंद्रपूरमध्ये बेरोजगारांची मोठी फौज निर्माण झाली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

महोदय, चंद्रपूरमध्ये 28 कोळसा खाणी असून, त्यातील 17 ओपन कास्ट आणि 11 अंडरग्राऊंड आहेत. तसेच 5 सिमेंट कारखाने असून 6 स्पाँज आयर्न प्लांट आहे, 6 कोल वॉशरीज असून त्या आज बंद आहेत, 4 औष्णिक विद्युत केंद्र, 2 पेपर मील आणि 4 रिफायनरी असून त्यातील दोन बंद आहेत. एमआयडीसी, चंद्रपूरमध्ये 2 रासायनिक इंडस्ट्रीज आहेत. चंद्रपूर, ताडाली, बल्लारपूर, मूल हे क्षेत्र त्या एमआयडीसीमध्ये येते. त्या व्यतिरिक्त जिल्हा एमआयडीसीमध्ये इतरही अनेक उद्योग सुरु आहेत. तो भाग प्रदूषित असल्यामुळे केंद्रीय पर्यावरण तथा वन मंत्रालय यांनी दिनांक 31/03/2012 पर्यंत त्या भागात नवीन उद्योग सुरु करण्यास बंदी घातली होती. परंतु अद्यापपर्यंत ती बंदी उठविण्यात आलेली नाही. त्यामुळे त्या भागात नवीन उद्योग येत नाहीत. आजपर्यंत प्रदूषण विभागामार्फत त्या भागातील प्रदूषण कमी करण्याबाबत कोणतेही उपाय करण्यात आलेले नाहीत. त्या भागातील उद्योग बंद व्हावेत ही माझी इच्छा नाही आणि तशी मागणी सुध्दा नाही. परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळ मात्र प्रदूषण करणाऱ्या उद्योजकांकडे पूर्णतः दुर्लक्ष करीत आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातूनच उद्योग जगतातून मोठ्या प्रमाणावर प्रदूषण केले जाते. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्याचे प्रदूषण कमी व्हावी ही खऱ्या अर्थाने सर्वांचीच मागणी आहे. उद्योजक ज्यावेळी कारखाना सुरु करण्यासाठी परवानगी मागतात त्याचवेळी पर्यावरण विभागाचे प्रमाणपत्र घेताना त्यांना प्रदूषणाच्या बाबतीत काय उपाययोजना करणार आहात, याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागते. प्रदूषण नियंत्रण मंडळ वारंवार कारखान्याची पाहणी करुन प्रदूषण कमी करण्याची सूचना देते. परंतु तरीही प्रदूषणात वाढ कशी होते, हाच खरा प्रश्न आहे. प्रदूषणामुळे निसर्गावर परिणाम व्हायला लागला आहे. अवर्षण, अतिवृष्टी, गारपीट या सर्व गोष्टींना शेतकऱ्यांना बाराही महिने समोर जावे लागते. लहरी निसर्ग हे प्रदूषणाचेच पाप आहे.

महोदय, आज सूर्य व पृथ्वी यामधील ओझोनचा थर कमी झाला आहे, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. प्रदूषणामुळे जनतेला व कामगारांना निरनिराळ्या रोगांना बळी पडावे लागत आहे. परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळ मात्र या बाबत गंभीर नाही. किंबहुना उद्योजकांवर कारवाई करुन प्रदूषण कमी करावे ही भावना सुध्दा त्यांच्यात दिसत नाही. त्यामुळे प्रत्येक अधिवेशनात मांडण्यात येणाऱ्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

तारांकित प्रश्न वा लक्षवेधी सुचनांवर मला नेहमीसारखे पठडीतील उत्तर देण्यात येते. परंतु त्यानुसार काहीही कार्यवाही झालेली नसते. वारंवार केवळ उत्तरातून आमची फसवणूक केली जाते. परंतु आम्हाला मात्र न्याय मिळत नाही.

सभापती महोदय, दिनांक 17 ऑक्टोबर, 2013 रोजी तत्कालीन प्रदूषण मंत्र्यांबरोबर बैठक झाली होती. त्यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाने आम्हाला कोल वाहतूक होणाऱ्या रस्त्यावर वॉटर स्प्रिंकलर लावल्याचे सांगितले होते. परंतु एकही वॉटर स्प्रिंकलर लावलेले नाही. कोळशाची वाहतूक ताडपत्रीने झाकलेल्या ट्रकद्वारेच केली जाते असेही सांगितले होते. परंतु मघाशी माननीय मंत्र्यांनीच सांगितले की, त्यांनी स्वतःच उघड्यावर कोळसा वाहतूक करणारे 25 ट्रक पकडले होते. कोळसा खाणीच्या ठिकाणी झाडे लावल्याचे सुध्दा सांगितले होते. परंतु त्या भागात एकही झाड लावण्यात आलेले नाही. तसेच औष्णिक विद्युत केंद्रातील सर्व सातही युनिटना ईएसपी लावल्याचे सांगितले होते. परंतु ते सुध्दा कुठे लावल्याचे दिसले नाही. या बरोबरच अमोनिया डोझिंग लावल्याचे सांगितले होते, परंतु ते सुध्दा लावलेले नाही. पेपर मिलमध्ये औद्योगिक सांडपाणी नियंत्रण व्यवस्था केली आहे, लाईम स्लजमधून पुन्हा चुना मिळविण्याकरिता भट्टी लावलेली आहे, असे सांगितले होते. परंतु 60 हजार टन चुना स्लजमधून बाहेर काढण्यात येतो. पण प्रत्यक्षात त्या मिलमध्ये 80 हजार टन स्लज निघतो. स्लज म्हणजे चुना होय. तो स्लज वाऱ्याबरोबर उडाल्यानंतर जेव्हा लोकांच्या डोळ्यात जातो तेव्हा डोळ्यात जळजळ होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर झाडे मरतात आणि लोकांना त्या स्लजचा त्रास होतो. त्यामुळे या स्लजची काही तरी व्यवस्था करावी, अशी मागणी आम्ही कित्येक दिवसांपासून करीत आहोत. पेपर मिलला औद्योगिक सांडपाणी नियंत्रण व्यवस्था केली आहे, सिमेंट प्लांटसाठी ईएसपी आणि बॅग फिल्टर बसविले आहे असे सांगितले गेले. परंतु या बाबीही आम्हला कोठेही आढळून आल्या नाहीत. शिवाय एअर क्वालिटीचे कायमस्वरुपी परीक्षण करण्यासाठी सिस्टीम स्थापित केली आहे. एका बाजूला एवढ्या सर्व उपाययोजना केल्या असताना दुसऱ्या बाजूला मात्र प्रदूषणात वाढच होत आहे. चंद्रपूरमध्ये त्वचा रोग, क्षयरोग, दमा, हृदयाचे रोग, खोकला, ताप यासारख्या आजारांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. चंद्रपूरमध्ये रोगांचा त्रास होतो म्हणून लोक चंद्रपूरला यायला तयार नाहीत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लोक नक्षलवाद्यांपेक्षा त्या भागातील आजारांनाच घाबरत आहेत. त्यामुळे कोणीही अधिकारी त्या



श्रीमती शोभा फडणवीस....

भागात काम करण्यासाठी यायला तयार होत नाही. परंतु प्रत्यक्षात दिशाभूत करुन प्रदूषण नियंत्रण मंडळ व उद्योजक, जनतेच्या जीवाशी खेळत असतील तर प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावयास पाहिजे. तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाने शासनाची व जनतेची फसवणूक बंद करावी. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातूनच जर प्रदूषण वाढविले जात असेल तर त्या बाबत तपासणी करुन, त्यांच्यावर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे.

महोदय, भंगारवाले टायरमधील लोखंडी तार काढण्यासाठी ते टायर भर वस्तीत जाळतात. यातून मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होते. शिवाय त्यातून निघणारा धूर अत्यंत विषारी असल्यामुळे अशाप्रकारे टायर जाळणाऱ्यांवर कारवाई करावयास पाहिजे होती. परंतु या बाबतीत अजूनपर्यंत कारवाई केली गेली नाही. महोदय, पॉवर प्लांटमध्ये इंधन म्हणून निकृष्ट दर्जाचा कोळसा वापरला जातो. हा प्रकार थर्मल पॉवर आणि जनरल पॉवरमध्ये सुध्दा आढळून येतो. त्या ठिकाणी टायरची भुकटी मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. ही भुकटी मध्य प्रदेशातून येते. टायरची भुकटी अतिशय विषारी आहे. वास्तविक पाहता ही भुकटी वापरण्यावर बंदी आहे. तरी सुध्दा धान्याचा कोंडा आणि टायरची भुकटी वापरली जाते. माझ्या विभागातील एमआयडीसीमधील उद्योगांमधून मोठ्या प्रमाणावर काळा धूर निघतो. मी याबाबत चौकशी केली असता, त्या उद्योगांच्या ठिकाणी इंधन म्हणून टायरची भुकटी वापरली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु आजपर्यंत प्रदूषण नियंत्रण मंडळाने या बाबत काहीही सांगितले नाही. मघाशी माननीय मंत्र्यांनी सुध्दा सांगितले की, हा काळा धूर कशामुळे निघतो याची मला माहिती नाही. या काळ्या धुरामुळे मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होते. ही भुकटी विषारी असल्यामुळे तिचा आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरित परिणाम होऊ शकतो. कोळसा बंद ट्रकमधून नेणे हे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळच जर उद्योजकांच्या दावणीला बांधले गेले असेल तर आम्हाला कोण न्याय देणार आहे ? आजही चंद्रपूर, गडचिरोली, वणी, यवतमाळ या भागात चिमण्यांमधून मोठ्या प्रमाणावर काळा धूर निघताना दिसतो. हा धूर आम्हाला दिसत असेल तर प्रदूषण नियंत्रण मंडळाला का दिसू नये, या गोष्टी त्यांच्या निदर्शनास का येऊ नयेत ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महोदय, घुग्गूस कोळसा खाणीतील कोळशाची भुकटी किंवा इतर प्रदूषित बाबींवर नियंत्रण आणून, प्रदूषणापासून आम्हाला मुक्त करावे, अशी मी मागणी करते. रस्त्याचे डांबरीकरण करणे

..6..



श्रीमती शोभा फडणवीस....

आवश्यक असते. 17 ते 20 टनापर्यंत वजनाच्या वाहतुकीचा विचार करुन डांबरीकरण केले जाते. पण सध्या त्या रस्त्यावर 40 टनापर्यंत वजनाच्या मालाची वाहतूक होत आहे. त्यामुळे रस्त्याची दुर्दशा होते. याचा सुध्दा प्रदूषणावर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. ट्रक, बसगाड्यातून सुध्दा मोठ्या प्रमाणावर काळा धूर निघतो. या बाबत आम्हाला प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले की, त्या वाहनाच्या पेट्रोल किंवा डिझेलमध्ये केरोसीन मिसळलेले असेल तर काळा धूर निघतो. एकदा तर पोलिसांच्या वाहनातून सुध्दा काळा धूर निघत असल्याचे दिसले. बस मधून सुध्दा काळा मधून निघाल्याचे दिसून आले. हा सुध्दा वायू प्रदूषणाचाच एक प्रकार आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस ....

त्यामुळे त्याचाही विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. बल्लारशा पेपर मिलच्या उद्योगातील सांडपाणी नदीत सोडल्यामुळे वर्धा नदीच्या पात्रात मासे मरण्याचे प्रमाण मोठे आहे. मागच्या वेळी मी हा विषय मांडला होता की, उद्योगातील सांडपाण्यामुळे मासे मरत आहेत. मासे मरत असल्यामुळे तेथील मत्स्य व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात याचा परिणाम भोगावा लागत आहे, त्यांचा धंदा बसल्यामुळे त्यांना उपाशी मरण्याची पाळी येत आहे. पाणी शुध्द करूनच सोडले पाहिजे असेही सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात तसे घडत नाही. कारण बल्लारशा पेपर मिलमधील लाकूड किंवा बांबू यांना सडविलेले पाणी व रसायने नदीत सोडले जातात. सदर पाण्याचे शुध्दीकरण केले असे सांगितले जाते. पण प्रत्यक्षात पाहणी केली असता तसे दिसत नाही. मी बऱ्याच वेळा माननीय मंत्र्यांनाही तेथे् घेऊन गेले. अगदी 10 फुटांच्या अंतरावर उद्योगातून सोडलेले पाणी आहे आणि बाजूला पाणीपुरवठा योजना आहे. दोन्ही जवळ असल्याने सांडपाणी पुन्हा गावातील लोकांना पिण्यास मिळू लागते आणि त्यामुळे त्यांना रोगराईला सामोरे जावे लागते. आम्ही हा विषय मांडतो त्यावेळी सांगितले जाते की, गावातील सांडपाणी तेथे गेल्यामुळे पाणी अजून प्रदुषित झाले आहे. गावातील असे कोणते सांडपाणी तिकडे वाहत जाणार आहे, किती लोक आंघोळ करून पाणी सोडणार आहेत ? कंपनीचे घाण पाणी आम्ही स्वत: पकडून दिले, नमुने दिले, चौकशी करण्यास लावली. परंतु अजुनपर्यंत त्यावर कोणत्याही प्रकारचा प्रयोग झालेला नाही. आम्हाला या पासून कोणीही वाचविलेले नाही. त्यामुळे मी ठरावाच्या माध्यमातून हा विषय येथे आणला आहे.

सभापती महोदय, कोळसा खाणीचे पाणी कामगार वस्तीत पुरविले जाते. कोळसा खाण्यांतून मोठ्या प्रमाणात पाणी निघते आणि तेच पाणी त्यांच्याच कामगारांच्या वस्तीत दिले जाते. मी 25 वर्षे त्या विभागाची आमदार आहे. लोकांनी मला पाणी आणून दाखविले. नवीन पांढरा शर्ट आणून त्या पाण्यात बुडवून दाखविला. पांढरा शर्ट पिवळा होत असेल तर ते पाणी शुध्द म्हणायचे का, रसायनयुक्त नाही म्हणायचे का ? कामगारांनी सांगितले की, पांढरा शर्ट पिवळा होत असेल तर आमच्या आतड्यांचे काय होत असेल. ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे मी पाण्याची पाईपलाईन त्यांच्याकडे तात्पुरती व्यवस्था म्हणून दिली होती. 10 वर्षांमध्ये अजून सुध्दा त्यांना पिण्याचे शुध्द

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस ....

पाणी मिळालेले नाही. तत्संदर्भात जेव्हा एमडीच्या समवेत बैठक झाली तेव्हा मी त्यांना सांगितले की, आपण त्यांना पाण्याची पाईपलाईन द्या. तुमच्या कामगारांना वाचवायचे काम तुमचे आहे. तुमचे कामगार चांगले सशक्त राहिले तरच काम चांगले करतील. तेव्हा आता त्या ठिकाणी त्यांच्याकडे पाण्याची पाईपलाईन देण्याचा फक्त विचार सुरूआहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, ज्या वॉटर फिल्टरमधून पाणी जाते तो कित्येक दिवसांपासून बंद आहे. जनतेच्या जीवाशी खेळून फक्त उद्योग उभे करावेत हा आमचा उद्देश नाही. उद्योग असले पाहिजेत, उद्योग चालले पाहिजेत, कामगारांना काम मिळाले पाहिजे. परंतु त्याचबरोबर लोकांच्या आरोग्याचाही प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे उद्योग बंद करणे हा माझा विषय नाही, उद्योग बंद करणे हे माझे लक्ष्यही नाही. माझे एकच लक्ष्य आहे की, उद्योगातून होणारे प्रदूषण कमी करायचे. गेल्या 10-15 वर्षांपासून मी पाहत आहे की, प्रदूषण मंडळाच्या एकाही अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. कारखानदारांकडून 35 लाख रूपयांची बँक गॅरेंटी घेतली जाते. प्रदूषण मंडळामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. परंतु तेथील एकाही अधिकाऱ्यावर आजपर्यंत कधी कारवाई झालेली नाही. मला या संदर्भातील एकही उदाहरण माहीत नाही. एक अधिकारी 15 वर्षे कोणत्या ना कोणत्या निमित्ताने त्या विभागात राहत असेल तर प्रदूषण कधीच कमी होऊ शकणार नाही. त्यामुळे मी या ठरावाच्या माध्यमातून शासनाला विनंती करते की, प्रदूषण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर पहिल्यांदा कारवाई करावी आणि आम्हाला प्रदुषणापासून वाचवावे.

ठराव प्रस्तुत झाला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रविण पोटे-पाटील (उद्योग आणि खनिकर्म राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ठरावाद्वारे प्रदुषणाचा विषय मांडला आहे. महाराष्ट्रात औद्योगिकीकरण व शहरीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. मोठ्या शहरात कारखान्यांचे प्रमाण 40-50 वर्षांपासून झपाट्याने वाढत आहे. तो वेग मोठा आहे. विकास करायचा असेल तर आपल्याला औद्योगिक क्षेत्र वाढविणे गरजेचे आहे. इतर जिल्ह्यांच्या मानाने चंद्रपूर जिल्ह्यात फार मोठ्या प्रमाणात प्रदूषण आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आणि आकडेवारीप्रमाणे चंद्रपूर जिल्हा प्रदूषणात देशात चौथ्या क्रमांकावर आहे. हे असत्य नाही. चंद्रपूर जिल्ह्यात औद्योगिक विकासाला अडथळा निर्माण झाला आहे हे सुध्दा खरे आहे. चंद्रपूर जिल्हा प्रदुषणाचे माहेरघर बनले आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले ही गोष्ट नाकारता येणार नाही. आमचे माननीय मंत्री मागच्या दीड महिन्यांत सन्माननीय सदस्यांसोबत तेथील भेटीसाठी गेले होते त्यावेळी त्यांनी सुध्दा या संदर्भात कबूल केले. मघाशी लक्षवेधी सूचनेवर बोलताना सुध्दा त्यांनी कबूल केले. आज सध्याच्या परिस्थितीत तेथे उद्योगाला मंजुरी देणे बंद केले आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात विकासाला बंदी निर्माण झाली आहे. कोणत्याही स्थितीत तेथे सध्या विकास करू शकत नाही. प्रदूषण मंडळांने दिनांक 17.10.2013 ला दिलेल्या माहितीमध्ये तफावत आहे असे सन्माननीय सदस्या म्हणाल्या. मी सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन माझ्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांच्या चौकशीचे आदेश देतो. कोणत्याही अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे प्रदूषण वाढत असेल तर तत्संदर्भात चौकशी करून संपूर्ण राज्यातील हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई करण्यात येईल असे आश्वासन देतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दीपकराव साळुंखे यांचा ठराव आहे. परंतु त्यांनी पत्र दिले आहे की, तो ठराव पुढे ढकलण्यात यावा.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सोमवार, दिनांक 30 मार्च, 2015 रोजी दुपारी 12.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल, या विशेष बैठकीत दुपारी 12.00 ते 01.00 या वेळेत म.वि.प. नियम 260 अन्वये सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सादर केलेल्या कायदा व सुव्यवस्था या विषयावरील प्रस्तावावर माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 01.15 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 04 वाजून 19 मिनिटांनी सोमवार, दिनांक 30 मार्च, 2015 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION